म. ग्रं. सं. ठाणे
विषय ३/०२१
क्र. नं. २०८८
नोंद नं. ......
ठाणे

# काव्यतरंगिणी

## प्रथम खंड

संपादिका

सौ. सरस्वतीबाई वैद्य, केरी.

मुद्रणस्थल
...ोदय ' छापखाना,
सांगें—गोवा.

REFBK-0004261

श. १८५२

श्रीविजयादुर्गा प्रसन्न.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ..........

# काव्यतरंगिणी.

प्रथम प्रवाह

... तेज-कणां साठवुनी निजतनूंत भूदेवी, ॥
स्वा... करी प्रकट वेवी, ॥
तेंवि विचार जगांतिल सांठविले आपणांत मन्मतिनें ॥
त्यांतून वाहती हे काव्यजलात्मक तरंगिणी-कृतिनें ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्र. क्र. ४२६१

रचयिता
रामचंद्र पांडुरंग वैद्य, केरी.

संपादिका
सौ० सरस्वतीबाई वैद्य, केरी

REFBK-0004261
REFBK-00042

प्रकाशयिता
डॉ. गोविंद दत्तात्रेय वैद्य, केरी.

[ Editor- Dr. G. D. Vaidia Medico - Cirurgião ]

मुद्रक
ज्योतिर्भूषण —नारायण अनंत ना. पाटणकर
मालक 'संगमोदय' छापखाना, सांगें-गोवा.

श. १८५२ स. १९३०

# प्रस्तावना

( १ ) 'काव्यतरंगिणी' ह्या पुस्तकांतील 'पथ्यापथ्य तरंग' खेरीज करून बाकीच्या बहुतेक कविता रचण्याची नव्हे पण रचविण्याची जबाबदारी बहुतेक अंशीं माझ्यावर आहे. ह्मणजे आह्मा उभयतांच्या विवाहसंबंधापासून आजवरच्या काळांत जे कांहीं बरेवाईट प्रसंग घरांतच नव्हे, गांवांत, देशांत, परदेशांत घडलेले, पाहून, वाचून किंवा ऐकून ठाऊक झाले, त्या त्या प्रसंगांसंबंधानें आह्मा उभयतांचा जो संवाद त्या त्या वेळीं किंवा मागाहून फुरसतीच्या वेळीं घडला व शेवटीं मी माझ्या अल्पबुद्धीनें जो अभिप्राय प्रकट केला, त्याच अभिप्रायाच्या ह्या कविता माझ्या आग्रहाचे मागणीमुळें तिकडून रचून देण्यांत आलेल्या होत्या. व मीं त्या 'प्राचीप्रभा' व दुसऱ्या वाटेल त्या मासिकांतून किंवा वृत्तपत्रांतून प्रसिद्धीस पाठविल्या होत्या. स्वत: तिकडच्या मताप्रमाणेंच ह्या कविता रचण्यांत आल्या असें क्वचितच घडलें असेल. अर्थात् बहुतेक कवितांतील प्रतिपादन तिकडच्या स्वताच्या मताविरुद्ध, देखील पण केवळ माझ्या आग्रहास्तव माझ्या मताप्रमाणें व मला पाहिजे ह्मणूनच कवितांमध्यें मांडून देणें झालें आहे. म्हणूनच मी जबाबदारी माझ्यावर असें वरती म्हटलें.

( २ ) 'पथ्यापथ्यतरंगा'ची गोष्ट वेगळी. त्यांतील कविता बहुतेक त्यांनीं माझ्या परिचयापूर्वीपासूनच चालविलेल्या 'पथ्यबोध' नांवाच्या मासिकांत छापविलेल्या होत्या; त्या आतां मी शोधून काढून ह्या पुस्तकांत त्यांच्या परवानगीनें मिळविल्या आहेत.

( ३ ) ह्या पुस्तकाचे पांच भाग, १ गृह्यतरंग, २ राजकीय तरंग, ३ पथ्यापथ्यतरंग, ४ चारित्र्य तरंग आणि ५ पारमार्थिक तरंग असे एकत्र जुळवून

छापावयास दिले होते; पण छापखान्यांचे मालकांनीं शक्य ती पराकाष्ठा केली तरी, ह्या १५ व्या 'महाराष्ट्रसाहित्यसंमेलना' चे पूर्वीं सगळें पुस्तक छापून पुरें होत नमलेवरून, अगोदर पहिले दोनच तरंग छापावे व बाकीचे तीन तरंग मागोमाग छापून ह्या पुस्तकाला जोडावे, असें ठरविलें आहे; व त्याप्रमाणें एक दोन महिन्याचे आंत ते तीन्ही तरंग, ज्यांनीं ज्यांनीं हें पुस्तक घेतलें असेल त्यांना त्यांना, घ्यावयास मिळतील. ह्यापेक्षां त्यांतील विषय अधिक भारदस्त हें उघडच आहे.

( ४ ) कविता त्यांची असतां मी माझ्या नांवानें कां छापली ? ह्या प्रश्नाचें अर्धवट उत्तर वरती सांगण्यांत आलेंच आहे. तें पुरतें असें कीं, ह्या कविता संमेलनाचे वेळीं विद्वान लोकांसमोर नेण्याइतक्या योग्य नाहींत, असें तिकडचें म्हणणें असून, माझें म्हणणें, त्या योग्य असोत–नसोत, मला त्या आवडतात. म्हणून सगळ्या एकत्र जमवून छापून एकेक प्रत पुस्तकालयांतून आणि माझ्याचसारख्या समजुतीच्या वाचकांच्या संग्रहांतून पडून राहिलीच पाहिजे ! अशा मतभेदामुळें ह्या पुस्तकाचे छापण्याचा वगैरे खर्च देखील मला तिकडून न मिळतां खासगींतून करावा लागला ! तरी पण हा माझा हट्ट पुरा होऊं दिला ह्या प्रेमळ स्वभावामुळें मी आभारी, आनंदी व समाधानीच आहें !

( ५ ) प्रस्तुतच्या साहित्यसंमेलनाच्या निमित्तानें तिकडूनही दोन वेगळीं कवितात्मक पुस्तकें तयार करण्यांत आलेलीं आहेत. त्यांपैकीं पहिलें "आर्याबद्ध स्थूलतनुवर्णन" म्हणजे शारीर आणि इंद्रियविज्ञान, हें एक, हें नुकतेंच सचित्र छापून प्रसिद्ध झालें आहे. व दुसरें, 'मृत्युंजय नाटक' नांवाचें आयुर्वेदकांतील सिद्धांतावर संगीत नाटक लिहिलेलें आहे तें ते स्वतःच्या नांवानें छापविणार आहेत. ते छापखान्यांतील सवडीच्या अभावींच मागें राहिलें ! ही दिलगिरीची गोष्ट तिकडे तसीच मलाही वाटते ! असो.

( ६ ) शेवटीं पुस्तक वाचणारांना माझी हात जोडून विनंती आहे कीं, 'गृह्यतरंग' व 'राजकीय तरंग' ह्या सदरांतील प्रतिपादित मतें कोणाला योग्य वाटतात व कोणाला अयोग्य वाटतात हें त्यांनीं त्यांनीं निर्भीडरीत्या वृत्तपत्रांतून असो किंवा खासगी पत्रानें असो व्यक्त करण्याची तसदी घेऊन, ते ते अभिप्राय खालील पत्त्यावर मला कळविण्याची अवश्य कृपा करावी.

( ७ ) छापखान्याचे मालक व दुसरे ज्यांनीं ज्यांनीं प्रसिद्धीसाठीं साह्य केलें त्या सर्वांस परमेश्वरानें आयुरारोग्यसंपन्न करावें असी प्रार्थना करून ही प्रस्तावना पुरी करितें. —ता. ४ एप्रील १९३०

सर्व साह्यकर्त्यांची आभारी

मु. श्रीदुर्गाभुवन, हवेली, पो. फोंडा, प्रांत गोवा. } **सौ० सरस्वती वैद्य, केरी.**


# काव्यतरंगिणीचें शुद्धाशुद्ध.

| पृष्ठ | ओळ | शुद्ध | अशुद्ध |
|---|---|---|---|
| ५ | १५ | निजमुखें | तिजमुखें |
| ६ | १७ | होउनी | होउनि |
| ,, | ,, | तत्कृतिहि | तत्कृतिही |
| ७ | १४ | निर्माया | निर्माण |
| ,, | ,, | निधी | विघी |
| ८ | ४ | मधुरा | मघरा |
| ८ | १३ | कुंभयुग्म | कुंभ |
| ९ | १९ | सम जे | समजे |
| ,, | ,, | विरहित | विरहीत |
| १० | १० | न करवे | करवे |
| १३ | १२ | येइ | येई |
| ,, | २४ | याहुनी | याहुनि |
| २० | १५ | सरता | स्मरतां |
| २३ | २६ | मनोव्याधि | मनोव्याधी |
| २६ | १४ | संथ | संत |
| २८ | २ | पाहुनी | पाहुनि |
| २९ | ७ | न्मोहिनी | न्माहिनी |
| ३२ | १० | क्ष्माधर | स्माधर |
| ३४ | १२ | का मूक | कामूक |
| ३५ | १९ | अनवद्या | अनविद्या |
| ४० | २३ | तुह्मांस? | तुह्मां ? |
| ४४ | ५ | शोभती | शोभतें |
| ,, | ७ | तीं | ती |
| ,, | ११ | विहीना | विहीन |
| ४६ | २० | तारि | तरी |

| पृष्ठ | ओळ | शुद्ध | अशुद्ध |
|---|---|---|---|
| ८२ | १४ | सारिता | सारिता |
| ८३ | ५ | व्यभिचारं | व्यभिवार |
| ८७ | १८ | मानसीं | मानशीं |
| १६ | १९ | गृध्र | घृध्र |
| २० | १९ | अतःकरणा | अतःकरणीं |
| २५ | १२ | घडाघड | घडाडडा |
| ,, | २६ | योजिली | योजिति |
| ४७ | २० | एकज | एकच |
| ,, | २४ | नाहिं | नाहीं |
| ४८ | ११ | नर | नरु |
| ,, | १२ | तुह्मेंही | तुह्मेंहि |
| ४९ | १ | सुखास्पद | सुखापद |
| ५३ | २३ | पुरें | पुरे |
| ५४ | १३ | पातकानं | पातकानें |
| ५० | २३ | कैसी | केसी |

५५ यावर ३ ओळी नंतर ' गिडनें भिकेला मिळे वाव सत्य ! ॥३२॥ अशासाठिं मागील वारुनि कर्ज । ' या प्रमाणें वाचावें.

| पृष्ठ | ओळ | शुद्ध | अशुद्ध |
|---|---|---|---|
| ६० | १२ | मत्सरवश | मत्स्तरवश |
| ६१ | ६ | द्विजेतराचि | द्विजेतराचि |
| ६२ | १२ | शताधिक | शतादिक |
| ६६ | ३ | येउं | येऊं |
| ७१ | २१ | ठेविशी | ठेविशीं |
| ७३ | २१ | लावीं | लावी |
| ८० | २२ | पुरुषाचें | पुरुषाचे |
| १०३ | २६ | मारुं | मारु |
| १०६ | २१ | स्वदेशोपकारीं | स्वदेशोपकारी |
| १०६ | २२ | तरी | तरीं |



# काव्यतरंगिणी

१ गृह्यतरंग

व

२ राष्ट्रीयतरंग

# काव्यतरंगिणी

१

## प्रथम खंड

मराठी ग्रंथ संग्रहालय
क्र. ४२६१

### भाग पहिला

## गृहतरंग

### मंगलाचरण

ओव्या-[ चालः-पहिली माझी ओवी० ]

ध्यानीं ध्याऊं आर्धी । सर्व श्रेष्ठ विद्या ।
जीच्याहूनी आद्या । कोणी नाहीं ॥ १ ॥
रूप जीचें साऱ्या । जगाचें चैतन्य ।
या वांचोनी अन्य । वदवेना ॥ २ ॥
बुद्धीला आमूच्या । प्रेरक जी सदा
सर्वही संपदा । दासी जीच्या ॥ ३ ॥

ऐशी भगवती । सगळ्यांची माता ।
ब्रह्मांडां अमितां । पोटीं धरी ॥ ४ ॥
ब्रह्मा विष्णू शीव । गुणाचीं हीं वाळें
जीचिया इच्छावळें । होतीं जातीं ॥ ५ ॥
निर्गुण निःस्पृह । वृद्ध निरंजन ।
पतीनें रंजन । होई जीचें ॥ ६ ॥
गुणरूपहीन । इंद्रियांविहीन ।
जीवींचा जीवन । प्रिय जीला ॥ ७ ॥
क्षणही सोडोनी । न राहे पतीस ।
स्वातंत्र्य हें तीस । मरणचीं ॥ ८ ॥
सर्व ढंग जीचे । एका पतीसाठीं ।
अन्य कांहीं दृष्टी । बघेचिना ॥ ९ ॥
निश्चळही पती । प्रेमें आकळीला ।
वर्णील त्या लीला । कोण बाई ॥ १० ॥
सद्रूप पतीची । चेतना ही सती ।
आनंदू हे मती । दोघां ठाईं ॥ ११ ॥

---

## श्री गौरीस्तुती.

### पद.

श्री शिवशंकर सुंदरी गिरिदुहिते ! । रक्षीं सुरमहिते ! । त्रिभुवनकारिणि ! भवभयहारिणि ! नतजनतारिणि ! महेश्वरी ! ॥ श्री शिव० ॥ ध्रु० ॥

स्पर्श शब्दरसरूपगंध हे विषयाचि सौख्यद ऐसें ॥ मानुनि अंतरिं फसुनि आजवरि शिणविलि हे तनु फुकट खरी ॥ ॥ श्री शिव० ॥ १ ॥

त्वदाकार जग सर्व असे हें तूंचि यांत सुखरूपा ॥ सुज्ञ झणति परि अनुभव अंतरिं नाहिं झणुनि मति बावरी ॥
॥ श्री शिव० ॥ २ ॥

अविद्याभ्रमें मोहीं पडलें पुण्यपाप तें न कळे ॥ कळे तिथें मन वळे कदापि न पळे त्यजुनि मज सुमति दुरी ॥
॥ श्री शिव० ॥ ३ ॥

ज्ञान नसे मज तवरूपाचें तत्व ठाऊकें नाहीं ॥ भक्तिस ठाव विरक्तिस वाव न गावतसे मम मनावरी ॥ श्री शिव० ॥ ४ ॥

अन्य उपाव नसे झणुनी तव पावन नांवचि गाई ॥ आईच तूं झणुनी तव पायीं लीन विराई ! होय पुरी ॥
॥ श्री शिव० ॥

---

## श्री भगवतीची प्रार्थना.

[ चालः- आइकें अहो ऋषिजाये ॥ मज वरिलें श्रीरघुरायें ॥ ]

प्रार्थना महेश्वरि माते, ॥ ज्ञान दे, तारिं आम्हातें. ॥ ध्रु० ॥
डुंबतों स्त्रिया आह्मि अबला अज्ञानसागरामाजी; ॥
पुरुषांसहि बुडवी आमुच्या संगतीमुळें जडता जी. ॥
ती दूर करावी अंबे ! निजकृपाकटाक्षें आजी ॥.

देशाच्या उद्धाराला ।
झटती जे पुरुष, तयांला ।
न मिळती स्त्रिया साह्याला, ।
दवडीं ह्या अपवादातें. ॥ प्रार्थना० ॥ १ ॥

सज्ञान पुरुष जे करिती देशहिताचे सुविचार, ॥
अर्धांगी अज्ञ तयांच्या ह्मणुनी ते अडती फार; ॥
शिकविल्या तरी न त्यजिती बायका जुने आचार ॥

की अर्धांग समाजाचें, ।
ह्मणति, लुलें पडलें साचें ! ।
लांच्छन हें आमुच्यावरचें ।
उभयांचे हृदयीं सलतें ! ॥ प्रार्थना० ॥ २ ॥

देश पहा दुसरे सारे विद्येनें भरले असती; ॥
नानाविध कौशल्यांनीं जग सगळें थक्कचि करिती; ॥
मिळवुनी धनाच्या राशी, अधिकार निरंकुश वरिती ॥

करपदादि अवयव अमुचे ।
जितुके हे तितुके त्यांचे; ।
भोक्ते परि ते उन्नतिचे ! ।
वागवि तूं सम सर्वांतें. ॥ प्रार्थना०॥ ३ ॥

कर्तव्यें स्वकुटुंबाला हितकारक तीं तीं काय ? ॥
केचीं तीं स्वसमाजाला दावितिल सुखाचा ठाय ? ॥
इहपरत्र निजदेहाच्या सार्थकासि कवण उपाय ? ॥

हें सर्व कळावें ह्मणुनी. ।
लोटांगण तुझिये चरणीं ।
तूं दीनदयाळू जननी. ।
रक्षिशील निजदुहितांतें. ॥ प्रार्थना० ॥ ४ ॥

तूं सर्व श्रेष्ठ भवानी जगताची माता असशी. ॥
परमेश्वर पतिसान्निध्यें संसार एवढा करिसी ! ॥
साक्षित्वचि घेउनि त्याचें व्यवहार किती चालविसी ! ॥

लवमात्र श्रम त्यालागीं ।
न पडाया झटसी आंगीं ,

संतुष्ट तुझ्या अनुरागीं ।
वाटे तो प्रभु सर्वांतें. ॥ प्रार्थना० ॥ ५ ॥

अंश तुझ्या अनुकरणाचा यत्किंचित अमुचे ठायीं, ॥
जरि उतरे तरि संसारीं आह्मासि न अवघड कांहीं. ॥
गृहिणीपद सार्थ करोनी, पुरुषांप्रति सुखवूं पाहीं. ॥

पाहिजे कृपाचि तुझी ती- ।
जी शिकवी सुधर्म-नीती; ।
नाना त्या जनपदरीती; ।
उच्च मनोवृत्ती करिते! ॥ प्रार्थना० ॥ ६ ॥

---

## निंदक गौरव.

( आर्या )

सुजनांला त्यानंतर नमन करूं प्रथम दुर्जनांला हो !
न अपानापूर्वी मुख धुउनि घडे शुद्धिचा जनां लाहो. १
भग्न घटाची खपरी घेउनि माता हरी मळ स्वकरीं
शतपट उपकारी खळ तिजहुनि; तें कार्य निजमुखेंचि करी. २
ज्याला तृप्त कराया सुखवाया तेंवि रंजवायास
पुरती दोषचि! न लगति विद्या-धन-गुण-सुकीर्ति-सायास! ३
अति मलिन दोष शोधन खळ नसते एथ कोण तरि करिते?
होते स्वच्छ कसे हे ग्राम, न भंगी वराहही तरि ते? ४
ही काय सान उपकृति, रुचिर सुगुण निवह विमलजलसम, तो
स्पर्शुनि न दूषवी खल! सूकरसम दोषकर्दमीं रमतो? ५

व्याल तसा कालचि खल! कीं दुग्धहि पाजि त्या मुलां चावे!
सुजन क्षुद्र खरा; जो मूढोद्धारार्थ नित्य रांचावे. ६
सद्गुणयुत सुजनहृदय जिंकुनि करि मलिन कुजन सहवास;
गंधवह गटारांतुनि येतां त्या जवळि कोठुनि सुवास? ७
व्यालाहुनी खलाचें सामर्थ्य विशेष वर्णिती सुकवी:
एकासि दंश करुनी दुसऱ्यातें जीवितासि जो मुकवी! ८
व्यालाहुनी खलाला श्रेष्ठ ह्मणाया प्रमाण अन्य असे:
पहिला नकुलद्वेषी; सुकुलद्वेषी दुजा जगीं विलसे! ९
व्यालाहुनी खलाचा थोरपणा आणखी प्रसिद्ध पहा:
मणि-मंत्र-औषधीनीं व्याल शमे जेंवि तेंवि कधिंच न हा! १०
हालाहला! नको तुज गर्व ' सकल दारुणांत मी वर ' हा,
तुजहुनि शतपट दारुण खलकृत्यें असति भूमिवरति पहा! ११
उदधीस तरि; तमिस्रा दीप; तसें व्यजन होय नीवाता:
उन्मत्त हस्तिला सृणि इत्यादि उपाय निर्मि जरि धाता; १२
तरि खळजनमन पळहि न वळविन ऐसी उमेद त्या उरली!
उर लीन होउनि जणु नैराश्यीं, सकल तत्कृतिही सरली! १३
पिशुनत्व हीच विद्या! परदूषण हेंच भूषण ज्याचें!
परदुःख हेंच सुख ज्या! शिव शिव! नकळे कुठें जनन याचें!!१४
होय षडक्षर-पंडित तो शिकवाया शिवासि सरसावे!
वसनाशन मिळतांक्षणिं धनदा जिंकावयासि जो धांवे! १५
अर्थ ग्रहणज्ञानाहुनि मोठें गालिदान-विज्ञान;
रक्त पिण्याहुनि मशककणित बहू किरकिवितें जसें कान १६
थोरहि गुण न दिसति तुज! लघु दोषहि हुडकुनी ग्रहण करिसी!
विखरुनि केश अलंकृत मर्कट ऊ शोधुनीच काढि जसी. १७
त्यागुनि शुचिसद्गुण तूं मलिनत्वें खुलसि खलवरा! फार;
चंद्रास्तीं निबिड तमीं जीमूत तसा सशब्द परिवार. १८

दोषालोककुशल जो: काकाहुनि कर्कशा तसी वाचा;
दर्शन भयप्रदर्शन! घुबड सधर्मा खरोखर खलाचा १९
प्राचीप्रभा स्वभावें तुज दिपवी? रुचुनि सर्व जातीस;
कुत्सवनास्थित घूका! योग्य शिव्या नित्य वा! तुझ्या तीस!!२०

---

## अबला गौरव.

### गीति.

शिवनयनदग्ध मदनाप्रति निजनयनें करोनि जीवंत, ॥
शिव जिंकिला जयांनीं काय न त्या सुंदरी विजयवंत? १
कुंडें जणु अमृताचीं; किंवा राशीच होत रत्नांच्या; ॥
ठेवी प्रेमाच्या: कीं सार्थकता योषिता प्रयत्नांच्या! २
कान्तिप्रद चन्द्र, तसा पुष्पाकर तो वसन्त, रसिकवर- ॥
मन्मथ; अशा तिघांनीं रचिल्या योषा तरीच त्या रुचिर:- ३
ना तर वेदाभ्यासी मठ्ठ जरठ तो शकेल काय विधी- ॥
निर्माण मृदुमधुर स्त्रीरूपी प्रीतिच्चे अपूर्व विधी? ॥ ४
किंवा महेश्वराच्या भीतीनें वेष घेतला मदनें ॥
प्राणाशेनें स्त्रीचा! सौंदर्याचीं तरीच हीं सदनें! ५
आह्मी न पाहिल्या त्या सुरगंधर्वादि सुंदरा वनिता; ॥
परि ह्याच पुरेत गमे पाडाया विधितपःसमुद्र रिता! ६
भ्रूधनु आकर्षुनि हळु नयनाहुनि जे कटाक्षशर सुटती; ॥
प्रेमरसें ओथंबुनि मुखकमलांतूनि शब्दही फुटती; ७
मधुराहुनि मधुर तसें परिमित लाजूनि थोडकें हंसणें; ॥

मौजेनें चलताना पाउल चुकणें; अहेतुकचि रुसणें; ८
इत्यादि हीं स्त्रियांचीं स्वाभाविक भूषणेंचि दिसति जरी ॥
लोकत्रयीं तयां जय देणारीं आयुधेंच होत खरीं! ९
मधुरा सरस्वती मुखिं, कर्णीं मणिकर्णिकाप्रवाह तसा, ॥
माथां सुंदर वेणी, एणी नयना न तीर्थराज कसा? १०
बाहू हींच मृणालें, वदन कमल, उदक होय लावण्य, ॥
श्रोणी तट तीर्थशिला, मत्स्यस्थानीं सुनेत्रयुग गण्य, ११
शेवाळ केश होती, जोडी स्तनयुग्म चक्रवाकांची. ॥
मदनशरानल विझण्या स्नान करावें सरोवरीं ह्याचि. १२
स्मित हावभाव लज्जा भीती वैमुख्य अर्धवट वघणें ॥
मत्सरवचनें रुसणें हें, पाशीं युवजनांसि अटकवणें. १३
स्त्रीचें मुख नोहे हें मृगलांछनरहित चंद्रबिंब असे; ॥
स्तन नव्हत सुवर्णाचे अमृतानें पूर्ण कुंभ तसे; १४
हा केशकलाप नव्हे मदनास्त्रांची समृद्ध ही शाला; ॥
नेत्रद्वय दिसतें तो खोडा अडकाविण्यास तरुणांला. १५
स्तनभार गुरू; भास्कर तिलक; वदन चंद्र; रदन होय कवी; ॥
मंगल अधर; शनैश्चर पद; सौम्य तनु. ग्रहावलीच नवी! १६
उत्तम दृश्य कवण हो? वदन प्रेमप्रसन्न तरुणीचें? ॥
काय सुवासिक? त्याचा परिमल! सुश्राव्य? वचन रमणीचें! १७
सुस्वाद्य काय? त्यांचे अधरोष्ठ! स्पर्शनीय? तत्सुतनू! ॥
रसिकांचें ध्येय कवण? नवयौवन! सर्वदा असाच मनू! १८
खचितचि विपरित समजुत कविंची कीं ते स्त्रिया ह्मणति अबला,
इंद्रादिकां कटाक्षें जिंकिति त्या वाटती तशा न मला. १९

## माळ्याचे आभार.

### साकी.

मालाकारा! सख्या जेव्हां होता कडक उन्हाळा;
चंडकिरण बहु तप्त होउनी सोडि उन्हाच्या ज्वाळा; १
अशा भयंकर काळीं शिंपुनि थोडें थोडें पाणी,
बहु करुणेनें या रोंपाला वृक्षदशा जो आणी; २
तो तूं कोठें? आणी कोठें वर्षाकालिक मेघ?
जगभर वर्षुनि पसरवीत जो विपुलजळाचे ओघ. ३
अधिक कुणाचे मानावे या वृक्षानें आभार?
मेघाचे कीं माळ्याचे हा उघड दिसेचि विचार. ४
विपत्तिकाळीं साह्य न मिळतां जाता जरी मरून
वृक्ष तरी उपयोग कोणता उदक तुडुंब भरून ? ५
लहान रोंपापरी मुलें हीं पोसुनि शिकवुनि, थोर-
केल्यावांचुनी निभेल कैसा जीवनसंगर घोर? ६
शरीरशक्ती, मानसशक्ती, विवेकशक्ती तिसरी
कशा वाढतिल वाल्यापासुनि वाढविल्या ह्या न तरी? ७
वर्षाकाल जलानें तैसें जग हें संपत्तीनें
भरुनि असे परि लक्षाधिक जन मरतात विपत्तीनें! ८
याचें कारण मृततरु समजे त्रिशक्ति विरहीत लोक,
कुजुनी झिजुनी व्यर्थ जाति; हें बघणाराला शोक! ९
मृततरु पासुनि सजीव तरुंला पोषण मिळतें जैसें,
मूर्ख नरांपासुनि विद्वानां धन सांपडतें तैसें; १०
अविद्वान देशांतें खाउनि सबळ होति ते देश
असती जे विद्वान, तुह्मीही व्हा ह्मणुनी उपदेश. ११

मुलें आमुचीं रोपें तरुचीं वाढविती जे सदय,
पालक शिक्षक माळी ज्यांचें मृदुल प्रेमल हृदय. १२

किति वानावी महती त्यांची? कुंठित होते वाचा.
इहलोकीं अवतरल्या कीं त्या मूर्ती भगवंताच्या! १३

जगत्पोषणासाठीं ज्या ज्या वावरतात विभूती;
ते ते विश्वंभरशक्तीचे अंश न कैसे होती? १४

अन्नदान तात्पुरतें पोषण; त्याहुनि विद्यादान
श्रेष्ठ असे; कीं जन्मभरहि तें पोषण करितें छान. १५

यास्तव विद्यादान करिति जे त्यांच्या उपकाराची
किति वर्णावी महती? फेडहि कधीं करवे त्यांची १६

---

## विद्यार्थ्यांची प्रार्थना.

### पद

हाचि करा उपकार।
बाबा! हाचि करा उपकार. ॥ धृ० ॥
विद्याभ्यासा लावा आह्मां; ।
ठेवुं नका घरिं फार. ॥ काका! हा० ॥ १ ॥
अभ्यासाचें वय जाई तें ।
घेत नसे माघार. ॥ आपा! हा० ॥ २ ॥
विद्याहीन अह्मी तरि तुमची ।
अब्रू झालिच पार! ॥ अण्णा! ॥ ३ ॥
पिता नव्हे तो शत्रु; जयाचा ।
विद्याहीन कुमार. ॥ ताता! ॥ ४ ॥
दिवसो दिवशीं विद्येविण नच ।
चालतसे व्यवहार. ॥ आबा ॥ ५ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं.



स्यर्वेहारोचित मुलें करा । हा०
वडिलांचा अधिकार. ॥ मामा ! ॥ ६ ॥
विद्येसाठीं खर्च लागतो
समजुं नका तो फार. ॥ नाना ! ॥ ७ ॥
सद्विद्येस्तव दहा खर्चितां ।
मिळती सहज हजार. ॥ दादा ! हा० ॥ ८ ॥
विद्येसाठीं वेळ खर्चिणें ।
त्याचें मूल्य अपार. ॥ बापू ! हाचि० ॥ ९ ॥
वरकामाला मुलें लावितां ।
बुडते विद्या ठार. ॥ भाऊ ! हा० ॥ १० ॥
विद्योद्योगविहीन मनुष्यें ।
केवळ भूमिस भार ! ॥ नृपहो ! हा० ॥ ११ ॥
मूर्ख आळशी उद्योग्यांचें ।
धन करिती अपहार. ॥ जनहो ! ॥ हा० ॥ १२ ॥
इहपरलोकीं मित्र कोणता ।
विद्यासम सहचार? बुधहो ! हा० ॥ १३ ॥
दारिद्र्यादिक संकटकाळीं ।
कीं विद्या आधार. ॥ ह्मणुनी हा० ॥ १४ ॥
सदैव सुखकर भवद्व्रततां ।
विद्याऽऽरामचि गार. ॥ यास्तव हा० ॥ १५ ॥

# हिंदु कुटुंबिणी.

( वीरा भ्रमरा जन्मुनि० या चालीवर )

हिंदु कुटुंबिण झालें त्याचें सौख्य तुला सांगतें
यथामति; बैस सखे! ऐक तें; ॥ ध्रु० ॥
वर्ष सातवें सरतां वडिलीं लग्न करोनी दिलें,
घराणें बालबोध पाहिलें; ॥
घरामाजि पन्नास माणसें कुटुंब बहु थोरलें,
पुरातन चालींनीं घेरलें. ॥
तिघे बंधु मामंजी मोठे तेजस्वी लाभले
सपत्निक एकविचारी भले.
( चाल ) भावोजी माझे सगळे मिळुनी दहा; ।
जावाही झाल्या सहज तेवढ्या पहा; ।
लहान मोठाल्या नणंदुल्या गे! सहा; ।
तऱ्हेतऱ्हेचीं विपुल लेंकुरें! सुविस्तीर्ण घरहि तें
गजबज दिवसा रात्री तिथें. ॥ १ ॥ हिं० ॥
लहान होतें वय मज ह्मणुनी प्रथम मौज वाटली;
संवइनें प्रीति पुढें दाटली. ॥
वेगवेगळे स्वभाव वळखुनि वागाया शीकलीं
जाहलें सहनशील मी भली! ॥
आज्ञाधारक कसें बनावें-युक्ति मतिस बाणली
कोंवळी वेल तशी ताणलीं! ॥
( चाल ) घुसफुसणें बाई क्षणिक जरी जाहलें, ।
वडिलांच्या धाकें विसरावें लागलें; ।
दुराग्रहा तरि स्यां दूरचि भिरकाविलें! ।

कुटुंब अमुचें लहानसें गे! राज्याचि जणु नांदतें
सुयंत्रित नियमांनीं बद्ध तें! ॥ २ ॥ हिं० ॥
अन्यायाला जिथच्या तेथें शासन एथें घडे,
सुकृतिला बक्षिसही रोकडें! ॥
आचरणावरि बहुत जणांची नजर सारखी पडे;
सवड नच दुश्चरिता सांपडे. ॥
कुटुंबांत एकाला झालें स्वल्प जरी वांकडे,
तयाचें सर्वांसाचि सांकडें! ॥
( चाल ) हिताऽहितीं आम्ही गुंतुनि सगळीं जणें, ।
'कुटुंब' ह्या सूत्रीं आहों पुरतेपणें, ।
सुखदुःख न एका बहुधा आगळें उणें, ।
श्रमविभाग-तत्व न कळतांही आचरणीं येई तें-
वाढवी हित, मजला वाटतें. ॥ ३ ॥ हिं० ॥
माहेरीं असतानां आलें दुखणें मज एकदां
भयंकर! घाबरलें मी तदां! ॥
शुश्रूषेला मनुष्य न मिळे फार तिथें आपदा!
असोनी घरांत बहु संपदा! ॥
विभक्त झाले ढुंकुनि न बघति कुणी कुणाला कदा
मत्सरग्रस्त सर्व सर्वदा! ॥
( चाल ) निरुपायासाठीं तशीच उचलुनि मला ।
सासरीं आणितां त्रास बहु जाहला; ।
श्रम झाल्यायोगें ज्वर तो संतापला! ।
परि सगळ्यांनीं झटुनि हटविलें माझ्या अपमृत्युतें
याहुनि सुख मोठें कोणतें? ॥ ४ ॥ हिं० ॥
पुरुषमंडळी वेगवेगळे धंदे करुनी जरी-

मिळविती द्रव्य, देति तें घरीं. ॥
कपट लेशही येतनसे गे! एकाच्या अंतरीं
भरंवसा पूर्ण मालकावरी!
जमा खर्च उघडा सर्वांला मिळे पहाया, तरी-
कुणाची सत्ता न पईवरी! ॥
( चाल ) घरधनी विचक्षण दे योग्यायोग्य तें.
पोषाखहि करिती सगळे त्याच्यामतें. ।
विडि तंबाकूचें नांवाचि नाहीं तिथें. ।
शयनमंदिरावांचुनि रात्रीं तांबुलभक्षण न तें-
पुरुषां घडे! कुठुनि आमुतें? ॥ ५ ॥ हिं० ॥
हसणें, खिदणें, अधिक लाजणें, गप्पाष्टक झोंकणें,
खवळुनि मोठ्यांनीं बोलणें; ॥
चोरुनि पर पुरुषांसि निरखिणें, समूहांत हिंडणें,
अकारण नटुनि-सजुनि मिरवणें, ॥
कुलस्त्रियांचे दोष ह्मणुनि हे बाळपणीं त्यजविणें;
मुलींसह सुनांसही शिकविणें; ॥
( चाल ) सासवा स्वताच्या पतींप्रती कांपती! ।
तैशाच तयांच्या सुना तयांला भिती! ।
धाकट्या सुना-मुलि हीच रीति उचलिती! ।
थोरांवरि पूज्यता, लहानीं अकपट वात्सल्य तें!
विरुद्द हें आमुच्या घरिं नांदतें. ॥ ६ ॥ हिं० ॥
नित्यासाठीं स्त्रियांस वस्त्रें तुल्य, तसे डागिने-
कुणाला अधिक न सहसा उणे. ॥
परंतु मोठीं वस्त्रें तैसे अलंकार बनविणें-
संग्रहीं राशी वरि ठेवणें. ॥

आप्तगृहांच्या मोठ्या कार्यीं ज्या स्त्रीतें धाडणें--
पडे, तें तीस तयीं सजाविणें ! ॥

( चाल ) वस्तुंचा लाभ ह्या सर्वांला सारखा; ।
घेत असों आम्हीं मान्य जसा पालका;
आळीपाळीनें सर्वजणी बायका ! ।

परि ' सद्गुण हे मुख्य डागिने ' हेंचि मनीं बिंबतें--
महज्जनसहवासें तत्व तें ! ॥ ७ ॥ हिं० ॥

वरचेवरि हरिदास--पुराणिक येती; परि त्यां घरीं
न ठेविती; बिऱ्हाड देती दुरी ! ॥

कथा--पुराणें अवश्य करविति घरांत वरचेवरी
समस्तां ऐकविती आदरीं ! ॥

परि त्यांचा सहवास वर्जिती झटुनि सर्वतोपरी !
दुरोनी वंदिति देवापरी ! ॥

( चाल ) ही रीतचि बाई ! अमुच्या घरची अशी !
बरि--वाईट ह्मणती ज्यांना वाटे जशी ! ।
परि आज्ञा लागे पाळावी दिनानिशीं ! ।

मामंजींच्या कडकपणाचें भय पुष्कळ वाटतें -
घरींच न, गांवीं सर्वांस तें ! ॥ ८ ॥ हिं० ॥

चतुर कारकुन शिपाइ किंवा परका नच ठेविती -
काम तें मुलांकडुनि रेटिती ! ॥

गांवांतिल परि चतुरां स्नेहें-धनेंहि वश राखिती
प्रसंगीं शब्द न जे मोडिती ! ॥

नित्यासाठीं साधेभोळे गडी बळें निवडिती !
तयांतें उद्योगीं भिडविती !

( चाल ) व्यवहारीं पैसा कोणाचा न हरिती; ।
गरिबांवरि कारिती यथाशक्ति उपकृती; ।
अधिकारी लोकां विशेष बहुमानिती; ।
कुटुंबिकां शिकविती 'धनापरि राखावें सत्य तें;
भजावा राम सदा सुव्रतें.' ॥ ९ ॥ हिं० ॥

---

## सासरचा उन्हाळा.

( चालः- चंद्रकांत राजाची कन्या. )

न सोसवे हा कडक उन्हाळा नाथ! मला आतां
सांगा कोठें थंडगारशा हवेवरी नेतां?
पहा सकाळीं नऊ वाजतां रखरखतें ऊन्ह;
नाजुक माझी तनुवल्ली ही जाते करपून!
घामानें सर्वांग थवथवे ! डोळ्यांची आग
होत असे! भणभणित धुंद जड नित्य शिरोभाग!
काळिज धडधड उडे! हस्तपद होती संतप्त!
व्यापुनि सगळें अंग न होई घामोळें तृप्त!
मंद जाहली क्षुधा; लागते वरचेवर तान्ह!
तृप्ति न वाटे त्रिकाळ करितां थंड जलस्नान.
समय रात्रिचा होतां मग तर पुसूं नका हाल!
अशी रात्र झोंपेविण जाते तळमळण्याखाल!
पहांट होतां जरा लागतो न लागतो डोळा;
तितुक्यांतचि संपादुनि घेतें निद्रेचा सोहळा!
आजारी मी पडेन एथें राहिन असिच तरी

बाबा प्रतिवर्षी मज नेती उंच गिरी- शिखरीं.

*                    *                    *

ऐक जिवलगे! शांत मनानें मम भाषण थोडें;
  म्हणजे होइल दूर तुझें हें भीतीचें घोडें.
माहेरीं जे तुझे उन्हाळे गेले आजवरी,
  ते सारे वेगळे! तयांची पावे हा न सरी.
सांप्रतचा हा गरिब उन्हाळा न शिवे कुलवधुला:
  सासुरवासी पतिव्रतां त्या धीर न बघण्याला.
कारण बघ तूं माहेरीं जें कुसुमचि मृदु मन तें
  कुलयुवतीचें सासरिं येतां कठिन वज्र बनतें!
अशा मनाच्या स्वाधीन सदा ज्यांची तनु वागे
  लेशहि पीडावयाला तयां नच शक्ति कुणा गे!
आई माझी सासु तुझी ही तुजहुनि सुकुमार
  माहेरीं असतानां होती; ख्याति तिची फार.
परि येथें ती येतां झाली जणूं वज्रदेहा;
  स्वयंपाकसह सर्व करुनि ह्या शोभविते गेहा!
हिला हिंवाळा तसा उन्हाळा तसा पावसाळा
  नेत्र उघडुनी पहावया भी, भीरु जसा काळा.
स्वयंपाक जी दुपारीं तसी करिते रात्रीस;
  सेवक जीचा अग्नि! उन्हाळा काय करी तीस?
दृढ निश्चय आणि संवय आपली अंकित जें होय,
  तें सुखदुःखा न देऊं शके सोय गैर होय.

खरें खरें हो प्राणनाथ! मज आठवलें आतां;
सीतेला वनवास जाहला सुखकर वनिं फिरतां!
निश्चय आणी कर्तव्यावरि वसतां दृढ चित्त,
दुःख तेंच सुख व्हाया दुसरें लागे न निमित्त
आज पासुनी कर्तव्य असें मानुनि अभ्यास
सहज उन्हाळा सोसायाचा करितें मी खास.
सहवासें तुमच्या न साधलें इतुकें जरि मजला,
तरि बेहेत्तर यांतचि जीवनदीपहि जरि विझला!
उन्हाळयास भिउनी यानंतर गृह नच सोडीन;
ठरलें कर्तव्य करायाचा नियम न मोडीन.
कालचक्रगतिवशें उन्हाळा जाईल निघून;
शीण सकळ भागवील वर्षाकालहि येऊन.
किति एकांच्या प्रियदेशावरि आज विपत्काळ
प्राप्त जाहला असे! उन्हाळा किति तो विक्राळ!
देशभक्त परि देह रक्षणासाठीं नच पळती.
धैर्ययुक्त निज कर्तव्याला तिळभरहि न खळतां.
अशांत मेले किंवा जगले तरि त्यां साफल्य.
'राम' ह्मणुनि मरणारहि जैसें गांठी कैवल्य.

# दोघी बहिणींचें हितगुज.

( चाल–दोघि सवति भांडती पति भांगट गुंगा )

बहु दिवशिं भेटुनी हितगुज वदती गृहिणी ॥
कर्कशा प्रेमला ह्या दोघीजणि बहिणी. ॥

॥ ध्रुवपद ॥

कर्कशा ह्मणे ऐक गे ! प्रेमला ताई, ।
मिळमिळित तुझा हा स्वभाव भारिच बाई !
ह्या मुळें तुझ्या स्वाधीन राहि का नवरा? ।
अति भोळसरपणा कोणासहि हा न बरा. ॥
मी पहा कशी घरीं कडक वागतें नित्य,
ह्मणुनीच मला भीतात सर्व ! हें सत्य.
मज रुचे न ऐसें कांहीं । जरि दिसे, ॥
तत्क्षणींच रुसुनी गेहीं । मी बसें;
कधिं कधीं उपासहि साहीं । थोरसे; ॥
कितिएक समयिं 'मी जीवचि देतें' ह्मणुनी ।
विहिरीवरि चढतें! सगळीं मग जाती भिउनी!!
बहु दिवशिं० ॥ १ ॥
मज घरांत जें जें हवें वाटतें तें तें
कवणास न पुसतां उचलुनियां मी घेतें ॥
जरि सासु सासरे चकार वदतिल मातें ।
तरि शिव्यागाळिनीं यथास्थीत त्यां पुजितें ॥
नणदुल्या समोर न येति भयें ! कीं त्यांतें
सामर्थ्य ठावुकें या हस्तांचें पुरतें ! ॥
कधिं दीर न पाहुं शकती ! मजकडे ।
जावांचें मुख मज पुढतीं । न उघडे !

प्रत्यक्ष पतीची मूर्ती । गडबडे ! ।
यापरी सासरीं प्रभुत्व निःशंकपणीं ।
मज दिलें असे स्वातंत्र्य पुरें सर्वजणीं ॥
बहु दिवशीं० ॥ २ ॥
गृहधंदा बहुधा कधिं मी न करीं कांहीं ।
मज नसे सकाळीं उठावयाची घाई ॥
मजवरी श्रमाचें जोखिम कसलें नाहीं ।
परि सुखोपभोगा मात्र सिद्ध मी राहीं ।
मीं नित्य नेसतें उंचउंचशीं लुगडीं ।
तीं मिळतीं न तरी खुबुनि घालितें फुगडी ! ॥
सणवार कोणता जेव्हां । येतसे ।
डागिना नवा मी तेव्हां । घेतसें
लग्नकार्य कोठें केव्हां । बघतसें ।
प्रत्येक समय सुखलाभांचा मी जपुनी
साधून घेतसें मजापासुनी टपुनी ॥
बहु दिवशीं० ॥ ३ ॥
प्रेमळा वदे मग ऐक कर्कशे-आक्का ।
स्थिति ऐकुनि तुझि मम हृदयीं बसला धक्का ॥
अशि कृती रुचो मज न स्वप्नांत कधींही ।
तुझि तुलाच होवो लक्षलाभ ती बाई ! ॥
मज तुझ्या परिसही सौख्य घरीं बहु आहे ।
सासरीं प्रभुत्वहि नित्य वाढताचि राहे ॥
मत्स्वभाव जो जन्माचा । मृदु असे ।
सासरीं समस्तां साचा । रुचतसे ।
भाग जो मनीं प्रेमाचा । वसतसे ।
तो दिव्य मंत्रसा जनमानस वशीकरणीं ।
मज साह्यभूत होतसे पहा आमरणीं ॥
बहु दिवशीं ॥ ४ ॥

मज जेव्हां कोणी वाइट कांहीं ह्मणतें ।
गुपचूप ऐकुनी तेव्हां तें मी घेतें ॥
अपराध त्यांत जरि दिसला माझा मातें ।
तरि पुन्हां तसें घडूं नये ह्मणोनी जपतें ॥
परि जरी वाटलें अपराधाविण मज तें ।
तरि वेळ बघुनि युक्तिनें तसें हळु कथितें ।
दुसऱ्याच्या अपराधातें । साहुनी ।
गोडिनें हळुच तो त्यातें । सांगुनी ।
केव्हां तरि समजुनि देतें । मागुनी ।
परपुरुष सर्व ते बाप--बंधुसे गणुनी ।
वागतें स्त्रियांशीं आया-- बहिणी ह्मणुनी ॥
बहु दिवशीं० ॥ ५ ॥
मी नम्र बहु परी भिउनि वागतें सर्वां ।
प्रत्येक जणाची मनीं बाळगुनि पर्वा ॥
प्रेमानें घेत्यें काळजि मी सगळ्यांची ।
विश्वासपात्र मैत्रीण जाहल्यें त्यांची ।
जें गोड हितावह सत्य तेंचि हळु वदतें ।
ह्मणुनि गे ! समस्तां भाषण माझें रुचतें ॥
मी शांत असुनि आनंदीं । राहतें ।
नच कसल्या दुर्गुणफंदीं । वाहतें ।
श्रम सगळे गृहसंबंधीं । साहतें ।
त्यामुळें बहु श्रम देति घ्यावया न कुणी ।
सगळींच करिति मज साह्य पहा चहुंकडुनी ॥
बहु दिवशीं० ॥ ६ ॥
मी सासुबाईला मुलीसारखी गोड ।
मामंजी नित्यचि सिद्ध पुरविण्या कोड ॥
दिर भावोजी मज बहिण तशी मानीती ।

वायका त्यांच्या अधिक त्याहुनी गणिती ॥
नणदाहि आपुली मैत्रिण ह्मणुनी शिणती ।
सगळींचं घरांतिल मुलें ' मांझि ' मज ह्मणती.
देवता तशी मज पुजिती चाकर ।
माझिया निरोपा राहती सादर ।
पोळिहूनि वहु मानीती भाकर ।
मज खुद्द लेखिती पुऱ्या प्रीतिची खाणी ।
अर्धांगी नव्हे दासी मी वरकरणीं ॥
बहु दिवशिं० ॥ ७ ॥
यापरी असे मम सौख्य सासरीं ! आतां ।
तुज कळेल वाइट बरें विवेकें पाहतां ॥
जरि तुझी तुला सुखकारि वाटली रीत ।
परिणाम करिल ती खास पुढें विपरीत
तारुण्य आणि सौंदर्य गडे ! स्थिर नाहीं ।
तें स्मरतां महती तुझी उरेल न कांहीं ॥
याकरितां बाई ! आतां । हें करीं ।
निजजनीं चांगली ममता । मनिं धरीं ।
आजवरीची निष्ठुरता । करिं दुरी ।
जरि शांति दया प्रेम वसे अंतःकरणीं ।
तरि विजय आणि आराम तीनही भुवनीं ॥
वहु दिवशिं० ॥ ८ ॥

---

## सपत्नी मत्सर टिका.

श्लोक ( शिखरिणी. )

अनेकां कन्यांचा मिळुनि जनिता एक असला ।
तरी त्यांच्यामध्यें मुळिंच नसतो द्वेष कसला ; ॥

गुलतुरंग,

पतीनें अन्यस्त्रीमुख निरखिलें त्यां अर्थी कळे ।
सपत्नीच्या वृत्तें हृदय तरि कां तत्क्षण जळे? ॥ १ ॥
जशा एका मातेप्रति बहुसुता सेविती सुखें;
जशा एका भावा भजति भगिनी तोषितमुखें ॥
पतीशीं एका कां बहु युवतिंच तेंवि न जुळे ।
सपत्नीच्या वृत्तें हृदय तरि कां तत्क्षण जळे? ॥ २ ॥
जरी काका मामा अधिकजण [illegible] पुरता;
जरी आजा आजी पृथक नसतां स्नेह उरतो; ।
जरी एका भूपीं बहुमनुजसुप्रेम न ढळे; ।
सपत्नीच्या वृत्तें हृदय तरि कां तत्क्षण जळे? ॥ ३ ॥
रडे तान्हें बाळ क्षितिवरि; तुह्मां फावत नसे; ।
तधीं अन्य स्त्री त्या उचलुनि जरी पाजित बसे; ॥
तिच्या स्नेहें डोळे भरुनि तुमचे अश्रुहि गळे! ।
सपत्नीच्या वृत्तें हृदय तरि कां तत्क्षण जळे? ॥ ४ ॥
अहो एका गेहीं बहुजण मनुष्यें निवसती; ।
गुण्यागोविंदानें सकलगृहकर्मेंहि करिती; ॥
दुजा ठेवी स्वामी तरि न पहिला सेवक पळे; ।
सपत्नीच्या वृत्तें हृदय तरि कां तत्क्षण जळे? ॥ ५ ॥
स्वकार्यीं अन्यानें लवभरि सुधां साह्य करितां ।
तुह्मीं मोठी त्याची उपकृति मनामाजि धरितां; ॥
तयाचे प्रीतीशीं सहज तुमचें अंतर वळे; ।
सपत्नीच्या वृत्तें हृदय तरि कां तत्क्षण जळे? ॥ ६ ॥
तुह्मी जात्यापाशीं बसुनि दळुनी फार दमतां;
दुज्या स्त्रीनें सारें दळण तुमचें पूर्ण करितां, ॥
तिच्या आभारांनीं सुमन तुमचें तों विरघळे, ॥
सपत्नीच्या वृत्तें हृदय तरि कां तत्क्षण जळे? ॥ ७ ॥

श्रमाचा वांटा जी सहज तुमच्या धारण करी;
पतीचीही सेवा द्विगुण घडण्या साधन पुरी; ॥
सदां तुह्मां तीची मदत हरकामीं जरि मिळे,
सपत्नीच्या वृत्तें हृदय तरि कां तत्क्षण जळे? ॥ ८ ॥
स्वमित्राच्या मित्रावरि जरि निजप्रेम जडतें, ॥
असें जेथें तेथें जरि उघड दृष्टीस पडतें; ॥
प्रियाला माझ्या ही प्रिय, ह्मणुनि तुह्मां जरि कळे,
सपत्नीच्या वृत्तें हृदय तरि कां तत्क्षण जळे? ॥ ९ ॥
जधीं जातां तुह्मी जरुर ह्मणुनी मातृसदनीं,
मनाजोगे कैसे पडति पतिच्या ग्रास वदनीं; ॥
अशा चिंतादाहें मृदुल तुमचें चित्त वितुळें,
सपत्नीच्या वृत्तें हृदय तरि कां तत्क्षण जळे? ॥ १० ॥
विटाळाची पाळी अचुक तुमची चार दिवस,
पडे मासोमासीं, करवि जरि सैंपाक पतिस; ॥
तसे गार्भिण्याचे प्रसवमहिन्याचेहि सगळे;
सपत्नीच्या वृत्तें हृदय तरि कां तत्क्षण जळे? ॥ ११ ॥
जरी वेदाज्ञेनें पतिस बहु जाया करवती;
असे पोसायाची कुवत पतिमध्येंहि जरि ती; ॥
जरी ह्या रीतीनें कधिकाधिं अपुत्रत्वहि टळे;
सपत्नीच्या वृत्तें हृदय तरि कां तत्क्षण जळे? ॥ १२ ॥
" जरी येती जाया बहुत करितां एक पुरुषा,
नसावे कां स्त्रीला बहुत पति ? " हा तर्कहि मृषा ॥
रजोगर्भादींनीं व्यवहृति न त्यांपासुनि खळे;
सपत्नीच्या वृत्तें हृदय तरि कां तत्क्षण जळे? ॥ १३ ॥
जरी एकीं निष्ठा शुचि सुवनितांचाचि गुण हा,
प्रयत्नेंही लाभे तरलमति पुंसां नच महा; ॥

जरी ह्या सौगुण्यें युवतिसचि सद्भूषण मिळे
सपत्नीच्या वृत्तें हृदय तरि कां तत्क्षण जळे ॥ १४ ॥
जगीं कंदर्पाचे पुरुष जितुके दास बनती,
स्त्रिया कोठें सुद्धां सहज तितुक्या भ्रष्ट नव्हती।
असा सृष्टीचाचि क्रम जरि तुह्मांला स्फुट मिळे,
सपत्नीच्या वृत्तें हृदय तरि कां तत्क्षण जळे ॥ १५ ॥
दुराचाराला जो सुजन करण्या शासन बरीं
सदाचारी तेणें सतत असणें योग्यचि जगीं ।
न गोघ्नातें शिक्षा मृत करुनि वत्सा, जरि मिळे,
सपत्नीच्या वृत्तें हृदय तरि कां तत्क्षण जळे ॥ १६ ॥
सपत्नीच्या द्वेषें पतिस मुकली कैकयसुता।
सपत्नीद्वेषाचा सुरुचिस फळे ताप पुरता ।
हजारों जागीं यापरि बहु पुरावा जरि मिळे
सपत्नीच्या वृत्तें हृदय तरि कां तत्क्षण जळे ॥ १७ ॥
जगीं सर्व श्रेष्ठ स्मृतिविहितधर्मोदित जरी,
स्त्रियांलागीं मुख्यस्वपतितनु ही दैवत खरी ।
पतीला जें अर्थात् प्रिय, करुनि तें सौख्यचि मिळे;
सपत्नीच्या वृत्तें हृदय तरि कां तत्क्षण जळे ॥ १८ ॥

साकी.

सापत्न्यमात्सर्य विषप्रसंगें,
ज्या मत्सरींचीं जळतात अंगें ॥
टाका गळा मांत्रिक घालितां ही,
बाधा तयां ती शिवणार नाहीं ॥ १९ ॥

---

## गतभर्तृकांस विनंति.

( दो दिवसांची तनु हे साची या चालीवर )

सकल सुज्ञ विधवा भगिनी हो ! विनति एक तुमच्या चरणीं ।
मनोव्याधी मम शमवा वेगें शंका निरसनही करुनी ॥ ध्रु० ॥

दुर्दैवानें पतिधन तुमचें नेलें, काळानें हरुनी!
शोकानळ हा तुह्मां न केवळ, जाळितसे सगळ्या भुवनीं।
माता पितरें सासुश्वशुरें भावंडें तुमचीं घरुनी,
आप्तइष्ट गणगोत मित्रसह, दुःख पावती हें स्मरुनी!
देशबंधु-भगिनींच्या देखिल, अंतरिं येतें भडभडुनी!
बघुनि तुह्मां खेद न पावेसा, सहृदय कोण असे प्राणी!
सर्व समंजस तुह्मांपाशीं, बोलति सादर मृदु वचनीं,
सदयपणें सन्मानचि देतां! छळ सर्वांसचि मूर्खजनीं!
'प्रारब्धाविण देऊं न शके, सुख दुःखाचा लाभ कुणी.
इतर धर्महीं असेंच सांगति, त्यांच्याही ग्रंथांमधुनी.
असें असे तरि अन्य जनांवरि, निजदुःखाचें कां ह्मणुनी,
बळेंचि खापर फोडावें हो! सांगा सुविचारा धरुनी.
हिंदुधर्म त्याचे अभिमानी, यांवरि पडतां जे तुटुनी,
तें काय? वदा! वैधव्या तो धर्म हेतु होतो कुठुनी?
पतिव्रता परधर्मांतिल ही विधवा, राहति कां ह्मणुनी?
मनोव्याधि मम शमवा वेगें, शंका निरसन ही करुनी! ॥ १ ॥
दुसरा प्रश्न असा कीं, तुमचें हृद्गत तुह्मीं निजवदनीं,
कथन करावें; तें सोडुनि कां बोलतसां पुरुषांकडुनी!
का तुमच्यांतिल कुलीन विधवा न दिसे, एकहि जी उठुनी,
पुनर्विवाहोत्सुकता सांगत फिरणारी सदनोसदनीं?
ज्याच्या पोटीं कळ उठते, तें मनुष्य बसतें मुख मिटुनी;
आरड ओरड दुजेंचि करितें! हाका मोठ्यानें पिटुनी!
ज्याची पीडा तयें न कथितां, कथील जरि भलताच कुणी,
कसें खरेपण मानावें हो! वैद्यानें परकीवचनीं?
अर्वाचीन 'सुधारक' नास्तिककविहृदयीं तुम्हीं शिरुनी,
खरेंचि का धार्मिक विधवानो! हितगुज कथिलें गर्हिवरुनी?
संध्या पूजा स्नान सोवळें त्यजिलें 'झूट' ह्मणुनि ज्यांनीं,
तुमचे धार्मिक विचार आले कवणेपरि त्यांच्या ध्यानीं?

'विधवाविवाह' इतुकें ह्मणतां, हात ठेवितां तुह्मि कानीं
तद्विरुद्ध हे बोलति ! कैसें सत्य ह्मणावें लोकांनीं ?
सुधारकांला वकिलपत्र तुह्मिं दिधलें केंव्हां सहि करुनी ? ॥
मनोव्याधि मम शमवा वेगें शंका निरसन ही करुनी
तिसरा प्रश्न, तुम्हां जरि सत्यचि पुनर्विवाह प्रियचि मनीं,
कां ध्याना हो ! करुनि भराभर ? विलंब करितां कां म्हणुनी ?
'पथीं जगद्गुरु भुजंग अडविति' ? एकहि दंत न तद्वदनीं !!
निर्विष ते हें सकलां ठाउक ! फुसफुसती जरि निजसदनीं !!
परधर्मी-अब्राम्हण भूपति मांत्रिक त्या सर्पा धरुनी,
हवे तसे कोंडिति खेळवुनी पेटाऱ्यामध्यें भरुनी !!
पुनर्विवाह प्रतिबंधतटा फोडायासाठीं म्हणुनी
भक्कम तोफा तसे कायदे सुटति धडाधडा त्यांकडुनी !
ऐसे रक्षक रक्षिति मागुनि, सुधारक चमू ही पुढुनी,
तुमच्या मंगलकार्या साह्यक जागृत असती चहुंकडुनी,
इतुका निर्भयपणा ! मग तुह्मां 'हतभागिनिता' ये कुठुनी ?
कःपदार्थ उद्धारक जन ते मरुत सहज डोकीं फुटुनी !
काय ह्मणुनी हो ! साहित्याची पूर्ण सिद्धता ही असुनी,
स्वयंवरें अद्यापि करानां ? सांगा गतभर्तृक भगिनी !
पतिसौख्याहुनि कोणति मोठी गोष्ट शिरे तुमच्या नयनीं ?
मनोव्याधि मम शमवा वेगें शंका निरसन ही करुनी ! ॥ ३ ॥
चवथा प्रश्न, तुह्मीं पुरुषाशीं समता करण्याच्या भजनीं
लागुनि, पातिव्रत्य पवित्र त्यजावया उठलां सजणी ?
'नर करिती कां दुसरी तिसरी पत्नी वृद्धपणीं तरणी ?'
'नारींनीं कां पति न करावे ?' हीच विचाराची सरणी !!
शिवशिव ! ! असली नीच कल्पना येइल का तुमचे स्वप्नीं ?
कीं महिलाव्रज पतित व्हावया युक्ति योजिति भ्रष्ट जनीं ?
निंद्य वृत्तिचा कित्ता घ्यावा काय मूळच्या शुचि सुजनीं ?

किंवा त्यांसचि आणावें हें उचित वदा हो स्वस्थानीं?
पुरुषजात चंचल स्वभावें, वर्ते जरि ती व्यभिचरुनी,
लज्जित तिस कां स्त्रीजातीनें न करावें, शुचिता वरुनी?
समतेच्या का नादीं लागुनि शिरतिल साधू भोंदुजनीं?
किंवा भोंदुस साधू बनवुनि समताकरणें मत सुजनीं?
जळेनाहि कां परि ती समता? दुर्गुणांमुळें ये जमुनी
कशास ती? ऐसें न दिसे कां? सांगा! पुसतें पद नमुनी!
ह्याच विचारें काय कराना पुनर्विवाह तुह्मी अझुनी?
मनोव्याधि मम शमवा वेगें शंका निरसन ही करुनि, ॥ ४ ॥
प्रश्न पांचवा, किंवा तुमची मृतपतिवरची प्रेमधुनी,
परपुरुषपथीं किमपि वळेना एकवचन-पात्रामधुनी;
धर्माज्ञा-प्रामाणिकता हीं दृढ पुलिनें दोन्ही कडुनी;
अडवुनि सरळ वहाया लाविती निश्चय डोहीं सांपडुनी;
शांत. संत, गंभीर चालते पतिप्रीति सुरतरंगिणी;
संतुष्टा हिंदू विधवा ह्या मत्स्यी क्रीडति तिजमधुनी;
क्वचित् दुष्टनर-धीवर आपुलें मदन-जाल तें पसरूनी,
निजकामानल शमवायास्तव, एकादिस नेतो धरुनी!
उदाहरण तें दाखवुनी हे सुधारक भ्रम पाववुनी;
इतर सर्व जलचरींस ह्मणती 'स्वयें चला धीवर सदनीं!
'विषयासक्ति-विहिरींत तथें बहु सुख येथिल सुखाहुनि'।
'एक विहिर आटतां तुह्माला घालूं दुसरींत काढूनी'
धीवरसंगति मत्स्यींस जशी घातक होते त्याच दिनीं!
पुनर्विवाह तसा मानितसां कांहो गतभर्तृक भगिनी?
सांगा सांगा वैधव्यांतचि कांहो रहातां सुख गणुनी!
मनोव्याधि मम शमवा वेगें शंका निरसन ही करुनी! ॥ ५ ॥
प्रश्न सहावा, विधवा दुःखी जरी सुवासिनि वधूंहुनी,
तरि विधवांहुनि अनेकपतिका सुखी ठरविल्या काय कुणी?

वैधव्याहुनि वारवधुत्व श्रेष्ठ मानिती जों न जनीं,
तोंवरि येती प्रचारांत ते पुनर्विवाह कसे करुनी ?
धर्मश्रद्धा, मृतपतिनिष्ठा, जनलज्जा ह्या तिहींहुनी,
कुल-स्त्रियांचा नैसर्गिक गुण, सदाचरण विख्यात जनीं,
समर्थ होतो एकहि यांतुनि त्यांस धराया आवरुनी;
चारहि जमती तेथें शिरातिल, दुर्विचार मनिं ते कुठुनी ?
ह्याच गुणांच्या योगें, विधवा सोशिति दुःखें सर्वजणी,
वपन, व्रत, संन्यास, उपोषण, आपखुषीनें पतकरुनी !
अपंक्त नव्हती पुनर्विवाहें स्त्रिया, अशाही ज्ञातितुनी,
पाट लावणें निंद्यचि मानिति, कां वैधव्यव्रताहुनी ?
' गांवामागें महारवाडा ' या न्यायें भ्रष्टाचरणी,
क्वचित सुवासिनि निघति, कशा मग न निघाव्या विधवांमधुनि?
ह्यामुळेंचि का व्यर्थ होति ते, सुधारकांचे श्रम कवनीं ?
मनोव्याधि मम शमता वेगें शंका निरसुन ही करुनी ! ॥ ६ ॥

---

## प्रेमकुसुममाळा.

आर्या-( प्रियाकडून प्रियेस )

श्रीशकृपेनें होओ तुज नूतन वर्ष पूर्ण सुखदायी ॥
विद्या आरोग्य यशःश्रीनीं सर्वांत हो प्रमुख बाई !
ठोकर न वसो सौख्यीं; न शिवो कापट्य शुद्धबुद्धीस; ॥
बाहेर तशी अंतरिं शुचितेच्या पात्र होइं वृद्धीस ; ॥
इतरांहुनि मोठें सुख तुज लाभो नेंचि कीं मनःस्थिरता; ॥
चालो निरंतर तुझी मति सन्मार्गींच होउनी निरता. ॥

विसर कधीं न पडो निज हृदयांत खऱ्या हितेच्छु लोकांचा
जगतीं रत्नाग्नि भूलो तव चित्त; न पाहुनि भुलो कांचा; ॥
यत्न विशेष पडे या मिथ्या जगतांत सत्य वेंचाया;
अति हितकर हें परि कीं तें न कुणा कधि मिळेचि ठेंचाया।॥
सादरही प्रेमकुसुममाळ सखे! हा कृतज्ञ तव कंठीं ॥
वाहुनि वर्षारंभीं वाट बघत भेटिची समय कंठी! ॥

---

## हरवलेलें पत्र.

कविता ( साकीची चाल )

हृदयाकाशीं प्रेमविधूवरि विकल्प अभ्रें आलीं! ।
मत्सरघन दुःशब्द वर्षले वियोगवर्षाकालीं! ॥
संयोगशरत्समय पावतां अभ्रपटल तें सारें ।
झाडुनि केलें दूर! सखे! तव विश्वासोक्तिसमीरें.
अक्काबाई बरसातन्नि ती आतां उरली नाहीं!
आली कार्तिकपूर्णिमाच्र ही शुभ्र चंद्रिका पाहीं! ॥
पूर्ण चंद्र हा शीतल किरणीं अंतराल करि गार! ।
वनौषधीशा प्रीतिकल्पना वाढवि जोमें फार! ॥
सवें पातला हेमंत पुन्हां सखये तव विरहाचा! ।
हाय हाय! भोगत्रय दुःसह खचित प्रीतिलतांचा! ॥
ह्या थंडीनें करपुनि गल्या कीं त्या नाजुक वेली!! ।
प्रियजनदर्शन-शिशिरतूनें जोंवरि कृपा न केली!! ॥
केव्हां येईल सखये ऋतु तो? फुलविल हर्षलताला? ।
सुगंधसुंदर पुष्पदर्शनें तोषवील जगताला?

त्या पुष्पांचे द्विविध पराग स्त्रीपुरुषांच्या रूपें ।
एका जागीं आणावे श्रीवसंताख्य ऋतुभूपें !! ॥
त्या वांचुनि ह्या प्रीतिवल्लरी देतील फलें काय ?
फलप्राप्तिविण पुनरुत्पत्ती अशक्य गणिली जाय. ॥
पुष्पित वल्ली सुफलित करणें वसंत ऋतुचें कर्म; ।
वसंतजननी तूं ह्मणुनी तव हस्तीं सगळें मर्म !
भुवनसुंदरी ! जगन्मोहिनी ! विद्वज्जनमनहारिणी ! ।
संसृतिविमुखमुनींप्रति सुद्धां सहज स्ववशंकरिणी ! ॥
पुरे पुरे ! हा विरह हिंवाळा ! आखडलीं गे गात्रें ! ।
किती घालवूं कुडकुडत असीं सांग तरी दिनरात्रें ? ॥
ह्या हिंवतापा एकचि ओषध दर्शन तव वदनाचें ! ।
नीरक्षीरासम सहवासहि पथ्य अवश्य तयाचें !
वेळेवरि औषध न पोंचतां साध्यहि असाध्य होती ।
सुलभ रोग ! मम महाव्याधिची नेणों कशि गत होती ! ॥
नखशिखान्त तूं कोमळ नाजुक नवनीताची पुतळी ? ।
कशि न द्रवशी ? मद्विनती ही कर्णीं असुनी रुतली ? ॥
तृषार्त चातक गरिब तयाला मेघततीस वहाया ।
पदवी नाहीं ! समर्थ परि ती नेदी त्यासि मराया ! ॥
स्वर्गसुखाचा एकचि बिंदू मुखांत घालुनि त्याची ।
चटक लावुनी तळमळ बघणें रीति नव्हे सभ्याची ? ॥
सदयहृदय-करुणेच्या मूर्ती ! क्रूर नको गे होऊं ! ।
माहेराहुनि ये ! लौकर दे ! प्रेमसुखातें सेऊं ! ॥

तुझा—***

——— —

## प्रेमपत्र.

आर्या

प्रेमा तुझा विलोकुनि, हर्ष मनीं फार होतसे मजला ॥
तो न ढळो क्षणहि अशी, देवो परमेश सन्मती तुजला ॥१॥
स्वसुख सुळीं न पहातां, सुखवाया मजचि झटसि तूं भारी ॥
परि उभयसुखेंचि सुखी, होइन तेव्हांचि पूर्ण आभारी ॥ २ ॥
सर्वांहुनि माझी तूं बाळगिसी काळजी मनीं फार ॥
जें ह्मणुनी मज रुचतें, तें करण्या असासि नित्यचि तयार ॥ ३ ॥
तवसहवासावसरीं, स्वर्गसुखहि कःपदार्थ वाटतसे ॥
वरचेवर तें स्मरतां, विरहगदें हृदय फार दाटतसे ॥ ४ ॥
हितगुजवचनरसाची, किति वर्णावी सखे! तुझ्या गोडी ॥
स्वर्ग स्त्रीगानाची, गोडी कानास त्याहुनी थोडी ॥ ५ ॥
निष्काम तुझी प्रीती, देइ सखे! अतुल तोष मच्चित्ता ॥
किति मजसाठीं शिणविसि, निजतनुला आणि मानसावित्ता॥६॥
हृदयस्थित तुज पाहुनि, निद्रा न क्षणभरी जवळ येई ॥
जाणो सपत्निमत्सर मजला स्पर्शावया न तिस देई ॥ ७ ॥
यापरि पति धाडी जिस, संतोषेंप्रेमपत्र, ती धन्या ॥
काय कराव्या सुंदर, विदुषी श्रीमंतिणी स्त्रिया अन्या ॥ ८ ॥

---

## कमलिनीप्रश्न.

( दिंडी )

दुःखि नच होईं कमलिनी! मनांत; ।
अशिच चंचल सर्वत्र मधुपजात; ॥

मनःस्थिरता जन्मांत तिला नाहीं; ।
दुर्लभाची वासना तुला कांही? १
मनःस्थिरता इतुकेंचि नव्हे न्यून, ।
कृतज्ञत्वाचा तीस लेशही न ॥
ब्रह्मदेवें निर्मिल्या स्वभावातें ।
तुझ्यामाझ्यानें काय बदलिजेतें? २
आज सेविति हे आम्रमंजरीतें; ।
उद्यां शोधाया जाति माधवीतें; ॥
तिथुनि धावुनि गांठिती मल्लिकेला; ।
पुन्हां चाखाया येति जातिवेला! ३
अशापरि जे अवमान परिचितांचा ।
करुनि, चालविती शोध नव फुलांचा; ॥
बरें वाइट कडु गोड सर्व चाले; ।
नवें मिळलें ह्मणजेच जयां झालें; ४
अशा शीलाचे भ्रमर सर्व बाई; ।
एकनिष्ठेचा गंध तयां नाहीं. ॥
सृष्टिधर्मानें सिद्ध जो स्वभाव, ।
दुःख मानुनि त्याचें नसे निभाव! ५

---

## शिक्षा.

( शार्दूलविक्रीडित श्लोक )

वर्षाकाल भयाण! त्यांतिल घनध्वान्तें निशा भीषणा!
धो धो वर्षति मेघ! फार करिती घो घो अशा गर्जना! ॥

सों सों वाहत सारखा पवनही! विद्युत् कडाडे पडे ! ।
खो खो कोसळुनी तुटोनि पडती तों डोंगरांचे कडे! ॥ १ ॥
वेगें ओहळ धावती खळखळां बाहेर चोंहींकडे ! ।
मूर्च्छा कीं जणु भीतिनेंच सगळ्या लोकांसि निद्रा पडे ! ॥
ऐशाही घनघोर भीम समयीं त्या अंधकारांतुनी ।
जाती प्रेमळ माणसें प्रियगृहीं एकेकटीं चालुनी ! ॥ २ ॥
प्रेमा ! ' कोमल तूं सदैव असती नाजूक आणि मृदू- ।
लोण्याहूनि-फुलापरीस ! ' असलें वेडा कुणीही वदू ॥
माझा ' वज्रकपाट, घट्ट कवच प्रत्यक्ष काठिण्य कीं ।
धैर्यस्माधर '-अक्षरात्मक असे शिक्का तुझे मस्तकीं ! ॥ ३ ॥

---

## मित्रत्व.

एक ह्मणतो,—

जगतिं सकल जीतें ' मित्रता ' बोलताती
मजसि निपट भासे भूल ती गुंगवीती ॥
द्रविणगुणसमृद्धा मित्र छाये समान-
भजति; परि दरिद्रा ढुंकुनी पाहती न. ॥

दुसरा ह्मणतो;—

जगतिं सकल जीतें मित्रता बोलतात ।
तिजकडुन जगाचे व्याप हे चालतात ॥
द्रविणगुणसमृद्धी तीस कांहीं न लागे ।
द्युमणिकमलमैत्री हेंचि सर्वांस सांगे. ॥

---

## जांवई.

( साकी )

मिष्ट पदार्थां नाइट ह्मणुनी वळेंच टाकुन देई;
उत्तम वस्त्रें दिलीं तरी तीं तुच्छ गणोनि न घेई;
कितिही सांत्वन केलें असतां शब्द वांकुडे बोले,
मित्रत्वाचे वर्तणुकीला उलट देतसे टोले!
श्वशुरगृहांतुनि उत्सवकालीं निघे पत्निसह जाया!
जांवइ पद मिळतांच किति किती सुचती दुश्चेष्टाया!
॥ ध्रु० ॥ स्वभाव मूर्खाचा । स्वहितीं विरुद्ध व्हायाचा ॥

---

## कुसुम गौरव.

[ साक्या ]

आकाशाशीं संमुख होउनि, मस्तक उंच करोनी, ॥
कां पाहसि बा! सुंदर कुसुमा! सुस्थिर दृष्टि धरोनी? ॥ १ ॥

सुकुमार तनू, स्वरूप सुंदर, नयनमनोहर रंग, ॥
हृदयहारि सौगंध्य, मिळे, या गोष्टित ज्याचें अंग-- ॥ २ ॥

असा दीतिचा निधीच भगवान् मित्र फिरे आकाशीं ॥
कृतज्ञतासूचक नयनें कां ह्मणुनि पाहसी त्याशीं? ॥ ३ ॥

अथवा तुजला स्वच्छ जीवनें पोशि वाढवी मेघ; ॥
ह्मणुनि तयावरि वळे तुझा हा प्रेमनिरीक्षण ओघ? ॥ ५ ॥

किंवा अपुला सुगंध नेउनि अष्ट दिशांच्या लोकां ॥
तुष्ट कराया स्वमुखें कथिशी गंधवहा प्रति? हो कां ॥ ५ ॥

अथवा 'या हो ! पतंगकानो ! पाकोळ्यांनो ! या हो ! ॥
मधुपानो ! या जेवा !' ऐसा उंच फोडिशी टाहो ! ॥ ६ ॥
अमृतासम जो पराग त्यानें भरुनी सुवर्णताट ॥
उंच धरोनी बघसी प्रेमें त्या अतिथींची वाट ? ॥ ७ ॥
किंवा सोनें रत्नें धरिती मुकुटावरती राजे; ॥
त्याहुनि मृदुल-मधुर--सुगंधित कुसुमगुच्छ हा साजे. ॥ ८ ॥
ऐसें त्यानां सुचवायाच्या हेतूनें तूं माथां ॥
चढवुनि शोभवुनी दाखविसी अनेक भूधरनाथां ! ॥ ९ ॥
अथवा 'भाविक जनहो ! या ! या ! तोडुनि न्या मजलागीं ॥
ईश्वरपूजेमध्यें ठेवा असें उंचशा जागीं'— ॥ १० ॥
ऐसें त्यांना सांगायाच्या हेतूनें कृति करुनी. ॥
दाखविसी कामूक नरापरि स्वयेंच वरती सरुनी ? ॥ ११ ॥
किंवा लोकीं सौभाग्यवती--कुमारिका सुपवित्र ॥
ह्मणती, त्या मज शिरीं वाहती शुद्ध ह्मणोनि चारित्र. ॥ १२ ॥
तसीच नानाविध रसिकाची प्रीति मिळविती कुलटा; ॥
प्रेमपराग तयांचा खोटा ! माझा त्याहुनि उलटा ! ॥ १३ ॥
ह्मणुनि तयांच्या शिरावरी मी असा ठेवितें पाय ! ॥
हेंचि जनाला दावायास्तव चढसी वर कीं काय ? ॥ १४ ॥
अथवा क्षणभंगुर जीवित हें सत्वर व्हावें सार्थ ॥
ह्मणुनि नियंत्याकडे पसरिला पुष्पहस्त सुफलार्थ ? ॥ १५ ॥
हाच जगानें तुझ्यापासुनी घेउनि बोध, करावें- ॥
जन्म सफल परमेश भक्तिनें; नंतर सुखें मरावें; ॥ १६ ॥
अशा हेतुनें ईश्वर सन्मुखतेचें हें आचरण-- ॥
असे ! तरी तुज गुरुवर मानुनि वंदुनि धरितों चरण. ॥ १७ ॥

## प्रेम !

पोवाडा-( भूपती खरे ते वैभव० )

हें प्रेम जगाला होय किती उपकारी,। किती० ॥
तें पाहुं सख्यानो ! सूक्ष्म मनाआजारीं. ॥ ध्रु० ॥
प्रत्येक वस्तुचा गर्भ धराया हेतु । ध० ॥
पितृसंगम; तो जुळवी प्रेमाचा तंतु; ॥
म्हणुनीच जन्मती प्रेमसुखानें जंतु, । सु० ॥
हें सिद्ध होय कीं लेश नसे हो ! किंतु. ॥
हा नियम मानवां माजी । सारखा ।
पशुंपक्ष्यांच्याहि समाजीं । सारखा ।
तरुलतादिकांच्या काजीं । सारखा ।
म्हणतात ' पितामह सृष्टि निर्मितो सारी, । नि. ' ॥
तो प्रेमसाधनाविणें कसा अधिकारी ? ॥ हें० ॥ १ ॥
जन्मतांचि मातृप्रेम अर्भकां पाजी, । अर्भ० ॥
त्या प्रेम नसे तरि मिळे पळीहि न कांजी. ॥
मग थोर होय तें प्रेम नसेल समाजीं, । नसे० ॥
तरि घांस सुखें न मिळेचि करोनिहि ' हां जी. ' ॥
शिकवि जें चतुर्दश विद्या, । प्रेम तें. ।
चौसष्ट कला अनविद्या , । प्रेम तें. ।
उपदेशी मुक्तिहि हृद्या । प्रेम तें. ।
गृहपुत्रकलत्रसुमित्र धनादिक सारीं । धना० ॥
अनुरक्त फक्त कीं प्रेमगुणावरि भारीं. ॥ हें प्रे० ॥ २ ॥
जरि प्राप्त जाहले रोग भयंकर देहीं; । भयं० ॥
धनधान्य न उरलें दारिद्र्यतेनें गेहीं; ॥

जरि गांठि साहाजिक वृद्धदशा तनुतें ही; । दशा० ॥
प्रेमार्द्रजनाचा आश्रय भय हरि तेंहि. ॥
प्रेम हें जन्मभर पोशी । मानवा ।
श्रीविष्णु ह्मणाया यासी । वा न वा– ।
वाटतें? तरी हृषिकेशी । हा नवा ! ।
कीं सृष्टिरक्षणीं दक्ष सदा कंसारी, । सदा० ॥
तो प्रेमसाधनाविणें कसा अधिकारी? । हें प्रे० ॥ ३ ॥
जें प्रेम उडे ह्या सकल जगाच्या वरचें । जगा० ॥
ते क्षणीं ममत्वचि सरे स्वदेहावरचें ॥
त्या ह्मणति ' मोक्षपद ' अशक्य वा बहु दुरचें । वा० ॥
परि तेंहि गुरूच्या प्रेमदृष्टि नंतरचें ! ॥
प्रेम आत्महत्ये होई । कारण. ।
दुसऱ्याच्या जीवित्वाही । मारण ।
स्थिर युद्धिं तसा तें राही । वारण
' प्रेमेंच सृष्टिला ' ह्मणति ' रुद्रसंहारी. । रु० ' ॥
तो प्रेमसाधनाविणें कसा अधिकारी? ॥ हें प्रे० ॥ ४ ॥
या परी प्रेम हें सर्गस्थितिलय करितें , । स्थि० ॥
लौकिकी स्वरूपें मात्र वेगळीं धरितें. । ॥
गुरुजन प्रेम जें ' भक्ति ' नांव तें वरि तें, । नां० ॥
' नृपनिष्ठा ' नांवहि जडे सुभूपति वरि, तें.
' वात्सल्य ' नांव त्याला, जें । शिशुवरी;
' प्रीति ' हें तया, जे साजे । स्त्रीवरी;
' श्रद्धा ' हा डंका वाजे । ईश्वरीं, ।

निजनामेंचि वसे जें युवतिहृदागारीं, हृ० ॥
तें सुखद तुह्मां हो ' पतिप्रेम ' संसारीं ॥ हें प्रे० ॥ ५ ॥
हें प्रेम जगाला होय किती उपकारी । किती० ॥
तें पाहुं सख्यानो! सूक्ष्म मना माझारी ॥ ध्रु० ॥

---

## एक ह्मातारी ह्मणते, मुली!

### गाणें

( नाहिं सुभद्रा ह्या वार्तेतें जेव्हां० हो चाल )

हींच कारणें स्त्रीनिंदेचीं जन ह्मणती बाई! ॥
अंतर्गत वर्तनीं लक्ष्य तें विरळागत जाई, ॥ ध्रु० ॥
स्वतंत्रतेनें जनीं वागणें हें कारण एक, ।
माहेरीं बहु दिवस राहणें हेंहि अवलोक, ।
जात्रा उत्सव ह्यांत मिसळणें जमतां बहु लोक, ।
पुरुषमंडळींत गोष्टि कराया स्फुरण जिला येई;
हींच कारणें० ॥ १ ॥
परसदनीं कीं परकीदेशीं वसणें भाग पडे, ।
चंचल स्त्रियांपाशीं जीचा बहु सहवास घडे, ।
अकस्मात उपजीवनसाधक जीची वृत्ति बुडे, ।
ज्या तरुणीचा वृद्धदशेला पति प्राप्त होई; ॥
हींच कारणें० ॥ २ ॥
मनासि वाटे तेथें तेथें यथेच्छ फिरणारी, ॥
आडऊड राहुनि परपुरुषां चोरुनि बघणारी; ॥
पुनः पुन्हां अत्यल्प कारणें खुदुखुदु हसणारी,

वस्त्रालंकार उणे ह्मणुनी लज्जित जी होई; ॥
हींच कारणें० ॥ ३ ॥

डागिन्यार्थ एकान्तीं बोले सोनारापाशीं, ।
उचापतीस्तव तसीच किंवा दुकानदाराशीं,
पुराणिकां हरिदासां भेटुनि घे उपदेशासी, ॥
रोगिण वैद्यापाशीं तैशी वैद्यिण रोग्याशीं; ॥
हींच कारणें० ॥ ४ ॥

---

## हिंदु मुलीचें सासर.

( चाल–भीमकबाळा ह्मणे नृपाळा )

सासरिं जातां मुलगी रडतां कवळुनि माता बोध करी ॥ भिऊं नको तूं बाळे! माझे शब्द मात्र हे मनीं धरीं. धृ० ॥

हिंदु मुलींना सासरिं जाणें चुकावयाचें कधिं नसतें । इतरींच्या नशिबांत मात्र तें विरळ कधीं काधें तरि असतें ॥ जन्माचें साफल्य सौख्यही सासरींच सगळें असतें । मूढपणें परि साध्या या तें नेणति ज्या, त्यांचें फसतें ॥ १ ॥ सासरिं जातां० ॥

सासरिं जातां कुलस्त्रियांतें व्रत पतकरणें लागतसे । ऐकुनि घे थोडक्यांत बाळे! उघड तुला मी सांगतसें. ॥ भक्ति करावी पतिची मानुनि परमेश्वर त्या वीण नसे; । कृपाकटाक्षें संरक्षावे सेवकजन निजपुत्र तसे ॥ २ ॥ सा० ॥

आईपाशीं नम्र तशी तूं सासुबाईपाशिं रहा. । जाउबाइ–वन्सं यांविषयीं खरी प्रीति चित्तांत वहा. ॥ वडिल जनांला मान असे

तो नित्य वाढवायासि पहा. । कोणाचा अपराध असो तो सहा-वेल तेवढा सहा. ॥ ३ ॥ सासरिं० ॥

सवत कदाचित असली तरि गे! पतिप्रिया ह्मणुनी तिजशीं। प्रेमानें वागणें योग्य: तिस मानिं आपुली प्रियसखिशी. ॥ म्लान वदन कीं खद्खद् हसणें दोष नसावे हे तुजशीं. । प्रसन्न परि गंभीर मुखश्री मूर्ति शांतिची होई जशी ॥ ४ ॥ सासरिं० ॥

जवळ पोंचतां गृहपति झट्कन् तत्पर उठुनी उभी रहा. । नम्रपणें तद्भाषण ऐकें; नयनें त्याचे चरण पहा. ॥ खुद्द तयाच्या कामावरि तूं स्वता ठेविं दक्षता महा. । पतिच्या नंतर निजुनी पूर्वीं उठणें, दृढ धारिं नेमाचि हा. ॥ ५ ॥ सा० ॥

प्राचींतिल कुलयुवतींचें हें धर्मतत्व सुव्रत वाहिलें; । युवतीला अपमानकारकाचि वाटे सर्वार्थी पाहिलें ॥ परंतु सात्विकतेच्या तेजें रजस्तमांला आणि दहिलें । तरिच कुटुंबीं स्वर्गतुल्य सुख--शान्ति, असे ग्रंथीं लिहिलें ॥ ६ ॥ सा० ॥

संसारीं तापत्रय बहु तशि सहनशीलता स्त्रीहृदयीं । सहज असे तितुकी न दिसे ती साधारण पुरुषी अदयीं । सृष्टिनियम हा पाहुनि केलें सूक्ष्म विचारें मनन जयीं । अशा पुरातन साध्वीनीं हें व्रत स्थापिलें स्त्रीनिचयीं ॥ ७ ॥ सासरिं० ॥

लोपामुद्रा अरुंधती अनसूया गिरिजा ध्रुवमाता । सरस्वती लक्ष्मी सावित्री स्वाहादेवी रविकान्ता ॥ सीता मंदोदरी मेनका प्रसिद्ध दुसऱ्या पतिव्रता । त्रैलोक्यीं ह्या व्रतें पावल्या सौख्य, धन्यता, सार्थकता. ॥ ८ ॥ सासरिं० ॥

# विश्वास

## गाणें

हा विश्वास हो विश्वास ॥ आकर्षी सगळ्या विश्वास. ॥ हा०॥
॥ ध्रु० ॥ यज्ञयाग-जपतप-नेमाचें । परोपरीच्या सत्कर्माचें । परो
पकारादिक धर्माचें । परमेश्वर फळ देतो खास. ॥ हा० ॥ १ ॥

पडेल पाउस वेळेवरती । ह्मणोनि भूमी जन नांगारिति; । द्रव्य
खर्चुनी बहु वावरती । चिंतुनि पुढच्या भावि फळास. ॥ हा०॥२॥

असंख्य प्रजाजन बळ--खाणी । भूपति असतो एक प्राणी ।
सत्ता गाजवि फार शिरागी । भीति न धरितां निज देहास. ।हा०।

जमीन--जुमला आणि घरदार । डागडागिने जडजवाहिर । धन
गोधनसह निज परिवार । भूपति राखिल ह्या सगळ्यास. ॥हा०॥४॥

वातपात चोरी करणारे । लोकां फसवुनि धन हरणारे । यांसि
निवाराया, करभारें- । पुजिति लोक सदा राजास. ॥ हा० ॥ ५ ॥

अमूप जिन्नस परकीदेशीं । किमतीपूर्वी धाडायासी । धैर्य
होतसे व्यापाऱ्यांसी । जामीन कोण ह्या धंद्यास ? ॥ हा० ॥ ६ ॥

अग्निवातजलविदूयुत् यांच्या । वेगें चालति वहनें, त्यांच्या ।
स्वाधिन करितां तनू आमुच्या । भीति न वाटे कां चित्तास? ॥
॥ हा० ॥ ७ ॥

भृत्यांचें हित धनी चिंतिती । तेहि तयांतें प्रेमें सेविती । पर-
स्परांच्या साह्या झटती । याला कारण काय तयांस? ॥ हा० ॥ ८ ॥

इतर गोष्टि ह्या फार कशाला? । मुख्यत्वें स्त्रीपुरुष फुलांला ।
प्रमगुणीं दृढ गुंफायाला समर्थ वाटे कोण तुह्मां? ॥ हा० ॥ ९ ॥

विवाहकालीं दिधलें वचन । जन्मवरी तें विसरे न मन स्मरतां करि दुःखाचें शमन । आश्रय काय अशा वचनास ? ॥ ॥ हा० ॥ १० ॥

प्रियकरिणीतें गृहीं ठेवुनी । पुरुष हिंडतो परदेशांतुनि । भलतें ती करणार न ह्मणुनी । जामिन कोण तिचा नवऱ्यास ? ॥ हा० ॥ ११ ॥

तसा निघे जैं प्रियकर दूर । अबला सोशि घरीं हुरहुर । ह्मणती कामरिपूहुनि शूर । असतां पति, मीं रडूं कशास ? ॥ ॥ हा० ॥ १२ ॥

बा विश्वासा ! अद्भुत करणी । तुझी, ह्मणुनि हे विनती चरणीं । विफळ कधीं नच हो आमरणीं । तुजविण तारक कीं न जगास. ॥ हा० ॥ १३ ॥

---

## संसार.

( शार्दूलविक्रीडित )

कुठें विद्वान् गोष्टी करिति कलहा मद्यप कुठें ।
कुठें वीणा वाजे अति विकट दुःखध्वनि कुठें ॥
सुरम्यांगी कोठें तशिव अढळे जर्जर तनू ।
अशा संसाराला अमृत समजूं कीं विष ह्मणू ? ॥

शोभे तोंवर विद्या गुणगण महिमा रूप संपत्ति शौर्य ।
चित्ताची स्वस्थताही परगुण कथनीं वक्तृता आणि धैर्य ॥
नाहीं जोंवर कानीं पडति गृहिणिच्या सांगणीनें मुलांचे ।
'ए बाबा! तेल नाहीं! लवणहि सरलें. कीं!' असे शब्द साचे. १

## क्षणभंगुर काया.

पदः-( भूपती खरे ते० मृच्छकटिक )

क्षणभंगुर काया काय इचा विश्वास? ॥ इचा० ॥
लवकरी झटावें इच्छित कर्तव्यास. ॥ (ध्रु०) ॥
धडधाकट नरही जाति अचानक मरुनी! ॥ अ० ॥
कधिं न कळे कोणा येइ निमंत्रण वरुनी! ॥
'करुं पुढें' असा जे ठेविति निश्चय करुनि, ॥ नि० ॥
ते विरळचि होती सार्थ सिद्धितें वरुनी. ॥
कर्तव्यपथीं परि जाति पुढें जे सरुनी ॥ पुढें० ॥
ते समाधान पावती मनोरथ पुरुनी. ॥

(चाल) हा अनुभव जेथें तेथें। येतसे; ॥
हा खरा प्रपंचीं जैसा। होतसे, ॥
परमार्थामाजी तैसा। तो असे. ॥

याकरितां सुज्ञें द्वडुनि आलस्यास ॥ द्व० ॥
लवकरी झटावें इच्छित कर्तव्यास ॥ क्षण० ॥ (१) ॥
कितिएक समजती स्वस्थ बसुनि जरि सदनीं ॥ बसु० ॥
निर्वैध पडतसे अन्न आमुचे वदनीं; ॥
सजविण्या मिळे जरि तनू भूषणीं-वसनीं ॥ भूष० ॥
मिळतसे रमाया जरी यथेच्छ व्यसनीं; ॥
कर्तव्य आणखी बाकि राहिलें न जनीं; ॥ राहि० ॥
संतृप्त असों संपत्ति-सुखानें स्वमनीं!! ॥

( चाल ) हें सौख्य पशूंहुनि नोहे। वेगळें! ॥
वाटतें कां तुह्माला तें। आगळें? ॥

मनुजता श्रेष्ठ ती लाधे । ज्यामुळें, ॥
तें कृत्यचि सार्थकता दे नरजन्मास ! ॥ नर० ॥
लवकरी झटावें इच्छित कर्तव्यास. ॥ क्षण० ॥ (२) ॥
जरि अह्मां ईश्वरें श्रेष्ठ पशूंहुनि केलें; ॥ पशूं० ॥
पशुहुनी विशिष्ट ज्ञान असे जरि दिधलें; ॥
तरि सार्थक त्याचें किमपि नसे जों घडलें, ॥ नसे० ॥
श्रेष्ठत्व आमुचे अंगिं कोणतें उरलें? ॥
निज मातृभूमिचें ऋण अंशत्वें फिटलें; ॥ अंश० ॥
जरि देशबंधुच्या उपकार्यी वपु झटलें; ॥
( चाल ) तरि ऐहिक साध्य जहालें । कांहिंसें;
परमार्थ-विषय-संबंधीं । तें कसें? ॥
तरि ईशभजन शुचिचित्तें; । हें असे. ॥
ह्या कृत्ययुगें ये मनुष्यता आह्मांस. ॥ मनु० ॥
लवकरी झटावें इच्छित कर्तव्यास. ॥ क्षण० ॥ (३)

---

## परोपकार.

[ साकया ]

जगतीं परोपकाराचें ।
वर्णन कोण करिल साचें ? ॥ धृ० ॥

गोड न सुंदर जरि, आवड ती कार्पास फळें तरि तीं; ।
जनलज्जारक्षणार्थ लोकीं वस्त्ररूप जीं धरिती. ॥ १ ॥
परोपकारें शून्य मनुज तो पात्रचि धिक्काराला! ॥
पशु श्रेष्ठ! कीं त्यांचीं चर्में येती उपकाराला. ॥ २ ॥

द्रव्य आणि आयुष्य अचुक हें नष्टचि जरि होणारें, ।
परोपकारीं खर्चुं नये कां सुज्ञजनें सुविचारें ? ॥ ३ ॥
सफल तरू लवती कां वर्षति सजल होति तैं मेघ? ।
नम्र होति सज्जन कां येतां संपत्तीचा ओघ? ॥ ४ ॥
रत्नजडित कंकणें शोभतें कर किंवा दानानें? ।
चंदन चर्चुनि हृदय शोभतें किंवा औदार्यानें? ॥ ५ ॥
विकसित करि पद्मांतें रवि, ती काय विनविती त्याते? ।
अप्रार्थित चंद्रमा फुलवितो तोषवुनी कुमुदांतें. ॥ ६ ॥
न मागतांही मेघ वर्षती शीतल मधुरजलातें. ।
सज्जन वेळीं स्वयेंचि झटती परहित साधायातें. ॥ ७ ॥
अहो! तृण तरी बरें नराहुनि कीं उपकारविहीन. ।
घास होउनी पशूंसि रक्षी रक्षि रणीं भीरूंना. ॥ ८ ॥
मोक्षाहुनिही परोपकाराचि थोर ह्मणुनि भगवंतें, ।
अनेकदां अवतरुनि सोशिलीं दुःखें बळें अनंतें. ॥ ९ ॥

जगतीं परोपकाराचें ।
वर्णन कोण करिल साचें! ॥ ध्रु० ॥

---

## बालकांनो!

### दिंड्या

बालकांनो! जन्मुनी काय केलें?
स्वमातांतें वार्द्धक्य आणियेलें!
स्तुत्य कृत्यें कुळ भूषविलें नाहीं
तरी माता क्षीण कां वेदनांहीं? १

पुत्र झाले परि असति अविद्वान;
धर्मबुद्धि-स्वकुलाभिमान ज्यां न!

अशा पुत्रांच्या जननिहुनी वंध्या-
अशी गाई कोणत्या गुणें निंद्या ? २

वनीं एकचि पेटतें शुष्क झाड
सर्व वन तें जाळुनी करी पाड !
कुपुत्राच्या दुर्गुणें तसा सारा-
वंश होतो कीं पात्र तिरस्कारा ! ३

पुत्र नाहीं एवढें दुःख एक;
मरे जन्मुनि तें दुःखदी क्षणैक;
अशा दोहींहुनि दुष्ट पुत्र जो, तो-
प्रतिक्षण दुःखद जन्मवरी होतो ! ४

पुत्र नाहीं जाहला जिला शूर
धर्म-विद्यांपासोनि तसा दूर;
अमावास्येची रात्र तशी स्त्री ती
निंद्य होते विश्वांत सर्व रीती ! ५

जळे एकचि जडदेह अग्निसंगें,
कुपुत्रानें परि सर्व अन्तरंगें,
वंश उद्धरतो सुपुत्रामुळें तो
ह्मणुनि पुरुषोत्तम सहज ह्मणीजे तें - ६

पुत्र अगुणी शेकडो जन्मतांही
एक सगुणाची सरी तयां नाहीं;
नभीं नक्षत्रें अमित चमकतात
चंद्रसम का जननेत्र उघडितात ? ७

फुले एकचि सद्वृक्ष वनामाजी
सुगंधानें पसरि तो तरुसमाजीं;

तेंवि एकचि सुत गुणी निपजतो तो
सकळ देशोद्धारासि हेतु होतो. ८
आर्यभूचे पुत्र हो! करा कांहीं
सद्विचार मनीं, अतां वेळ नाहीं;
वेळ जातां चोरीस होय जागा--
तया वाण्याला लाभ काय, सांगा-- ९
धन-प्रभुता-कौशल्य सर्व कांहीं--
सरत आलें! तरि शुद्धि तुह्मां नाहीं!
रडे ह्मातारी आर्यभूमि हाका--
मारे मोठ्या! जागेच तरि न व्हां का? १०

---

## मित्राचा उपदेश.

(गीति)

हे मित्रा, काय ह्मणुनि रात्रंदिन तोच ध्यास तूं धरिसी?
परवनिता अभिलाषुनि चौर्यजनित अनय-पाप कीं वरिसी? १
'वेश्या नव्हे परस्त्री, कीं ती नित्य स्वतंत्र' ह्मणशील,
तरि पुष्कळ पुरुष तिला ओढिति हें तूं कशांत गणशील? २
कितिएक पुरुष ह्मणती 'माझी ती बहुत काळची रमणी!'
तीहि तयां 'होय' ह्मणे स्वीकारुनि कनक-- माळ-चीर-मणी--३
प्रत्यक्ष जाणुनी हें जरि तत्स्वातंत्र्य सिद्ध करिशील,
स्वक्रीत पदार्थ हरी पर, ह्मण त्याचेंहि 'योग्य' तरी 'शील'! ४
त्या पुरुषांहीं तिजवरि मानियली आपुली असे सत्ता
पशुता होय तयांची ह्मणुनि कधीं तरि बसेल तुज लत्ता! ५

तव चित्त मुळीं कोमल, अन्य तिचा प्रिय असेल उद्दाम,
पाडिल दुःखीं-शोकीं अवमानुनि तुज कधींहि मुद्दाम! ६
तेवीं, तव कीर्तीचा भंग; तिच्याही सुखावरी पाणी
पडणार तुजमुळें: हा दूर सख्या! ऊठ! झाडुनी पाणी. ७
" जें होय परकलत्र स्पर्शीच महद्यशासि वाहवितें;
कोण प्राज्ञ ह्मणेल ' श्वा शिवला ज्या तशा शिवा हवितें ? " ८
" वद तीस, ' ह्मण, स्त्रीच्या सुखदे हो सुप्रसन्न मोकाळेके
जी चुंबिली भुजंगें भ्रमर ह्मणेलचि तिला ' नमो कालिके!" ९
' सर्व प्रीति तिची मज एकावरि ' हा मनांत जरि समज,
धूर्त अधिक भजति तिला आढळले ते तुझ्याहि परिस मज! १०
सर्व प्रेम तुज दिलें? तरि अन्य नरांसि काय ती देते ?
तूं प्रिय ते कां अप्रिय? सादर जे बहुत आयती देते? ११
तूंचि प्रेमपरीक्षक ? अन्यां त्यां बुद्धिलेशही नाहीं ?
धनराशि दिले जातिल वाटे का प्रेमसौख्यही–नाहीं?! १२
असलेंच अधिक तुजवरि तत्प्रेम, तथापि तूं अधन ह्मणुनी,
नवरा अन्य वरावा लागेलचि संपदर्थ धन पणुनी! १३
अर्थी– धनवानाची सत्ता ती पूर्ण आणि उघड जनीं
बांधीलचि तव पदरीं अनुताप--लघुत्व--चौर्य! दिनरजनी! १४
एकाचि वस्तुवरती धरीत प्रियभाव जे अनेक जन,
ते द्वेषमूल--कलहा पात्रचि! कीं तो कधींहि एकच न. १५
व्यवहारज्ञ असुनि हें द्वेषाचें मूळ कां करिसि जवळ?
त्वत्कृत्य ह्मणेल न कां तिजशीं रत त्या भुजंगमा ' खवळ '? १६
असतील तुझे मित्रहि तिजशीं आसक्त गुप्त वा उघड
तत्स्नेहांत कसा या कृत्यें पडणार नाहीं रे! विघड! १७

क्षणशील ' लोभ दावुनि करि आग्रह तीं न मोडवे मज तो '
तरि सांग तिला ' कामुक मित्रस्त्रीतें न सुज्ञ नर भजतो ! ' १८
ती अबला! पूरुष तूं! अज्ञा ती! सूज्ञ तूं! प्रसिद्ध जनीं!
बहुदोष-पात्र होशिल म्हणुनि तिच्याहूनि तूं प्रसिद्ध जनीं! १९
निष्ठुरतेनें तिजला झिडकारुनि दूर होईं सत्वर तूं;
रंभा-त्यागें शुकसम सत्कीर्तीशीं तुझेंहि सत्व रतूं! २०
झिटकारितां बहु विकल होउनि दावील खेद अतिशय ती
परि परिणामीं सौख्या पावेलचि! तूंहि जेविं अनिश यती! २१
सांग बरें तुजवांचुनि काय तिचें या जगांत अडणार?
त्वदधिक-गुण-धनवन्मन तिजवर न कशावरूनि जडणार? २२
अथवा आजचि असती नवकुसुमां मधुपसे निपट नरु ते
थोडे कां, ह्मणुनि तुझेंहि मन तिजवरिच सुटुनि अटन रते? २३
' स्वर्गाधिक सौख्य तिच्या सहवासें सहज फुकट लाभतसे
न त्यजवे! कीं देतें सुकृत प्राग्जनिज फुकट- लाभतसे! ' २४
ऐसें मानिसि तरि, हें पुढच्या जन्मांत फेड करण्याचें-
कर्ज कशावरुनि नव्हे, कालांतर चक्रवाढ धरण्याचें?! २५
त्वदधीनचि पूर्ण तिचें मानस आहे असें जरी वाटे,
प्रत्यक्ष बघ किं लावुनि उपदेशें सुकृतिच्या तरी वाटे! २६
तेव्हांचि मग कळेल स्वान्त तिचें! वा कळेल आधीं न!
आधीन तुझ्या ती, कीं तूंचि तिच्या जाहलासि आधीन! २७
ती द्रव्य तुज न मागे; योग्य तसें देववेहि तुज न तिस;
शल्येंचि दोनही हीं खुपतिल आजन्म नित्य नव मतिस! २८
हृदयांत शल्य असतां नंदनवनवास--अमृतपानहि ते

न सुखापद ! कीं जैसीं मिष्टान्नें ज्वरयुता घृतें सहितें. २९
निष्कपट वर्तन तिवें--दुष्कृतिसहि असलसि तूं असा मान्य
तोंवरिच टिकेल--पुढें करिल कपट तीच तें असामान्य ! ३०
निसिदिनि सर्व जनांचें लक्ष तुझ्यावरि, असा तुझा धंदा
असतां लपविशिल कसा, स्वयंप्रकाशक परांगना-छंदा ? ३१
ह्या छंदानें बसतो सभ्यपणाला प्रसिद्ध कीं धक्का
सभ्यपणाविण सहज व्यवसाय पडेल कीं तुझा फिक्का ! ३२
नसती विचार परके तव मतिला ! विहित वरुनि वागावें
सांगावें काय तया, यन्मतिला बुधजनीं सदा गावें ? ३३
मित्रत्व भाग पाडी लिहिण्या ह्या मज कठोरशा आर्या
आज्ञातत्पर सेवक न गणी अपुल्या शुभाऽशुभा कार्या ! ३४

---

## ऋणमोचनमंत्र.

किंवा

### एका श्रीमंत मित्रास निनावी अर्ज.

### श्लोक

नको आणखी कर्ज काढूं गृहस्था !
असे तेंच फेडावयाची व्यवस्था
वरी सांगतों; ऐक देओनि चित्त;
तुझें स्थीर राहावया कीर्ति वित्त. १
तुझी प्राप्ति मोठी तिच्याहूनि मोठें
असे कर्ज, हें चिन्ह बा फार खोटें !

जरी घाणपत्रें न झालीं रजिस्त,
तरी ठाउकीं तीं जगाला समस्त! २
अगा! कर्ज हा खोल खड्डाच जाण;
कुजे त्यांत अब्रू! जगा सर्व घाण!
दिसंदीस व्याजामुळें संपदेचा
पुरोपूर फड्शा उडे! सत्य वाचा. ३
मुळें फार अज्ञान तूझीं; तयांचे
शिरीं योग्य का होय ओझें रिणाचें?
मरावें परी कर्ज मागें नुरावें,
न ह्या साधुवाक्या तुवां वीसरावें. ४
जरी भर्वसा नाहिं कोणा तनूचा,
तरी कर्ज फेडीस विश्वास पुढ्चा-
कसा वाळगीसी? नकोची नको तें
नको कर्ज काढूं! बघूं काय होतें! ५
तुला तिष्ठती फार अस्तील आज,
तरी त्या निभावावया सोड लाज;
असे जेवढें आज लोकांस देणें,
विकीं तेवढी भूमि! हो मुक्त तेणें. ६
विकूं भूमि कैसी? जगीं होय हांसें,
अशा भावनेच्या नको गुंतुं फांसें
दरिद्री असोनीहि जो कर्जमुक्त,
ऋणी द्रव्यवानाहुनी तो वरिष्ठ. ७
विकूं भूमि कैसी? जगीं होय हांसें,
अशा मूर्खतेच्या न गुंगें आभासें

४२६९ क्रा.

दरिद्री परी जो असे कर्जहीन,
ऋणी द्रव्यवानाहुनी तो कुलीन.
विकूं भूमि केसी? जगीं होय हासें,
अशा त्वां फसावें न मिथ्या अभासें;
दरिद्री असोनी जया कर्ज नाहीं,
सुखी तो; ऋणी द्रव्यवानाहुनीही. ९
विकूं वस्तु केसी? जनीं होय हासें;
ह्मणोनी झुरावें न खोट्या आभासें;
दरिद्री असोनी जया कर्ज नाहीं,
ऋणी द्रव्यवानाहुनी सुख तोही. १०
जरी कर्ज ठेवोनि जासी परत्र,
शिव्या शाप देतीलची पुत्र-मित्र;
तुला आज सोपें पुढें त्यां कठीण.
तुझें कर्ज वारावया होति क्षीण. ११
पुढें लाभ होणार मोठा मला, ही
मनीं निश्चिती मानणें योग्य नाहीं;
भविष्यावरी भर्वसा ठेवणें तें
कलीमाजि फार क्वचित् सत्य होतें. १२
जरी सत्य होऊनि तें लाभ झाला,
मिळे मागुतीं भूमि संपादण्याला;
मधें व्याज वांचे न हा लाभ थोर?
विचारीं जनालागिं सुखांसमोर. १३
परी दुष्ट दैवें न तो लाभ झाला,
तरी दोनही बाजुनीं येत घाला;

धन व्याजरूपें सरे एक तोटा,
लिलावांत भूमी दुजा ! तोहि मोटा ! १४
ह्मणोनी टळो व्याज यासाठिं आधीं
विकीं वस्तु वा भूमि; वारी उपाधी·
खरा शाहणा तो ! पुढें लाभ होतां,
पुन्हां थाट तोही जसा पूर्वि होता. १५
परी मूर्ख तो झांकुनी कर्ज काढी,
लपोनी छपोनी श्रमें व्याज फेडी;
अधीकाधिकीं खोल खड्ड्यांत जातो,
न त्या मार्ग वर्ती सराया राहातो ! १६
जरी जन्मपत्रावरी ज्योतिष्यांनीं
सुखाच्या कथा खूप ल्हील्या, तयांनीं-
नको हो ! फसूं; ते सुखाहून दुःख
कमी सांगती ! हेंच गा सत्य लेख. १७
उमेदींत ठेवोनि लोकांस मंदां,
सदा द्रव्य संपादणें हाच धंदा
जगीं ज्योतिषी, वैद्य, भिक्षुक यांचा,
शहाणे धरीती न विश्वास त्यांचा. १८
धनाशा वसे ज्योतिष्यांच्या मनीं ते,
बहू गोड थोडें कडू बोलवी ते;
भविष्यज्ञ ते हे जरी सत्य होते,
न जाणून त्यां कैंवि पंचत्व येतें ? १९
स्वव्येव्हार हा चोख राखावयाचा
असे स्पष्ट जो तोच हा मार्ग साचाः

करावा किं आयाहुनी खर्च थोडा,
भिडेच्या पदीं ठोकुनी घट्ट खोडा. २०
जरी दानधर्मामुळें पुण्य लक्षी,
तरी कर्ज हें पाप तें पुण्य भक्षी !
ह्मणोनीच कर्जाविणें दानधर्म-
घडे तेवढा मात्र तो पुण्य कर्म . २१
अशासाठिं होओनियां सावधान,
करावी प्रतिज्ञा पुऱ्या निश्चयानं
न या ऊपरी कर्ज हें काढणार!
असे तेंच धैर्यें त्वरें फेडणार! २२
कितीही जरी ठेविलें कर्ज गुप्त,
तरी तें कदापी न होणार लुप्त.
हृदाआंत टोंचीत राहील भाला!
ह्मणोनी निवारीन आतांच त्याला. २३
अशा निश्चयें पूर्ण धैर्यें उठावें;
पईनें पई फेडण्याला झटावें
न वानोत निंदोत वा लोक त्याला-
जुमानूं नये मानुनी तुच्छ पाला. २४
स्तुती आणि निंदा जगीं जे करीती,
तुझें कर्ज फेडावया ते न येती!
तयांच्या सुख्या भाषणा काय भ्यावें?
स्वताच्या हिता त्यामुळें कां मुकावें? २५
अतां ऊठ आधीं पुरे कर्ज फेडीं!
जनाचें मनाचें समाधान जोडीं!

पुढें प्राप्तिच्या आंत आंखोनि खर्च,
सदोदीत वागावया बुद्धि खर्च. २६

हिशेबांत नाहीं तुझ्या ताळतंत;
तयाची मला वाटते फार खंत
प्रपंचाविशीं जे खरे बुद्धिमंत,
जमाखर्च ते राखिती चोख संत २७

जमा आणि खर्चा बसे मेळ कैसा?
बघी नित्य; नेदी चुकूं एक पैसा:
तयाला कधीं कर्ज होणार नाहीं!
जरी तो बळें काढिल्यावीण राही. २८

तुझ्या आश्रयें पोसती जीं अनेक
कुटुंबें तयां आळसाचीच देख–
तुवां लाविली!! याच बा! पातकानें
तुला प्राप्त व्हावें दरिद्रत्व कां न? २९

मुके आंधळे पांगळे आणि थोटे,
अशांलाच जें साह्य तें पुण्य मोठें!
परी धष्टपुष्टांस देणें फुकाचें,
फळ प्राप्त होतें तयें पातकाचें ३०

मनीं ठेवितां हाच सिद्धांत नित्य,
वरें आचरायास ये खर्चकृत्य.
पहा भीड सख्खी भिकेची बहीण!
न राहे कधींही दुजी एकवीण! ३१

भिडेच्यामुळें होत नाहीं वसूल;
भिडेच्यामुळें नष्टखर्चीहि भूल.
भिडेच्यामुळें आळशी होति भृत्य;
उधारी पुढें ठेवणें साफ वर्ज-
उरे खास उत्पन्न त्याच्याच आंत
खरा येउं दे खर्च आकारण्यांत. ३३
प्रतीसाल अंदाज आधीं करावा;
कधीं खर्च त्याहून जास्ती न व्हावा.
प्रतीवर्ष ठेवींच कीं शिल्लकींत-
रहावा तरी भाग गंगाजळींत ३४
स्वता होत नाहीं असी वर्तणूक!
बरा ठेवणें कारभारीच एक;
जनप्रीय सच्छील गंभीर ऐसा,
पगारें पुऱ्या स्नेहभावें उरेसा. ३५
जनापाशिं बोलावया कारभारी,
परी त्यावरी आपली दृष्टि पूरी-
असावी। सदा गुप्तरूपें पहावें;
तयाला कुठेंही चुकोंची न द्यावें. ३६
' दशांशाहुनी खास येणावळीच्या
कराया नको धर्म ' ही शास्त्र वाचा
न मानोनि जे खर्चिती व्यर्थ फार,
तयां कर्ज गांठूनि मारीत ठार! ३७
न दैवाकडे वा न देवाकडेही,
ऋणाचा कधीं दोष येणार नाहीं.

अव्हेरूनि शास्त्रास जो स्वैर वागे,  
न दैवा, न देवाहि तच्छन्द लागे- ३८  
असे ' उद्धरेदात्मनात्मान '-मेसें  
कथी कृष्ण गीतेंत तें व्यर्थ कैसें?  
करावें स्वयें कृत्य, दैवा रडावें!  
पसंतीस हें तत्व कोणा पडावें? ३९  
मुळीं कर्ज काढूं नये शास्त्र सांगे,  
अव्हेरूनि त्याच्या विरोधेंच वागे;  
तया पातकानें जरी कष्ट होई,  
तरी दोष दैवावरी केंवि येई? ४०  
असो फार सुज्ञां कथावें किमर्थ?  
विवेकेंच वागावया जो समर्थ;  
प्रसंगीं परी आठवेना स्वताला,  
अशा भावनेनेंच हा अर्ज केला. ४१  
अकल्याण होऊं नये त्वत्कुलाचें,  
तुझ्या मागुनी तेंवि तुझ्या मुलाचें  
अशा हेतुनें हा तुझ्यापाशिं अर्ज!  
नको काढुं कर्ज! नको ठेवुं कर्ज!!× ४२  
हितोपदेशें रागावे मूर्ख तोचि तयासम.  
हितोपदेश घे वागे सुज्ञ नाहीं तयासम ४३

## गृह्यतरंग समाप्त.

---

टीप— × ह्या कवितेंत बोलण्यासारखें लिहिणें अशी पद्धत स्वीकारल्यामुळें वृत्तनियमाला अनुसरून ऱ्हस्वदीर्घ व जोडाक्षरें यांची ओढाताण झाली तरी अर्थावर लक्ष देऊन सुज्ञ क्षमा करतील अशी उमेद आहे.

# राष्ट्रीयतरंग

## श्रीगोकर्णक्षेत्र देवताप्रार्थना.

( आर्याऽष्टोत्तरशतं )

श्रीविघ्नराज ! भगवन्! दुर्जनदुष्कृति विनाशपटुतर! भो!
शतशः प्रणम्य याचे तदिदं देयं कृपालुसुजनाविभो! १
श्रीमन्महाबलेश्वर! गोकर्णक्षेत्रधारिविश्वेश!
शतशः प्रणम्य याचे तदिदं देयं कृपाब्धिभूतेश! २
श्रीजगदंब! हिमालयवासिनि! सुरनरसुपूजिते! गिरिजे!
शतशः प्रणम्य याचे तदिदं देयं पुनीतनतमनुजे! ३
श्रीव्यंकटेश! नारायण! सकलजगच्छित्रावहितमूर्ते!
शतशः प्रणम्य याचे! तदिदं देयं सुहेतुपरिपूर्ते! ४
भो भोः सर्वेऽपि श्रीगोकर्णक्षेत्रभूषिणो देवाः!
शतशः प्रणम्य याचे तदिदं देयं दयाब्द भूदेवाः! ५
ह्या भारतवर्षाची काय पहा देव हो! दशा झाली!
संपत्ति सर्व जाउनि अति घोर विपत्ति कीं शिरीं आली! ६
पूर्वी पथिल लोकां अन्नें वस्त्रें इथेंचि भरपूर
लाभुनि, वाहत होता त्यांचा कीं सर्व विश्वभर पूर ७
सर्वपदार्थसुसहिता देशी जी होति भरतभू पूर्वी,
सर्वपदार्थविरहिता आतां कीं तीच जाहली ऊर्वी! ८

संपत्तिप्रद ज्या ज्या विद्या आणिक कला जगीं असती,
त्यांही भारतभूमी त्यजिली! सतिनीं जशी पुरी असती. ९
गंवडी, सुतार, न्हावी इत्यादींचीं समग्र हत्यारें,
कुदळी, खोरीं, नांगर, परदेशी काय ह्मणुनि हो सारें? १०
वस्त्र तसें, पात्र तसें, सूत, सुई, लेखणी तशी शाई,
कागद, चाकू, कात्री यानींही वांझ आमुची आई?! ११
सुरवरहो! काय वदूं? मणि-मंगलसूत्र-कंकणें तींही
परदेशांतुनि आल्याविण आमुच्या बायकांस गति नाहीं? १२
सौभाग्यकुल-वधूंचें कुंकूं सिंदूर अष्टगंध अहा!
परदेशी रंगाविण न घडे! किति दुःखकारि गोष्ट पहा! १३
हे श्रीमहाबलेश्वर! तवपूजाकालिं शर्करा देशी
क्षेत्रीं तुझ्या न मिळुनी, बुडतों दुःखीं! कधीं करा देशी! १४
नैवेद्यीं काशि घालूं विलायती शर्करा तुझ्या देवा!
गुड घालूं तरि ह्मणतिल विप्र 'नको तो अह्मा जिनस ठेवा.' १५
क्षेत्रीं कंकण-धारण विहित ह्मणुनि फिरुनि सर्व बाजार
मत्पत्निनें हुडकिले देशि चुडे! परि निराश ती फार! १६
अर्भकजन्मीं नालच्छेदन करण्यास शस्त्र परकीय.
परकीय साखरेविण बालमुखीं त्या पडेचिना तोय. १७
आहारही तयाला दुग्धें पिष्टें समग्र परदेशी
अद्यापि का न झाली ही भारतभूमिदुर्गति पुरेशी? १८
सुरवर हो! किति बघतां अंत असा ह्या विपन्न देशाचा?
तुमच्या कीर्तिपटाला डाग नव्हे काय हा अपेशाचा?! १९
डोकें दुखलें, आला ताप, अनारोग्य अल्पही घडलें.
तरि परदेशी औषध नसतां सगळ्यांस वाटतें अडलें! २०

आरोग्यहि असतांना ' कोको, कॉफी ' तसा ' चहा, सोडा,
वर्फ, सिगारेट, चिरुट ' तनुनाशक व्याप काय हा थोडा? २१

ह्या दुर्व्यसनापायीं गरिबांच्याही घरांतुनी पैसा
किति तरि परदेशाला जातो! परतुनि कधीं न ये ऐसा! २२

प्रभुहो! दरिद्रतेच्या दाढेला सांपडोनि हा देश
दिवसें दिवस चिरडतो! भिक्षुक होईल सत्वर धनेश! २३

ह्या देशोद्धारास्तव आधिं तुह्मा प्रार्थना असे कीं ही!
जागृत करा जनमनें तुमचीं वसतिस्थलें असति जीं हीं २४

बहु जनमन जागृतिविण देशोद्धारण अशक्य मज वाटे;
अज्ञानतमस्तंद्रा अझुनि न सरली ह्मणूनि उर फाटे! २५

काय स्थिति प्रभो! ही? भारतभूचा तुला न अभिमान?
किंवा रावण मानुनि परकीयां हें तुझेंचि वरदान? २६

तरि तेत्तिसकोटि तुला देव, ऋषी, यक्ष, सर्व गंधर्व,
त्रास न साहुनि विनविति ' विलयाचें हें पुरे नवें पर्व '! २७

किंवा आह्मी तुह्मां विसरुनि, धर्मात्यजुनि वागतसों
त्याचा हा परिणाम स्थानभ्रष्टत्वरूप भोगितसों? २८

तरि हा अज्ञानजनित अपराध पराभवावया ज्ञान-
लाभे तें तुह्मि द्यावें; संतति अज्ञान योग्य सुज्ञां न २९

' जगतः पितरौ ' ऐसें ह्मणति तुह्माला; ह्मणोचि योग्य नसे
हा पक्षपात! एका देशा दुसरा लुटोनि खात असे! ३०

लाभालाभ जयाजय सुखदुःख-द्वितय-लाभ पुत्रांस
शिक्षण अधिकार समचि देणें हें योग्य सुपितृमात्रांस. ३१

भूवरहि सुज्ञ राजे जनतेचे मायबाप ह्मणवीती

गोरी काळी जनता प्रिय अप्रिय ते कधीं न मानीती. ३२
विद्याभ्यधिकार-व्यापारीं कृषिकलादिकीं समता;
राज्यव्यवहारीं मत, सर्वांची सारखी मनीं ममता; ३३
पुण्यश्लोक नृपांचे हे नियम तुह्मींच त्यांसि नेमियले,
चुकतांच पाहिजे त्यां जनताहस्तें तुह्मीच बोधियलें. ३४
यास्तव जनताजागृति हाचि उपाय प्रमुख्य सर्वार्थी
देशोद्धारक; ह्मणुनी सुरहो! विनवूनि हे तुह्मां प्रार्थी. ३५
यात्रेकरितां येतिल जे जे स्त्रीपुरुष बालवृद्ध जन,
त्यांची विचारजागृति व्हावी परिसुनि पुणे हें भजन. ३६
आणि क्षेत्रस्थ द्विज कलह परस्पर अहा! दुरभिमानें
करिती! होति दरिद्री! मत्सरवश; आणि रहित धनमानें! ३७
सुरहो! तयांस बोधुनि जागृत तुह्माविणें कवण करिल!
विद्या-विनय-तपःश्री-शांति-सहिष्णुत्व तन्मनीं भरिल? ३८
पूर्वी वसिष्ठ मुनिचें महत्त्व जे वाढलें, कशानें तें?
शांति-सहिष्णुत्वानें किंवा क्रोधें द्विजास मह येतें? ३९
सत्यश्रद्धानिश्चय न ढळावा, त्रिविध ताप सोसावा,
हा सत्याग्रह विप्रावांचुनि कवणें जगांत पोसावा? ४०
विप्रांचें विप्रत्व, क्षत्रांचे क्षत्रियत्व, वैश्यांचे-
वैश्यत्व नष्ट झालें! बनलें शूद्रत्व कीं समस्तांचें!! ४१
सेवा हेंच असे जरि शूद्रांचें कर्म, विप्र तरि तेंच
करिती! कशास ह्मणती शूद्रांतें आपणाहुनी नीच? ४२
आचारें श्रेष्ठ म्हणू द्विज, तरि चांडाळ तुल्य कित्येक
वर्तति! हें जाणुनि ही इतरीं मिसळति! कुठें नग विवेक? ४३
विप्रेतर विप्रांवरि रुसती कीं "मूढ ठेवुनी आम्हां
श्रेष्ठत्व-सौख्य लुटुनी, सर्वांवरि हेच घालिती धिम्मा!" ४४

" ब्राम्हण असे मतलबी इतरांला ठेवुनी सदा नीच
'अस्पृश्य' म्हणुनि वगळिति; म्हणती सकलांत उच्च आमीच" ४५
परि यांत तथ्य आहे किंवा हा समज बुद्धिभेदाचा?
तें अंतरीं विवेचुनि बघतां कळतोच हेतु खेदाचा. ४६

राजे संस्थानिक वा कारागिर हे द्विजेतरचि अधिक;
अधिकार-सौख्य भोक्ते, व्यापारी ब्राम्हणाहुनी धनिक. ४७
प्रत्यक्ष धनोत्पादक तीं कामें ब्राम्हणेतरांपाशीं
पूर्वी होतीं; आतां असतीं। ते रुसति कां द्विजवरांशीं? ४८

ऐहिक सुखविरहित जीं संध्या तप वेदशास्त्र अध्ययन,
अध्यापन योग नियम देवाचें पूजनाऽग्निसंचयन, ४९
व्रत उपवासादिक जीं भिकारडीं त्रास भाजनें कर्में
तीं विप्रांचेच शिरीं असुनि, इतर त्यांस भांडती मर्में! ! ५०

तात्पर्य कीं नव्हे हा मत्सर वा कलह जातिभेदाचा.
हा कलह मूर्खतेचा आणिक हितशत्रुबुद्धिवादाचा. ५१
ह्या कलहास किति असे सत्यानें शुद्ध युक्तिसिद्ध असा
किंचितमात्रहि हेतु, 'शोधक' फोडोनि घेति फुकट घसा! ५२

कांहीं असो; खरें तें ठाऊक तुह्मासि! कलह न कराया
योग्य मति तुह्मी द्यावी सकलार्यानार्य- लोक- निकरा या. ५३
यात्रा आह्मी करितों अग्निरथीं आणि अग्नि-नौकांनीं!
तेणें निर्धन होते भारतभू अब्जकोटि रुपयांनीं! ५४

यास्तव पथिक धनिकां मतिसत्ता देउनी उभाराया,
लावुनि तीं तीं कामें, साह्य द्याया करा उभा राया. ५५

दिवसेंदिवस पहातां पुढें पुढें स्थिति भयंकराचि वाडे
एतद्देशीयांचा जीवन-निर्झर कसा पहा आटे! ५६
सर्वांचें जीवन जी शेती, साधन तिचें सुगोधन, तें
प्रतिदिन सहस्रशः कीं जिव्हालौल्यार्थ मृत्युवश बनतें ५७
परदेशस्थांच्याही पोटाच्या भरतिला अहा! गाई
एथुनि होति रवाना! हाय! गुरांची महा महागाई!! ५८
पोरें घरोघर तशीं आजारी माणसें किती रडती!
दुग्धघृतबिंदु झाले दुर्मिळ! तेणेंच जीव तडफडती!! ५९
हें सर्व आमुचें ना? जात असे आमुच्या करांतून?
दिवसाढवळ्या चाले केवळ ही नागवण घरांतून! ६०
झालिं शतादिक वर्षें जाउनि परहस्त आमुचें राज्य;
सकलकलाकौशल्यहि तदनंतर नष्ट जाहलें प्राज्य; ६१
परि भूमीची सेवा कृषिरूपानें करावया होती
आजवरी सवड, ह्मणुनि भीति कुणाला न वाटली हो! ती; ६२
मग हळु परजन येउनि नीळ-चहा-कॉफी-यूकलिप्तादि
पिकवायास्तव ह्मणुनी कांहींशी भूमि आधिं संपादि! ६३
आतां जलशक्तीनें उभारण्या थोर कारखाने जे
उद्युक्त संघ झाले ते मुकवितील त्वरें अह्मां पेजे ६४
परदेशी भांडवलें एथें साखर करावयासाठीं
निघतांच कारखाने शेतकऱ्यां हातिं नरवटी-काठी!! ६५
कोठेंहि कारखाने मोठे निघतांच यंत्रसाह्यानें
थोडे धनाढ्य, पुष्कळ लोक भिकारी, असेंच व्हायाचें! ६६
जनपद, धर्म, ज्ञाती, रूढी, आचार एकचि जयांचे
तेथिलहि कारखाने बहु लोकां लाविती सहज यांचे! ६७

मग भिन्नप्रकृतींच्या देशीं करितील कारखाने ते
किति, केवढे, अनर्थ? प्रलया-जनसंघ सारखा नेते?! ६८
जल अडवितील नद्यांचें! लोकांच्या जमिनि सहज हारितील!
वारितील शेती आपण! सकल जनांतें मजूर करितील!! ६९
काळे मजूर यांचे गोरे मालक असें जिथें आहे
प्रस्तुत इतरां देशीं, स्थिति तेथिल काय होउनी राहे? ७०
नीग्रोंस आफ्रिकेच्या, रक्तेंडियनां अमेरिकेच्या जें
तेंचि उदाहरण असे आह्मालाही समोर कीं ताजें! ७१
सुरवर हो! जननयनीं ज्ञानांजन घालुनी पटल काढा!
दृष्टिस पाडा कालें किति मोठ्या उघडिल्या पुढें दाढा? ७२
सगळे सगळ्या परिनें सांपडलेले असोंच कालमुखीं!
सगळे मिळुन सुटाया यत्न करूं तरिच मात्र होउं सुखी। ७३
जीवित्व-धर्म वैभव तीनहि परकीकरांत ज्या जाती
राष्ट्राचीं, तें शवसम! त्याची झालीच राख वा माती ७४
जीवित्व-धर्म वैभव संरक्षायास आत्मविश्वास
लागतसे! तो द्यावा; नाहीं जों बंद जाहला श्वास! ७५
पूर्वोक्त कालदंष्ट्रा चुकवाया पाहिजे तसी युक्ति
लोकांसि सुचो; जावो सिद्धीस; असोच द्या तयां भक्ति! ७६
तुमच्या भक्तिबलानें रंकहि होतो अजिंक्य विश्वास,
हें तत्व स्थिरचित्तीं, असतो त्यालाच आत्मविश्वास. ७७
जें कार्य प्रारंभिलें बहुतांनीं सुदृढ आत्मविश्वासें
तत्सिद्धि वैभवाचि तो पात्र जनसंघ मातरिश्वासें! ७८
सामर्थ्य चळवळीचें, चळवळ कर्तव्यही मनुष्यांचें,
द्या त्यांत पाहिजे जें ईशाधिष्ठान तें तुह्मी साचें. ७९

प्रस्तुत कालास उचित ऐशी चळवळ कशी करायाची?
दृष्टी न वक्र व्हावी त्या चळवळिनें ब्रिटीश रायाची; ८०
ऐशीच बुद्धि द्यावी एथिल सगळ्या अह्मां विविध लोकां
कीं व्हावें पात्र अह्मी जॉर्ज नृपाच्या दयार्द्र अवलोकां ८१
राज्याधिकार हातीं यायाला पाहिजे असें कांहीं
मी नाहीं ह्मणत; परी दुःस्थिति ही मात्र सोसवत नाहीं. ८२
जार्ज नृपानें आह्मां निजजनसमुचित समग्र अधिकार
उपभोगाया द्यावे; जीवन-धन-धर्म करुनि अविकार. ८३
प्रभुता भारतभूची जॉर्ज नृपानें यथेच्छ मिरवावी,
परि देउनी सचिवता एथिल जनतेस उचित निरवावी. ८४
विद्या-व्यापार-कला-राज्यव्यवहार-भूमिची सत्ता,
आंग्लांस युरोपीं तशि एथें आह्मास साह्य हो वित्ता- ८५
जॉर्ज नृपचक्रवर्ती आंग्लांस तसाच भारतीयांस.
समदृष्टीनें पाहिल, मति असि द्या त्यास तरि तदीयांस. ८६
जे दुष्टबुद्धि त्याचे सेवक इकडे अयोग्य रीतीनें;
पूर्वोक्त ताप आह्मा देती; लुटिती धना अनीतीनें; ८७
त्यांची रग जिरवाया द्यावी आह्मास बुद्धिसह शक्ति;
हीहि विनंति परकीं न ढळावी आमुची नृपतिभक्ति; ८८
तिळपापड होत असे श्रोत्यांच्या ज्यांचिया अनाचारें
त्यांस समर्पक शिक्षा पोंचावी कोणत्या तरी द्वारें. ८९
अधिकार योग्य असती सामान्यपणें मनुष्यतेला जे
तेहि न उरले तरि मग पात्र न कैसे मनुष्य ते लाजे?! ९०
ह्या लाजेंतुनि व्हाया आम्हा निर्मुक्त धैर्य, विश्वास,
स्वत्वाभिमान लागे; भक्तित तुमच्या वसोचि तो खास. ९१

आजवरी परवैभव तेजानें राष्ट्र मोहिलें होतें;
खरतरदारिद्र्यानें जागृत नुकतेंच होतसे हो! तें. ९२
अद्यापि जागृती ही सगळ्या गात्रांसि जाहली नाहीं;
होतो घात परवशास्वजनीं पुरवीं सुषुप्तिला नाहीं! ९३
जरि ह्या दारिद्रतेनें होईल अशक्त राष्ट्र याहून
तरि काय धनुर्वातापरि उपयोग स्मृतीहि राहून? ९४
सुरवरहो! अंत नका पाहूं! आणिक विलंब लावु नका
वैद्य यशस्वी होइल रोग्याच्या मृत्युला वळावुन का? ९५
धांवा! पावा! ठावा दावा! घ्यावाऽवतार अकरावा!
कावा चावा घ्यावा, हा व्हावा फोल! नृप वश करावा! ९६
राष्ट्रीयसभा भारतवर्षाची ही यशस्विनी व्हावी.
हिंदुमुसलमानांची एकी दृढतर सदैव राहावी ९७
ब्राह्मण-अब्राह्मण हें लावितसे खूळ कोण? समजावें!
वर्णविवेकांतिल हितअहित समग्रांस पूर्ण उमजावें ९८
न करी स्पर्श ह्मणोनी रुसे मुखावर किती गुदद्वार-
एका तनूंत? राष्ट्रीं विचार हा करुत चर्मक महार. ९९
जें रक्त गुदद्वारीं फिरत असे तें मुखींहि येत असे.
एका तनूंत? राष्ट्रीं विचार हा विप्र न विसरुत कसे! १००
मासान्नापेक्षां किति वानस्पत्यान्न होय शुभकारी
म्लेंच्छसमाजासि कळो! अगणित जो फुकट गोधन भकारी १०१
देशी मिळेल तें तें अभिमानें ग्राहकीं सदा घ्यावें
विकणारांनीं परि तें अल्प नफ्यानें स्वबंधंचें विकावें १०२
'चुकतो देहांत तरिच तितुक्या पुरता पदार्थ परदेशी
'सोसेल' असा देवा! सर्वांस हितार्थ कां न वर देशी? १०३

समदर्शित्वें सुरहो! हें विश्व जसें तुह्मीच चालवितां,
राज्यतरुपर्ण तैसें विषम मतीनें न येऊं हालवितां! १०४
राजप्रजामतैक्याविण सुरळित हें कधीं न जुळणार!
शेरसवाशेर तराजूंत जसे सारखे न तुळणार! १०५
मुख्यत्वें हें द्या कीं सगळ्या देशांत सारखी सत्ता
निजरक्षणशक्तिसहित उपभोगाया मिळो तसि सुबत्ता. १०६
सर्वांसि सुख असावें; सर्वां नीरोगिता तशी नित्य.
जीवनधननिर्वाहीं न रुचो, न पचो, कुणासहि असत्य. १०७
धर्म-व्यवहार-व्यापाराची मोकळीक सर्वांस
सर्वत्र समान असो. कारण होओ न युद्धपर्वास. १०८

श्रीगोकर्णक्षेत्रदेवचरणीं दंडवन्नति ॥
अष्टोत्तरशतार्यांनीं प्रार्थना हे यथामति ॥

---

## आरती श्रीगणपतीची

( चाल साधी )

जय जय विघ्नविनाशा! सुखदा! विश्वेशा! ॥ त्रिपदेंतुनि उद्धरीं त्या अमुच्या प्रियदेशा! ॥ ध्रु० ॥ ज्या देशांतिल अन्नें पोसति परदेश, ॥ इतुकेंचि नव्हे; होती शतकोटिधनेश! ॥ त्या देशांतिल आह्मां नुरला सुखलेश! ॥ डोळे झांकिशि कैसा जरि तूं करुणेश? ॥ १ ॥ ज० ॥ प्रतिवर्षीं दुष्काळें मरती जन

कोटि! ॥ दाणा बाहिर जातो कोटींच्या कोटी! ॥ कापुस एथें पिकुनी रुपयांचा कोटि, ॥ लक्षावधि लोकां धड न मिळे लंगोटी! ॥ २ ॥ ज० ॥ बुडले धंदे! गेलें कौशल्य लयाला! ॥ अन्य मुखाविण लाभे पाणी न पियाला! ॥ वस्त्र तसें पात्र तसें सुत सुवी याला-॥ ठाव न शाई लेखन पत्र लिहायाला! ॥ ॥ ३ ॥ ज० ॥ सुतार गवंडी न्हावी ह्यांचीं हत्यारें ॥--कुदळी खोरीं नांगर परदेशी सारें! ॥ द्रव्य निघे एकंदर वस्तूंच्या द्वारें॥ किति तरि शहरें झालीं बघ भिक्षाऽऽगारें!! ॥ ४ ॥ ज० ॥ कौशल्य कला खाती हीं राक्षसि-यंत्रें! ॥ व्यापार चले गाड्या कोटींच्या तंत्रें! ॥ तोहि न रुा बळकाविति परकी जन मंत्रें!! ॥ सगळा देशचि पिळिला परदेशी जंत्रें!! ॥ ५ ॥ ज० ॥ विश्व-व्यापक देवा! हृदयांतरवासी! ॥ ह्मणुनी अनन्यभावें प्रार्थू तुजपाशीं!! ॥ देशस्थिति-कारण हें कळेल, सर्वांशीं ॥-ऐशी सुबुद्धि देऊनि, उद्धारिं देशासी; ॥ ६ ॥ ज० ॥ कारागिरांसि धन तें धनिकांनीं द्यावें; ॥ वागुनि सचोटिनें तें त्यांहीं फेडावें; ॥ देशी मिळेल तें तें अभिमानें घ्यावें ॥-सर्व जनीं परदेशी ह्मटुनी वर्जावें!! ॥ ७ ॥ ज० ॥ ऐशी कृपा करीं बा! हे दीनदयाळा!॥ तुजविण दुसरा नच या समर्थ कार्याला! ॥ त्रिंशत्कोटि जनांची विपत्ति जायाला ॥-आरति भावें करितों! भो! त्रिजगत्पाला!! ॥ ८ ॥ ज०॥

॥ २ ॥

## आरती श्री सरस्वतीची.

( चाल-लावणी )

ओंवाळूं आरतिनें त्रिजगज्जननि सरस्वति माउली! ॥ स्वदेश-ताप हराया प्रार्थुनि कृपातरूची साउली ॥ ध्रु० ॥ चौदा विद्या चौसष्ट कला ज्या ज्ञानानें लाधती, ॥ तें ज्ञान तुझें रूप तयाची लीला फार अगाध ती! ॥ सर्व जगद्व्यवहार तुझ्या ह्या लीलायोगें चालती! ॥ मूढ आळशी ह्मणुनी आह्मीं जगीं बहुखालतीं ॥ओं० ॥ १ ॥ तूप तेल जाळुनी आमुच्या हस्तीं आलीं निरंजनें! ॥ तरिही नाहीं नेत्र उघडले दारिद्र्याच्या अंजनें! ॥ लक्षावधि जन मरति पहा हे जननि! भुकेच्या गंजनें! ॥ स्वदेशी-व्रतें तयां वांचवीं अज्ञानाच्या भंजनें! ॥ ॥ ओं० ॥ २ ॥ सर्वांच्या हृदयांत विंबवीं व्यापाराचें तत्व तें! ॥ कलाकुशलता विद्या-शिकवीं तुर्त जिहीं धन लाभतें! ॥ निज-देशोथ्थित वस्तुचि होवो प्रिय सर्व जनांच्या मतें ॥ अज्ञ जनांसहि उघडुनि देईं देशहिताचें द्वार तें ॥ ओं० ॥ ३ ॥

---

## श्री सरस्वतीची आरती

आरती खरी-अविलंबें ॥ होईल कशी जगदंबे ? । तोंवरी ॥ ध्रु० ॥
अज्ञान अंधकारानें । उठविलें न मानिचें ठाणें । जोंवरी ॥
निजधर्मप्रेमभरानें । भरलें न चित्त निकरानें । जोंवरी ॥

निजदेशा परभारानें । चेपिलें असे प्रखरानें । जोंवरी ॥
ह्या अशा गोष्टी शल्यशा । साहती कशा ? ।
खुपति त्या हृदया । काढिशी न गे ! तूं सदया । जोंवरी ॥
आरती खरी० ॥ १ ॥

ग्रासिते असी देशाला । आमुच्या ही कुदशा ज्याला । जों० ॥
विधियुक्त हव्यकव्याला । मुक्तता नसे आह्माला । जों० ॥
सद्विद्या अभ्यासाला । त्यापरी सदुद्योगाला । जों० ॥
कोणती । गोष्ट उन्नती । घडविणार ती ।
कराया जातां । अडथळा होतसे हातां । जोंवरी ॥
आरती खरी० ॥ २ ॥

निजदेशकला कौशल्य । भोगितें पूर्ण वैकल्य । जोंवरीं ॥
व्यापार उदिम निर्माल्य । वंध्यास्त्रीप्रेमा तुल्य । जोंवरी ॥
राजनीतिचें सौज्वल्य । सत्तेविण वारि वैफल्य । जोंवरी ॥
ही स्थिति । प्रतिजनाप्रति । उमजुनी अति ।
प्रबल यत्नानें । तुरविली सकल देशानें । जोंवरी ॥
आरती खरी० ॥ ॥ ३ ॥

तूं सकल हृदीं वसणारी । बुद्धि हें रूप धरणारी । जोंवरी ॥
झटसी न भारतोद्धारीं । निजसी निजशय्यागारीं । जोंवरी ॥
ही भारतकुदशा भारी । चालणार अप्रतिकारी । जोंवरी ॥
आरती । उजळणार ती । कवण भारतीं ? ।
सजीव न गाजी । अमुच्या मृतमनुजसमाजीं । जोंवरी ॥
आरती खरी० ॥ ४ ॥

अंबे तूं नव्हसी जागी । सकलांचे अंतरभागीं । जोंवरी ॥
ध्येयरूप एका जागीं । प्रकटसी न निजसर्वांगीं । जोंवरी ॥
उठविसि न भारता लागीं । नवचैतन्यें अनुरागीं । जोंवरी ॥
तोंवरी । ही कशीतरी । आरती ! बरी-।
मानुनी घ्यावी । भारता चेतना द्यावी । तोंवरी ॥
आरती खरी अविलंबें ।
होईल कशी जगदंबे । तोंवरी ॥ ५ ॥

---

## श्रीजगज्जननीची आरती.

( चाल--आयकें अहो ऋषिजाये मज वरिलें )

आरती जगज्जननीतें ओंवाळूं प्रेमें प्रीतें ॥धृ०॥ श्रीनारायण हे पूर्वी निद्रावश झाल्याकालीं मधुकैटभ राक्षसयुगलीं विधिलागीं छळिती झाली । प्रकटली विधीनें स्तवितां जी होउनि महाकाली । दशभुजीं दशायुधधर्त्री । सुजनांवरि करुणाकर्त्री । कुजनाची दुर्मति हर्त्री । जयजय जय बोलूं तीतें ॥ आरती० ॥ ॥ १ ॥ मातला भयंकर जेव्हां महिषासुर तत्संहारीं । विष्णु-रुद्र-विधिइंद्रादि स्थानच्युत पडले हारीं । स्तवितां तत्तेजः पुंजीं प्रकटली स्वरूपें नारी । तीच महालक्ष्मी झाली । कांतिची विलक्षण लाली । अष्टादश आयुधशाली । जय जय जय बोलूं तीतें ॥ आरती० ॥ २ ॥ शुंभनिशुंभांसह दुसरे चंडमुंड दैत्यही उठले । इंद्र- चंद्र-वरुणाग्न्यादिक देवांला पळवित सुटले । त्रिजगांतील रत्नें तैसें धन सारें त्यांहीं लुटिलें । तद्दैत्य निवा-

रणकालीं। जी महासरस्वति झाली। सितकांति अष्टभुज-
शाली। जय जय जय बोलूं तीतें ॥ आरती० ॥ ३ ॥ सांप्रत
तों त्याहुनि मोठा पातला कठिण हा काळ। कीं भरतखंड-
भूवरती कोसळे जणुं आभाळ। व्यामोहरूपधारी हा घोर दैत्य
बहु विक्राळ। यानेंच भरतखंडाचा। विध्वंस मांडिला साचा।
व्हावया पराभव त्याचा॥ जय जय जय बोलूं तीतें॥ आरती० ॥
व्यामोहें भारतभूचे करिंची प्रभुता घालविली॥ सर्वोज्ज्वल
धर्मज्योती त्यामुळें अहा! मालविली। अतिपवित्र आचारांत
भ्रष्टता घाण कालविली। श्रद्धा जी धर्मावरिची। तेंवि पुण्य-
कर्मांतरिंची। सलते जणुं नेत्रीं मिरची॥ जय जय जय बोलूं
तीतें ॥ आरती० ॥ ५ ॥ व्यामोहें भारतभूचें विद्याधन लोपत
आलें। चौसष्टकलासंघाचें हें हाय! खोबरें झालें। उद्यमीं ध-
नोत्पादन तें परदेशीं पूर्ण पळालें। हा दारिद्र्याचा घाला।
आलस्यासोबत आला। सत्वर त्या परतायाला॥ जय जय
जय बोलूं तीतें ॥ आरती० ॥ ६ ॥ जगदंबे लौकर पावें या
दुर्धर संकटकाळीं। वर्ण धर्मजाति-द्वेषां अज्ञान-मत्सरां जाळीं।
सर्वसौख्यमूळ असें तें बंधुत्व ठसों दे भाळीं। उद्यमप्रीति पर-
मार्थीं। तैसीच स्वोद्धारार्थीं। सर्वांसि पटो या अर्थीं। जय
जय जय बोलूं तीतें ॥ आरती० ॥ ७ ॥ निजदेशभक्तिरूपानें
अवतरसी जरि तूं आतां। ठेविशीं वरदकर साऱ्या भारती
जनांचे माथां। सगळेच पात्र जरि होती तव कृपादृष्टिच्या
पातां। तरिच मात्र ह्या देशाचा। उद्धार शक्य ही वाचा।
सार्थ करिल महिमा जीचा। जय जय जय बोलूं॥ आरती ॥८॥
श्रीदेशभक्ति देवीचें ध्यान करूं सगळे भक्त। कोट्याधिक

करपदशीर्षें कर्ण-नेत्र जीचे व्यक्त । भिन्नभिन्न उद्यम सारे हीं शस्त्रास्त्रें उद्युक्त । ही भरतभूमि तनु जीची । सिंधु नद्या लुगडीं साचीं । व्यापार भूषणें तीचीं । जय जय जय बोलूं तीतें ॥ ॥ आरती० ॥ ९ ॥ हे देशभक्ति जगदंबे ! पाहुं नको आतां अंत । प्रत्येक देशबंधूचा व्यापुनियां हृदयप्रान्त । करि पावन निज-वास्तव्यें सकळांचें पूर्ण स्वान्त ।

होईलचि देशोद्धार
सफलही जिचा अवतार
विश्वास जिचा आधार
जय जय जय बोलूं तीतें ॥ आरती० ॥ १० ॥

---

## आरती श्री शंकराची

( चाल–ओंवाळुं आरती मदन गोपाळा )

ओंवाळूं आरती शिवशंभू राया ! ! ॥ देशद्रोह्यांचीं मतें पूर्ण संहाराया ! ! ॥ ओं० ॥ ध्रु० ॥ फार कहर केला ! विश्वासाच्या घातें ! ॥ भिकेसी लावियलें संपन्न देशातें ! ॥ ओं० ॥ १ ॥ देश-बंधूंच्या गळां बांधोनीयां पाश, ॥ शत्रूंच्या हस्तीं देतों ! करितो आह्मी नाश ॥ ओं० ॥ २ ॥ फूट पाडोनी अपुले देश-गृह भेदीती ! दावूनी वळवीं त्यानां त्रिशुळाची भीती ॥ ओं० ॥ ३ ॥ बुडालें वैभव अमुचें फीतुरीचे मुळें ! ॥ खणोनी काढावीं त्याचीं प्रभो ! पाळें मुळें ! ॥ ओं० ॥ ४ ॥ रुचावी देवा आह्मां स्वदेशाची भक्ती ! ॥ भक्तीनें एकी करुनी वाढवावी शक्ती ! ॥

॥ ओं० ॥ ५ ॥ हृदयीं बिंबावें अमुच्या एकत्वाचें तत्व! ॥ तत्व तें लक्ष्यीं येतां सहज वाढे सत्व! ॥ ओं० ॥ ६ ॥ करावा अमुच्या हस्तें देशाचा उद्धार! ॥ ह्मणुनीयां काकुळती आलों देवा फार! ॥ ओं० ॥ ७ ॥

---

## आरती श्रीमदनंताची.

( चाल-होईल कलह ह्मणोनी० )

आरति तुज भगवंता ॥ ओंवाळितसों। श्रीमदनंता ॥ धृ० ॥
अहिशयनि क्षिति निजुनि रहासी। भारत भूप्रति कां न पहासी.॥
नाहीं तिची तुज चिंता। ह्मणुनी पावे अशिहि दुरंता. ॥ आ०१ ॥
काय पहाया भारत भूसी। दुस्थिती आली बघवेनाशी. ॥
तूं तिज असुनि नियंता। कैसें गेलें वैभव अंता ॥ आ० ॥ २ ॥
वैभव मात्र न धर्महि बुडला। पापाचा कीं पाऊस पडला ॥
रोगी बहु तव जनता। बघवे कैसें गोधन-घाता ॥ आ० ॥ ३ ॥
द्रव्योत्पादक धंदे सगळे। कपटानें वा अधिकार वळे ॥
पोचवुनी हे अंता। परजन मिरविती हंसुनि अहंता ॥आ० ॥४॥
प्रभुता गेली परकीय करीं। धनहि नुरे भारतभू पदरीं ॥
नुरली उद्यमिं सत्ता-। स्वहितीं झटतां वसते लत्ता. ॥ आ०५॥
ब्रीद तुटे जरि गो द्विज पालन। धर्म सनातन सज्जन लालन ॥
अवतरसी त्या करितां। कां न तयाचा प्रत्यय आतां ॥आ०॥६॥
आतां उशिर विभो नच लावी। अवतरुनीयां सत्वर यावीं ॥
भरतजनांच्या स्वान्ता। ज्ञान-यत्न-सिद्धि श्रीकान्ता ॥७॥आ०॥

करुणाघन तुज बुधजन ह्मणती । दीनोद्धारकही गणिती।
प्रत्यय याचा आतां । प्रार्थू चरणीं ठेवुनि माथा ॥ आ०॥ ८ ॥

---

## आरती श्री विष्णूची.

( चाल दशावतारी )

आरति हे प्रेमाची जयजय दुर्मतिसंहारा ! ॥ गोविद्या-भूपालक ! शरणागतदीनोद्धारा !! आ०॥ ध्रु०॥ आर्यभूमि हे होति आमुची कैशी प्राक्काली ? ॥ हाय हाय ! हे प्रभो ! तिची गति आज काय झाली ? ॥ कवणाच्या अपराधें शिक्षा दैवें तिज्या आली ? ॥ अमुचा ज्ञातिद्वेष कि तिजला ह्या दुःखीं घाली ? ॥ आ०॥ १ ॥ परस्परांचा परिभव चिंतुनि कलह द्विज करिती ! ॥ मत्सरांध त्यांसवें मराठे द्वेषें वावरती ! ॥ नीच म्हणुनि हे उलट तयानां अधिकाचि धिक्कारिती ॥ मुसलमान सगळ्याच हिंदुच्या शेंड्या पिळवटिती ॥ आ० ॥२॥ आर्यभूमिपुत्रांनीं ख्रिस्ती होउनि कित्येकीं, ॥ मद्य मांस सेवनेंचि केली इतरांशीं बेकी ! ॥ समाज सरसावले कराया सर्वांची एकी ! ॥ परि फुटती सगळ्यांचीं कलहें पहा ! प्रभो ! डोकीं ! ! ॥ ३ ॥ आ० ॥ बळ सगळें या ज्ञाति--मत्सरीं खर्चुनि ते सरलें ! ॥ आह्मि मूळचे आर्य एवढें अहंपणाचि उरलें ! ॥ विद्वत्व तरी कधींच मागें आळसांत मुरलें ! ॥ रक्षिं समर्था ? चहुंकडुनी तूं दैव जरी फिरलें ! ॥ ॥ आ०॥ ४ ॥ ज्ञातिधर्म हे उपाधि-भेदें पुष्कळ जरि झाले, ॥ सर्व समर्थ प्रभु एकाचि हें तत्व न कधिं हाले ! ॥ प्रभुभक्तीचे

मार्ग सारखे सर्वांलाचि खुले-- ॥ अता श्रेष्ठ--कनिष्ठ रागाचें खुळ काय चाले? ॥ आ० ॥ ५ ॥ भरतभूमि हे एकचि माता सगळ्या पुत्रांची! ॥ एक परात्पर परमेश्वर ही पितृमूर्ती त्यां-ची! ॥ सर्वांचे अधिकार सारखे रीती आत्यांची—॥ उल्लंघिति त्यां दंड करावा जगदीशा! त्यांची! ॥ आ०॥ ६ ॥ अनंत डोळे हस्त मस्तकें! विराट् तुझें रूप! ॥ बहु जन- हृदयीं बिंबित होईल जागृत चिद्रूप! ॥ मुके बोलतिल! पंगु चालतिल उपजोनि हुरूप! ॥ तरीच अनुभ्य दुःस्थितिचा ह्या जळुनि होय धूप! ॥ आ० ॥ ७ ॥ श्री विष्णो! घननीळा! सुंदर वनमाळा धारा! पीतांबर--परिवेष--युता! भगवति--कमला-धारा! ॥ कोटि-कोटि-नक्षत्र-रत्न-संकलिताऽलंकारा! ॥ निज-रूप-प्रादुर्भावें करिं दुर्गति परिहारा! ॥ आ० ॥ ८ ॥

---

॥ ५ ॥

## आरती श्रीसूर्याची

( चाल-आरती ज्ञानराजा )

आरती हे तिमिर-नाशा! ॥ फुलवीं उन्नतीच्या कोशा; ॥ आल-स्याचा जळो गाशा! ॥ प्रकाशवीं पूर्व आशा!! आरती हे० ॥ धृ० ॥ किती दाट अंधकार! ॥ अज्ञानाचा भयंकर! पसरला आह्मांवर! ॥ नेती लुटोनीयां चोर !! ॥ आरती हे० ॥ १ ॥ दारिद्र्याची घोर रात्र! शुद्धिहीन अवघें राष्ट्र! ॥ हालेनाची कांहीं गात्र! ॥ शत्रुंपुढें भक्ष्य पात्र!! आ० हे० ॥ २ ॥ स्वप्ना-मध्यें किती एकां-॥ राज्य-लाभ झाला लोकां! ॥ खरी मानी

सत्ता जो कां, ॥ अंतीं पात्र होई शोकां ॥ आरती० ॥ ३ ॥ स्वप्नांतील मोठमोठे ॥ अधिकार सारे खोटे। क्षणमात्र हर्ष वाटे. मागोमाग शोक दाटे। आरती० ॥ ४ ॥ अज्ञानानें सौख्यभ्रांती ॥ निर्बळत्वें दीसे शांती। ॥ शत्रु कपटें ह्मणती "खंती ॥ नाहीं; साधू हे वेदान्ती" ॥ आरती० ॥५॥ नोह त्यांची बुद्धी साधी ॥ हळू देतील समाधी? ॥ ऐसें व्हावयाचें आधीं ॥ जागृतीनें हित साधीं! ॥ आरती० ॥ ६ ॥ देवा! लवकरी उदित होईं ॥ प्रकाशवीं दिशा दाही! ॥ सचेतन राष्ट्र होई ॥ ऐशी कृपा करी कांहीं। ॥ आरती हे० ॥ ७ ॥

॥ ६ ॥

## विडा.

विडा घ्यावा पंचमूर्ती ॥ गणाधीश! सरस्वती। ॥ शीव! विष्णू! दिनपती। ॥ व्हाया देशसमुन्नती। ॥ विडा घ्यावा० ॥ १ ॥ जातिद्वेष जाळोनीयां, केलें नाजूक हें चूर्ण ॥ कालवीलें प्रीती-जळें ॥ सारवीलें चित्त-पर्ण। ॥ विडा घ्यावा० ॥ २ ॥ देशी धंदे पूगीफलें ॥ आभ्यासांत शिजवीलें ॥ पक्क पर्णीं ठेवोनीयां ॥ यथा युक्त गुंडाळीलें। ॥ विडा० ॥ ३ ॥ नाना मतांच्या साराची ॥ कातगोळी वाळिली साची ॥ सद्धर्म कस्तुरीच्या ॥ पूर्ती केली सुवासाची। ॥ विडा घ्यावा० ॥ ४ ॥ तांबूल हें बनवाया ॥ बुद्धि सर्वहि जनां या ॥ पाहिजे तुह्मी द्याया, ॥ राष्ट्र--उभें राहाया। ॥ विडा घ्यावा० ॥ ५ ॥

# गीतोपदेशपंचक

आर्या

निजकर्तव्य करावें इतुका अधिकार मात्र तुज पार्था! ॥
तत्फल केव्हां कैसें द्यावें, ह्या मीच जाणतों अर्था. ॥ १ ॥
निज अल्प बुद्धिनें तूं जें जें सुखदुःख मानिशी तें तें ॥
माझ्या प्रौढ मतीला येतें किंवा न केधवां येतें ॥ २ ॥
तूं अज्ञ; सुज्ञ मी बा! तूं छोटा; मी तुझ्याहुनीं मोठा. ॥
जाणुनि सदैव मत्कृति मान्य करीं; वाटला जरी तोटा. ॥ ३ ॥
भरिभार सर्व मजवरि टाकुनि, तूं प्राप्त होय तें भोगीं. ॥
शास्त्रोक्त ती मदाज्ञा पाळीं; तेणेंचि होसि बा! योगी. ॥ ४ ॥
सुख होतां न फुगावें; सुजनें दुःखें तसेंचि न डगावें; ॥
दोन्ही मत्कृत मानुनि, समवृत्तींत स्वचित्तहि तगावें. ॥ ५ ॥

---

# संसार वैचित्र्य.

श्लोक

कुठें विद्वान् गोष्टी करिति कलहा मद्यप कुठें.
कुठें वीणा वाजे अति विकट दुःखध्वनि कुठें
सुरम्य स्त्री कोठें तशिच अढळे जर्जर तनू
गुणा संसाराच्या अमृत समजूं कीं विष ह्मणूं ॥ १॥

---

# आस्तिक्यशतक.

## आर्या

न कधींच पाहिलें जिस, कोणि जिचा शब्द ऐकिला नाहीं.
ऐशी व्यक्ति असे, हें वाटत नाहीं खरें मुलांनाही. १
परि आपणासि ह्मणविति 'सुज्ञ' ' समंजस ' तसेचि 'विद्वांस;'
'ईश्वर आहे' ह्मणणें सत्य कशावरुनि वाटतें त्यांस? २
उपयुक्त विषय आणिक उद्योग-महत्व पूर्ण सोडून,
अप्रत्यक्ष-फलाशा धरुनि बसति हरिस हात जोडून! ३
' हरिहरि ' शिवशिव ' कोणी ' अल्ला ' ' येशू ' ह्मणोनि दिनरात्र
घालविती बालकसे काल फुकट शिणवुनीहि निजगात्र! ४
दारिद्र्याच्या योगें अन्नाच्छादन पुरें तसे ज्यांस,
ऐसेहि मूढ (!) करिती द्रव्यव्यय कितिक देवपूजांस!! ५
नानाविध रोगांहीं आधीं सामर्थ्य जाहलें क्षीण;
तरिही, कल्पित-ईश्वर-भक्तीस्तव मूर्ख (!)सोशिती शीण! ६
ह्या ईश्वरभक्तीच्या वेडामध्यें जगांत किति लोक
घालवुनी काल फुकट, सोसुनियां हाल, पावती शोक!! ७
यापरि जनीं मनींही करिती आश्चर्य संप्रति ' ज्ञाते ' (!)
'ईश्वर वस्तुचि खोटी' ह्मणति हठें करुनियां प्रतिज्ञा ते ८
परि ऐसे 'प्राज्ञ' जगीं किति ह्मणुनी शोधुनि जरि पहाल!
अल्पाहुनि अल्प दिसुनि आश्चर्यें चकित होउनि रहाल! ९
खंडींत पाव रति, कीं खसखस सिंधूंत एक, त्या परिस.
नास्तिक जगांत थोडे इतरांच्या कधिं न ते पुरति सरिस. १०
वास्तव, ' गणना नलगे त्यांची ' ' त्यांच्या मतांत तरि जीव
कसला? असें ह्मणों तरि अल्पहि विष, सेवितांचि हरि जीव ११

नास्तिक्य बुद्धिरूपी जालिम विष, त्यांत आजवरि बहुत
झाले पतंग दीपीं परमेश्वरभक्तिरहित गरिब हुत. १२
वास्तव विष, रोग, सुरा, चौर्य, तसें वृजन नास्तिकी बुद्धी
इत्यादि अल्प असतां नष्ट करावी, न हो ह्मणुनि वृद्धी. १३

बा नास्तिका! तुला परमेश्वर न दिसे, न शब्दही त्याचा
ऐकूं येतो, ह्मणुनचि त्यावरि आरोप कीं असत्याचा? १४
तरि सांग, पाहती तव नेत्र तसे शब्द ऐकती कान
पणज्याच्या पणजाचे? त्याचें अस्तित्व मानिसी? का न? १५
पितरांविण पुत्र नव्हे हें तूं प्रत्यक्ष पाहसी जगतीं,
आरंभींचीं पितरें कोणापासोनि जन्मलीं मग तीं? १६
वृक्षाविण बीज तसा बीजावांचोनि वृक्ष होत नसे.
आरंभीं वृक्ष कसा अथवा निर्माण बीज होय कसें? १७
दोहोंतुनि एकाचा कर्ता होतोचि गृहित कोणी तरी?
त्यासचि ईश्वर ह्मणणें न सुटे; धडपड कितीहि केलि जरी. १८
यापरि उत्पत्तीचा आरंभ तसाचि कीं जगत्स्थितिचा
सूक्ष्म विचारें बघतां, अतर्क्य शक्तीच थांग लावि तिचा. १९
उत्पत्ति-स्थिति जैसी तैसा संहारही अतर्क्य न कां?
होतो जपतां खपतां ह्मणतांही 'नाश होउं देउ नका' २०
नास्तिक ह्मणती 'सृष्टि-स्थिति-लय होतात हे स्वभावानें
ऐसा स्वभाव ज्याचा, भजणें त्यालाचि ईश-भावानें. २१
लोकीं स्वभाव म्हणजे धर्म असी स्पष्ट होतसे व्याख्या
तो धर्म ज्यांत वसतो. ईश्वर ही त्यास लावितों आख्या, २२
कीं धर्म पदार्थाविण, पुरुषाविणही स्वभाव राहि कुठें?
आधेय तसें आधारावांचुनि? हाचि नियम लागु इथें. २३

भौतिक शास्त्रें किंवा सृष्टींतिल जे नवे नवे शोध;
त्या सर्वांच्या पूर्वी-मूळाशीं काय? हें मनीं शोध. २४
अज्ञेय अतर्क्य तसें अचिंत्य कांहीं तरी गृहित होतें.
अव्यक्त तत्व काय न ऐहिक अस्तित्व सिद्ध करि हो तें? २५
अव्यक्तांतुनि होतें व्यक्त उदित, हाचि शास्त्रनियम असे-
सिद्ध; तया नास्तिक हो! अवमानुनि सोडुनीच द्याल कसे? २६
अजि तुह्मां मधले जे शोधक धीमंत सृष्टि-नियमांचे
ह्मणती काय पहा कीं ' पूर्ण स्वाधीन सृष्टि नियमांचे ' २७
दिसतांचि नियम, होतो अनुमानें सिद्ध कीं नियमकर्ता;
निर्बुद्ध पुष्ट बालक बघतां अनुमितचि जेंवि तद्भर्ता. २८
सृष्टि ह्मणाल जड, तरी चलनावरुनीच सिद्ध चालविता.
तीस सचेतन ह्मणतां? तरि वरि ईशत्व ती सचेतनता. २९
एवं नियामकाविण नियम न घडती. न तेंवि त टिकती;
विक्रेत्याविण जैसे बाजारांतिल पदार्थ नच विकती. ३०
तेंवि जगाचा चालक, जग चाले ह्यावरूनि सिद्ध ठरे;
पारि ' तो किति मोठा ' वा ' रूपें कसला ' ह्मणोनि किंतु उरे ३१
हा किंतु पूर्ण व्हाया सकलांहुनि जो जुना बहु पुरावा,
तो जास्त महत्वाचा मानुनियां लागतो पतकरावा- ३२
सर्वांहुनी पुरातन- माहितिचे निधि अनादि जे वेद,
ते आदरिल्यावांचुनि गति नाहीं; यांत काय मतभेद? ३३
वेद ह्मणाति ' पुरुषचि हें जें भूत तसेंचि सर्व जें भव्य;'
त्या पुरुषाचें रूप न कथवे; कीं फार थोर तें भव्य- ३४
असति हजारों त्याला शीर्षें, नेत्रें; तसेंच कर, पाद;
भू-जल-तेज-समीर- ख हीं व्यापी तोचि; त्यांतहि न वाद. ३५

परि हें वर्णन त्याच्या दृश्य सगुण नश्वर स्वरूपाचें
ह्मणुनी पूर्ण न ह्मणवे; पूर्ण असे तें न वर्णवे साचें. ३६
तद्रूप यथार्थ कुणा बघवे, शिववे, न ऐकवे, कथवे.
तैसें न हुंगवे निजबुद्धीला जाणवे, मना जथवे; ३७
हीं पंच इंद्रियें मन बुद्धिसह तयासि पाहतां थकती-
त्यांच्या गतीपलिकडे तें; ह्मणुनी पाहण्या न तीं शकती. ३८
परि बहु अभ्यासानें वाढवितां शक्ति इंद्रियगणांची,
दुःसाध्य साध्य करण्या वाढतसे योग्यता किति जणांची ३९
तैसी विवेक शक्ति जयांची वाढोनि तीव्र बहु झाली,
त्यांच्या आकलनीं परमेशविभूतीहि अंशतः आली! ४०
ते स्वानुभवें ह्मणती, ' सर्वांच्या अंतरींच ईश वसे;
" बाहेर कितीहि जरी धुंडाळियलें तरी न तो गवसे;" ४१
प्रथम तयाची ओळख सत्योत्सुक मानवा स्वहृदयांत
होत असे; नंतर तो इतरत्रहि त्यास ओळखुनि घेत. ४२
ह्या ओळखीमुळें तो सत्य कथी स्वानुभूत सिद्धांत
कीं ' ईश्वराविणें नच किमपि कुठें रिक्त अणुभरि प्रान्त;' ४३
' जें दृष्ट अदृष्ट सकल, जें ज्ञात ज्ञेय वाटतें कोणा,'
द्रष्टा ज्ञाता यांसह तें केवळ ईशरूप मनिं आणा.' ४४
' तीव्रविवेचनशक्तिच दाखविते ईश्वरस्वरूपातें
ह्मणतां ? तरि शक्ति असी काय करुनि लाभते? निरूपा तें ? ४५
ऐसें ह्मणाल, तरि व्हा आधीं श्रद्धाभियुक्त! मग वंदा
साधुचरण! कीं ज्यांचा पतितजनोद्धरणचि प्रमुख धंदा. ४६
साधु ह्मणति बालत्वापासुनि अभ्यास भक्तिचा विहित;
असतांचि भक्तिबीज प्रत्येक शिशूंत जन्म--संनिहित. ४७

प्रथम स्वमातृभक्ति, स्वपित्याची भक्ति तेंवि, गुरुभक्ति
हा बीजांकुर ईश्वरभक्तिंतत बळवान्‌या हवी युक्ति. ४८

ह्या भक्तिचें विशुद्ध स्वरूप अभ्यासितां मतिस येते
जी सूक्ष्मदर्शनोचित शक्ति; पुढें तीच सिद्धितें देते! ४९

एकाग्रबुद्धिनें जें कार्य करावें, सुसिद्ध तें होतें
ह्या अनुभवानुरूप स्थिरमतिचाहि प्रयोग इष्ट इथें. ५०

सृष्टीच ईश्वरांशक; त्यांत विशेषें विभूतिमत्सत्व-
वाटेल, तया भजणें; हेंचि सगुणरूप भक्तिचें तत्व. ५१

ह्या तत्त्वा अनुसरुनी हरि, हर, गणनाथ, सूर्य, जगदंबा
इत्यादि देवतांचे भक्त जनां ह्मणति अमुक अवलंबा- ५२

कवण्याहि देवतेतें ईश्वर समजोनि शुद्ध भावानें
अव्यभिचारें भजतां, ईश मिळे भक्तिच्या प्रभावानें. ५३

जैसा मृग मृगजळ हें जळ मानुनि पाठलाग ह्मणिं करितो,
एक्याचि पथें धांवुनि सरितां गांठुनि खरेंचि तोय पितो, ५४

श्रद्धाविहीन परि जो किंवा जो क्षणिक भक्तिने फिरतो;
तो जन तृषित हरिणसम भवतापें जेथच्या तिथें मरतो! ५५

हीच गति नास्तिकाची, अवमानुनि औषधामृता त्यजुनी
मरतो रोगी, तैसा भक्तिसुधेविण अहा! मरे कुजुनी!! ५६

मधु-मधुरत-- प्रलोभें औषध खाऊनि बाळ होय बरें;
तेंवि फळाशेनें जन भक्ति करुनि तरति एवढेंचि खरें. ५७

दुःखनिवारण व्हावें ह्मणवुनि कितिएक ईश्वरा भजती;
सौख्य मिळायासाठीं तद्भजनीं कोणकोणही धजती. ५८

हें भजणें गौण खरें; परि तेणें वाढतांचि अभ्यास
तत्व कळुनि कालान्तरीं जन पावति उच्च त्या अलभ्यास! ५९
मूठचि धान्य अपेक्षुनि धीट भिकारी नृपासि गांठि जरी,
तरि तो औदार्यातंना बनवी श्रीमंत त्यासि जन्मवरी. ६०
तैशी परमेशाची व्यभिचार रहित शुद्ध जरि भक्ति
घडली कवणाहि मिषें; तापत्रय हरुनि देई ती मुक्ति. ६१
प्राक्कालीन शतावधि मुनि कथिती तत्व हें निजानुभवें
हें ज्ञान जुनेंचि परी होय जया लाभतें तयासि नवें. ६२
विद्वच्छिरोमणि श्रीशंकर आचार्य, मध्वआचार्य,
रामानुज इत्यादिस पटलें आस्तिक्यपूर्ण सुविचार्य. ६३
अर्वाचीनहि निस्पृह साधु तुकाराम, रामदास, असे
गोरा, कबीर, चोखा, नामा, ज्ञानेश्व-रैकनाथ, असे- ६४
इकडील सोहिरोबा, गोपाळ बुवा, तसा सगुणबंदा,
अन्यहि देशिक सज्जन तत्वविचाराविणें न ज्या धंदा; ६५
ते सर्वहि काय खुळे! नास्तिकहो! शाहणे तुह्मी मात्र?
कीं ते लबाड सारे? केवळ तुह्मींच सत्यता-पात्र? ६६
वाल्मीकि, व्यास, मनुप्रभृतींचे ग्रंथ जे जनहितार्थ
फार पुरातन कालापासुनि उपयुक्त जाहले सार्थ. ६७
अर्वाचीन तसे श्रीज्ञानेश्वर; एकनाथ, तुकयाहि
श्रीरामदास, वामन, मुक्तेश्वर, महिपती, मयूरक, ही- ६८
सगळीच मंडळी, जी मोठाले ग्रंथ निर्मिती झाली;
ती सर्व अज्ञ यास्तव 'तुच्छ' ह्मणुनि माय नास्तिका व्याली? ६९
ह्या कविंचे जगतावरि उपकार विशेष? नास्तिकाचे कीं
'अत्यंत लोकहित तें सत्य' असें ठरतसे न का लोकीं? ७०

नास्तिक समजति आपण सुज्ञ म्हणुनि, परि तयांसि पूर्वकवी
अज्ञ समजुनी योजिति उद्धरण्या एक एक युक्ति नवी. ७१
फारचि ममताळुपणें अज्ञोद्धारार्थ झटति साधुजन,
द्वेषिति, निंदिति त्यांसचि नास्तिक! हें कृत्य साधुज न ७२
अज्ञजनोद्धारार्थ प्राक्कविनीं ग्रंथ एवढे केले!
सद्यःस्थिति परि तेव्हां नव्हते कवि ते धनास्तव भुकेले. ७३
नव्हतेच छापखाने; कागद सुद्धां सुदुर्मिळ तर्धी ते
केवळ परोपकारास्तव रचिती ज्ञानपूर्ण-जलधींतें! ७४
ज्ञानधनाचि तया काळीं दुसरें होतें तपोधन श्रेष्ठ;
सत्य, सदाचरण, तसें शील जिथें तोचि होई तें ज्येष्ठ ७५
विषयीं लंपट होणें तल्लोभें कपट कृत्य आचरणें;
लोभ परस्वीं धरणें इत्यादिंस तें खरेंच धिक्करणें ७६
निःसंग शांत निःस्पृह निर्मळ सत्यैकनिष्ठ सच्चरिती
ऐसें मुनि जें कथिती, तेंचि तधीं सकल लोक आचरिति. ७७
सगळ्या स्थितिच्या सगळ्या लोकांची सोय मानव-समाजीं
योग्य तशी लागाया आरंभीं योजिती अनुपमा जी- ७८
वर्णाश्रमव्यवस्था, तैशीच विवाहपद्धति अजोनी
रक्षी सुखशांति इथें; ववतां ये उघड हेंचि समजोनी. ७९
वर्णाश्रमव्यवस्था, ज्ञातींतिल भेद, लग्नपद्धति हीं-
होती स्वधर्मसूत्रीं गुंतविलीं दूरदृष्टिनेंच तिहीं. ८०
हें धर्मसूत्र पुढतीं कापिल नास्तिक्य-शस्त्रधार--कलीं,
ही गोष्टही तयांच्या चित्तीं तेव्हांच येउनी चुकली! ८१
तें सूत्र कापितांक्षणिं उधळुनि होतील लोक हे स्वैरः
विसरुनि बंधुत्व पुढें करितील परस्परांमधें वैर; ८२

वैरें अंतःकलहें जाइल राज्याधिकार संपत्ति;
सर्वांवरीच येइल थोर असामान्य घोर आपत्ति; ८३
हें सर्व भविष्योत्तर-पुराण लिहुनी जनां महाव्यासें
आधींच कथियलें; कीं सावध होवोत सुगति--हव्यासें. ८४
जें आजि येउं लागे प्रत्यक्ष प्रत्ययासि मुनिवचन
इतर उद्यां परवां वा सगळें येईल संशय मुळिंच न. ८५
नास्तिक्यबुद्धि आणिक परकीय--समाजरीतिची प्रीती
ह्या दोन कुऱ्हाडी या धर्माचा कंठ छेदन करीती! ८६
शिरजोर चोर पकडी युक्तीनें जेंवि कोतवालास,
तैसे बुडवे ह्मणती 'कारण हा जातिभेद हालास!' ८७
वजबजपुरी न व्हाया पद्ध्या सैन्यांत पृथक ठरवीती
वर्णाश्रमव्यवस्था तैशी अनुभूति-सिद्ध बरवी ती, ८८
सर्वांसही मिळावे हक्कानें वेगवेगळे धंदे
म्हणुनि ज्ञाति निराळ्या पाळाया बांधिले असति बंदे, ८९
कीं राष्ट्र हें स्वकीय कुटुंब असें सकाळिकांसि वाटावें;
स्वराज्य--तत्व वळखुनि सर्वांहीं एकिनें रहाटावें; ९०
एकाचि कुटुंबीं रिपु लावि कलह निपुण भेद-नीतींत,
बंधूबंधूंत, पितापुत्रांत, तसाचि एक—जातींत ९१
ह्याचि प्रकार एथें घडतो परबुद्धिच्या प्रतापानें;
निज-देश-बंधुतेची राख पडे मत्सराग्नितापानें! ९२
हा मत्सर कां होतो! कोण शिकवितो? कुठोनि तो येतो?
याचा शोध करी जो, हितशत्रूक्तींमुळें न मोहे तो. ९३
मोह न व्हावा ह्मणुनी पूर्वींच भविष्य सांगुनी सारें,
व्यासादि मुनी दाविति गांठावा तोचि मार्ग सुविचारें. ९४

ऐहिक सुखार्थ शिकणें द्वीपांतर जन-कला नव्या विद्या
पूर्वोक्त जातिभेदा योग्य अशानींच सर्व त्या सद्या. ९५
स्थिर जातिभेद राहो! परजातिविरोध! नष्टता पावो!
अस्पृश्य आत्मभगिनीपरि ममता अंत्यजादिकीं राहो. ९६
तेणें विशेष होइल राष्ट्रहित; फिरेल काल बाष्कळ हा;
कीं ज्ञातिभेदाचि जगीं योग्यौषध जीवनार्थका कलहा! ९७
वर्णाश्रमजाति--विभिन्नाचारें ऐहिकीं सुखीं स्थिरता
राष्ट्राप्रति देइ खचित परमेश्वर आस्तिका स्वभक्तिरता ९८
तैसेंचि पारमार्थिक मुक्ति--सुखहि आस्तिकासि लाभतसे.
होतील कसे श्रध्दाहीन अकर्मक जनांसि लाभ तसे? ९९
आस्तिक्यें स्वहित तसें परहितही साध्य होतसे साचें
नास्तिक्यें स्वपराहित; हित यांत नसेचि एक केसाचें. २००
हे भक्तवत्सला! परमेशा! मद्देशबांधवां द्यावी
निजभक्ति! जी खरोखर राष्ट्रोद्धारक सुपुत्र सद्या वी. १०१

---

## समक्षदेवतास्तोत्र.

( गीति )

वंदे मातरमभिमतदात्रीं धात्रीं समग्र विश्वस्य
काले संहर्त्रीमथ जनयित्रीमपि पुनः समाश्वस्य. १
सकल जगदात्मरूपे! लक्षाधिकसुखकरांघ्रिदृक्श्रवणे!
भूजलतेजसमीरखजननि! सकलविश्वपालनप्रवणे २

हे सृष्टिदेवते! तूं प्रत्यक्ष समस्तगोचरा असती;
तुज सांडुनि इतरांतें प्रथम नमन योग्य नच गमे मजसी- ३
ज्याचें स्वरूप न दिसे, सामर्थ्यहि नेणवे मनासि, तसें
शब्द श्रवणीं न पडे, नमन अशा देवतांसि होइ कसें?! ४
वसतो जीच्या अंकीं करुनि जिचें अन्नपान वांचतसें;
त्या सृष्टिमाउलीला बालक मी क्षण तरी विसंबुं कसें ५
ह्या सृष्टिदेवतेहुनि इतरां देवींस निरखिण्याजोगें
इंद्रिय कवण असे मज अज्ञाना जवळि? वळखुं ज्या योगें? ६
कीं सृष्टिमाउलीनें काय मला न्यून पाडिलें आहे?
ह्मणुनि भजाया इतरां अव्हेरायाले योग्यही का हे? ७
कीं काय असे थोडें सामर्थ्य हिला मलाच पोषाया?
निजवर्जन-परसेवन कां व्हावें पात्र मीच दोषा या? ८
कीं हे कुरूप आहे? दुसऱ्या त्या हिजहुनी बऱ्या दिसती?
तरि सर्वाधिक सुंदर वाटतसे हीच मज अनादि सती. ९
किंवा निष्ठुर ऐसी इतरांहुनि वाटली असेल कुणा!
स्वानुभव मला कथि कीं लेश दयेचा नसेचि हींत उणा. १०
हिजपरिस अधिक सद्गुण दुसऱ्या कवणेमधें जरी असती
तरि दाखवाल नच जों, तोंवरि मन्मानसीं न ते ठसती. ११
जन हो, पहा असे ह्या सृष्टीचें भाग्य किति तरी विपुल
लुटिलें लुटिती लुटितिल अमित परार्थमाण जीवकुळ १२
ज्याला ज्याला जें जें लागेल तयासि देइ ती तें तें
परि भलत्यासि न भलतें; पाहुनि उद्योग-बुद्धिमत्ते तें. १३
जो योग्य ज्या फळाला त्यासाच तें दे जशी सुधी माता
परि मूर्ख निरुद्योगी यांच्या कांहीं न लाविते हाता! १४

काय न लाभे करितां यत्न हिच्या पासुनी कुणालाही?
कीं यत्न पराला दे नृपतनुचें रक्त मत्कुणाला ही! १५
स्थिरचरजडचैतन्यादिक सगळें हिजविणें कधीं न घडे
परि कवणाच्या हस्तें नियम हिचा लेशमात्र का बिघडे? १६
जे जे कल्पक शोधक मोठे मोठे कलाप्रवीण जन
ते काय हिच्यावांचुनि करिति दुज्या देविचें कधीं भजन? १७
अनलजलजनितबाष्पप्रसरणवेगेंचि चालवुनि नाव;
शतकोट्याधिक मिळविलें धन; केलें प्रथित आपुलें नांव १८
किंवा तशाच भूवारें सहज हजारो जनांसहित गाडी,
चालवुनी प्रथमचि जो आश्चर्यामाजि विश्व हें पाडी. १९
तो मुनिपुंगव दुसऱ्या सृष्टीहुनि देवतेसि भजला का?
उपयोग काय होता असमक्षालागिं मारुनी हाका? २०
ह्या सृष्टिदेवतेची विद्युत् अंशावतारिणी देवी
ज्यांतें प्रसन्न झाली; आनंदें हस्त मस्तकीं ठेवी; २१
ते ते कर्तुमकर्तुं मिथ्याकर्तुं समर्थ होओनी
लोकोत्तर मेळविती धन आणि कीर्ति हीं जगीं दोनी २२
कीं जी स्वभावचपला विद्युद्देवी स्थिरत्व पावोन
निजभक्तांचीं कार्यें करि वश दासी परीस होओन २३
शत योजनाहुनी बहु दूर सहज पोंचवूनि संदेश
प्रत्युत्तर मेळविती भक्त जिचे असुनियांहि मंदेश २४
तैसे रथ चालविती प्रज्वाळिति दीप सकल शहरभर
इतर हजारो कृत्यें करुनि धनाची स्वगेहिं भरिति भर. २५
ऐसे असंख्य घडती ज्या सृष्टीदेविचे चमत्कार?
अष्टौ सिद्धि तिच्या कां दासि न करितील नित्य सत्कार? २६

जें जें तुमच्या दृष्टिस पडतें कर्णांसि जें श्रवण होतें
चित्तेंहि चिंतिजेतें सृष्टीहुनि काय वेगळें हो तें ? २७
मग ही सृष्टिच नोहे काय जगन्मोहिनी जगज्जननी ?
हींत नसे वस्तु असें कोठुनि येईल आपुले मननीं ? २८
गणपति सरस्वती विधि हरिहर भान्वादि सर्व देव तसे
अवतार बहु तयांचे हें सारें सृष्टिमाजि येत असे २९
व्याप्य व्यापक आणि व्यापन हीं तीन मिळुनि एक असें
वेदान्त शास्त्र सांगे; ब्रह्म तरी सृष्टिहुनि भिन्न कसें ? ३०
' सर्वं खल्विदमेवाऽहं ' ह्या वाक्येंहि हेंचि सिद्ध असे
' सोऽहं ' किंवा ' तत्त्वं ' यांतिल ही अर्थ अन्य मुळिंच नसे ३१
ह्मणुनीच मनःपूर्वक करुं ह्या श्रीसृष्टिदेविची भक्ति
आह्मा समस्त दे जी सगळ्या सुखांसि भुक्तिसह मुक्ति- ३२

---

## नवी पहांट.

साकी

सुगंध वासा दाटुनि झाला जड म्हणुनीच न वाहे ।
वायु पूर्विचा कीं मावळत्या कुमुदीं कोंडुनि राहे ! ॥ १
नव्या सुगंधें युक्त वाहती वाऱ्याच्या ह्या झुळुका ॥
नूतन फुलत्या कमलमुखींचे निश्वासचि ते जणुं का ! ॥२॥
न्हाया पहांट ही आली !
प्राची प्रभावती झाली ! ॥ ध्रु० ॥

# बुद्धिप्रभाव.

( साकी )

विशाल गगनीं दूर कुठें तरि यथेच्छ फिरती पक्षी ।
शत्रुत्वाचा गंध नसुनि त्यां मनुष्य मारुनि भक्षी ॥
गहन वनीं तृणपल्लवांवरी पशु करिती निर्वाहा ।
महा प्रयासें मनुष्य त्यांना मारुनि करिती स्वाहा ॥
अगाध सलिलीं लपुनि जलातें शुद्ध करिति जे मासे ।
कृतघ्न मानव खाउनि त्यांना ह्मणे ' लागति खासे ' ॥
परोपकारीं सज्जन रमती हाणिति दुर्जन त्यांस ।
पुण्य, पाप, नीत्यनीति केवळ वक्त्यांस श्रोत्यांस ॥
वक्ते श्रोते हेहि कालवश; जसें फिरवि तो वारें ।
उलटें सुलटें तसें सुपाचें नृत्य होतसे सारें ॥
नीति आज जी कालान्तरिं ती वाटे शुद्ध अनीती ।
आजे-पणजे भ्याले; आह्मा न तें कराया भीती ॥
राजाज्ञेचा बाऊ जाउनि लोकांच्या सत्तेला- ।
महत्व येतें याचें श्रेय स्पष्ट बुद्धिमत्तेला ॥
तीच बुद्धिमत्ता काळासहि बनवितसे अनुकूळ ।
ईशवशीकरणासहि नाहीं तिजहुनि दुसरें मूळ ॥
यास्तव संपादुनी नरा ! ती नारायण त्वां व्हावें; ।
आजपासुनी धरुनि चिकाटी करणीला लागावें. ॥

## तीन सुभाषितें.

गीति

यत्नेंचि साध्य होती कार्यें केवळ मनोरथें नव्हती ।
निजलेल्या सिंहाच्या तोंडीं न कधींच सावजें पडती ॥

( २ )

काय समर्थाला जड? उद्योग्यां दूर तें असे काय? ।
परदेश सुविद्वांनां? प्रियवाद्यां शत्रु कोणता होय? ॥

( ३ )

संपर्क कुलीनाशीं, मित्रत्व तसेंचि पंडितां पाशीं ।
संमेलन जातीशीं करितो भीती कधीं नसे त्याशीं ॥

---

## सत्पुरुष लक्षणें.

( एका इंग्रजी कवितेच्या भाषांतरावरून )

जीवित्व-श्रेष्ठ-पुरुष ज्याचें दुष्कर्ममुक्त शुद्ध मन;
ज्याला स्पर्श कराया गर्वाची कल्पना सुधां क्षम न; १
आनंदास जयाचे न समाधानासही दिवस मुकती;
आशा-दुःख उभय हीं फसवूं-रुसवूं न ज्या कधीं शकती; २
तनुरक्षणार्थ त्याला न लगति किल्ले तशींच हत्यारें;
किंवा घनघोरभयावसरीं लपण्यास तीं गुहागारें; ३
तो निर्भय हृदयानें सिंधुकृत प्रलयकाल सोशितसे.
स्वर्गांतोनि उतरले उग्र अनर्थ प्रपात तेहि तसे. ४
सुविचार मित्र त्याचे. सन्मार्गीं उघळि आयु तोचि धन.

वसुधाचि पवित्र मठ क्षेत्रहि यात्रोपयुक्त कीं भुवन. ५
( मालिनी ) क्षणहि धणि तयाचे होति ना दुर्विचार.
भिववुं शकत नाहीं मृत्युचा त्यासि मार.
भ्रममय भवपंकापासुनी तो अलिप्त.
ह्मणुनि विभव-दंभां इच्छिना कीं विरक्त. ६
( चामर ) नीच जे मनोविकार वेगळा तयांहुनी.
आस फूगवी न भीति कांपवी तया जनीं.
भूपती न तो; तरी धनीच पूर्ण आपला.
कांहिं त्याकडे नसोनि थोर भाग्यवान् मला. ७

---

## समाधानक सुभाषितें

### साकी

कधीं निजावें लागे भूवरि कधीं पलंगावरती ॥
भाजीनें जठराची तैशी कधिं पक्वान्नें भरती ॥ १ ॥
कधीं गोधडी कधीं लाभते पांघरावया शाल ॥
स्वदेशकार्यी झटणाराला तुल्य दुःख-सुखकाल ॥ २ ॥

### घनाक्षरी

भूमि भक्षिते जरि धान्यातें । माता मारी निजपुत्रांतें ।
समुद्र लंघील तटाकांतें । वारिल त्यां कोण ?
जाळिल अग्नी जरि भूमीस । कोसळेल जरि शिरिं आकाश ।
अन्नाचि मारिल होउनि वीष । वारिल त्यां कोण?

भूपति करिता जरि अन्याय। पिताचि करि शिक्षणा अपाय॥
दुर्गुण शिकवी जरि गुरु राय। वारिल त्यां कोण!
पति शिकवी स्त्रीतें व्यभिचार। माता बनवी पुत्रा चोर!
देशद्रोही निपजति कुमर। वारिल त्यां कोण?

साकी.

गुणवत्संगतिवांचुनि दुसरा लाभ कोणता मोठा?
दुर्जन सहवासाधिक दुसरा किति दुःखाचा सांठा?
समय फुकट गेल्याहुनि दुसरी थोर कोणती हानी?
धर्मतत्वचिंतनरत जो त्यापरिस कोणता ज्ञानी?
सकल इंद्रियें अधीन ज्याच्या कोण तयाहुनि शूर?
पतिव्रता हृदयाधिक कोठें प्रेमजलाचा पूर?
सद्विद्येहुनि अधिक कोणतें उपयोगी धन दुसरें?
प्रवास करणें नलगे तरि त्याहुनि तें सुख कवण बरें?
आज्ञोल्लंघन न घडे त्याहुनि बरें कोणतें राज्य?
स्वदेशकार्या वांचुनि कोठें समाधान तें प्राज्य?

आर्या.

सज्जन हृदयेंच खरीं अतिशय मज वाटती कठिन पाहीं
जीं दुर्जन निंदेच्या वज्राघातें न फुटति जरि कांहीं १

दिंडी

सतत संगति जरि तुला कावळ्यांची।
गोड वाणी कोकिले तुझी साची॥
दुर्जनाच्या संघांत सुजन राही।
तरी त्याचें मन दुष्ट होत नाहीं?॥

### श्लोक

सत्तेबरोबर जिथें वसतो विवेक ।
विद्या न सोडित जिथें विनया क्षणैक ॥
सांडी प्रभुत्वहि न तें करुणेसि जेथें ।
साधुत्व खास जन हो! असतेंच तेथें! ॥

### आर्या

दात्याची कृपण कीं मेल्यावरि दत्त धन पुनः घेतो ॥
कृपणाचि दाता; कां कीं आपण मरुनीच धन परां दे तो १

---

## गूढपुरुषपूजा

प्रश्न–सांगा पाहूं जगांत सगळ्यांहुनी कोण नीच?
उत्तर–काय पूसतां! कृतघ्न देशद्रोही प्राणीच! १
प्र. छिद्र पाडुनी घरास रात्री करितो चोरी तो?
उ. कमी नीच! कीं एकाचेंची धन अपहारीतो. २
प्र. वचन देउनी फिरे; करी जो विश्वासविघात?
उ. तोहि कमी, कीं मोजक्या जनां दावु शके हात. ३
प्र. करी धनास्तव सही पराची हुबेहुब जो तो?
उ. तो कच्चा, कीं पुढें शासना पात्र खास होतो ४
प्र. जुगार खेळुनि घरदाराचा फन्ना ज्यानें केला?
उ. उणाच! कीं तो लावि आपलें कुळ एक भिकेला ५
प्र. स्त्रीविषयानें छीथू झाली सर्व जगीं ज्याची?!
उ. एकादेहा पुरतिच घातक नीचता तयाची. ६

प्र. वनीं गांठुनी लुटी प्रवाशां आणि ठार मारी?
उ. त्याच वनापुरतीच म्हणोनी नीचता न भारी. ७
प्र. घालि दरोडे बहुत जमवुनी चोर बंडखोर?
उ. प्रसिद्धीमुळें नीचत्व ठरे त्याचें कमजोर, ८
प्र. नित्य पिवोनी विपुल सुरा जो गटारांत लोळे?
उ. एकलाचि तो जननिंदेच्या अग्निमाजि पोळे. ९
प्र. गृध्र कावळे डुकर वगैरे प्राणी नीच न का?
उ. प्रदेश करिती स्वच्छ; तयांचा हा गुण विसरुं नका. १०
प्र. मलिच्छ जागा शौच कुपादिक काय नीच नोहे?
उ. त्यातें त्यांची घाण न बाधे त्यजी दूर जो हे. ११
प्र. शताधिकांतें त्रासद वेश्या नीच नव्हे का ती?
उ. बालक-वृद्ध-स्त्रीजन तीच्या हस्तीं नच जाती. १२
प्र. सहस्राधिकां छाकटे करी मद्य, तें न नीच?
उ. न पिणारे मोकळती म्हणुनी नीचता कमीच. १३
प्रश्नच नलगे देशद्रोही अधिक नीच सत्य;
स्वजनांतें बुडवाया होती परक्यांचे भृत्य. १४
देशद्रोही गूढ पुरुष हे जे पोटासाठीं
शत्रुंस होती फितुर; लागती निजसुजनां पाठी! १५
लोकांसि जसे त्रासद तैसे फसविति सरकारा;
माफीचा साक्षिदार म्हणतां गुन्हा पचतो सारा. १६
घर फोड्याला चोरायाला मिळतें घर एक;
ह्या पिशुनाच्या भक्ष्यस्थानीं सगळेची लोक! १७
घरफोड्याला शिक्षा करण्या तत्पर सरकार
चहाडखोरां भाळुनि करि तें उलट पुरस्कार १८

सरकारचि विश्वासघातक्यां इतरां करिं दंड
चहाडखोरां भुले। तयांचें वाढवि तें बंड। १९
खोटि सही करणाला होते प्रभुकडुनी शिक्षा;
चहाडखोरां प्रभुचीच मिळे चहाडिला दीक्षा। २०
विश्वासवुनी घात करावा ब्रीद हेंच त्याचें
सुजना छळण्या भीति न त्या कीं बळ सरकाराचें !२१
जगीं जुगारी स्वकुटुंबाच्या कारण नाशास;
गूढ पुरुष बुडविती शेकडो विनापराध्यांस. २२
स्त्रीलंपट घालवी आपली एकाची अब्रू;
शेकडो भल्या स्त्रीपुरुषांची हा दुर्जन गब्रू २३
न वाटपाडे शहरीं सकती सुखवाशां मारूं
राजरोस त्यां संकटिं बुडवी हे दुर्जन-तारूं २४
बंड होय तैं आत्मरक्षणा सावध जन होतीं;
सावधानता वारूं न शके चहाडखोरां ती। २५
सरकाराची सेना वारी सहज बंडखोरां
तीच सज्जना पीडुनि रक्षी त्या पिशुना-चोरां !! २६
मद्य पिणारे 'मद्य हें' असें जाणोनी पीती,
हे दुर्जन विष अमृत भासवुनि सुधां पाजीती !! २७
गृध्र-काक-जंबूक वगैरे प्राणी दुष्ट जरी
तरुण देशभक्तांवरि त्यांची दृष्टि न वक्र तरी! २८
मृत-मरणोन्मुख तनू भक्ष्य हें त्या गृध्रादींचें
ह्या पिशुनांनीं घट्टेकट्टे वांडहि खायाचे !! २९
गलिच्छ जागा गटारादिंची घाण टळायाला
दूर राहणें उपाय हा; परि नव्हे दुर्जनाला ! ३०

धन--यौवन--रूप न त्या पुरुषां वेश्या नच शिवती
परि पिशुनां कधि कुणाची नसे वर्ज्य शिवाशिव ती! ३१
एवं सगळया जगांत असती जे नीच पदार्थ
गूढ पुरूषांसमोर ठरती तेचि कःपदार्थ! ३२
सर्व जगांतिल सर्व नीचता करुनी एकत्र
कलि पुरुषानें गूढ पुरुष हें निर्मियलें चित्र! ३३
ह्या चित्राच्या पूजेसाठीं गंध शेणकाला!
बूट फाटके जोडे वाहणा गांठवुनी माळा! ३४
दाढ्या त्यांच्या मिशाहि जाळुनि नाका द्या धूप!
ओंवाळा देशभक्तदहन ज्वाळांवर खूप! ३५
योग्य तयां नैवेद्य कोणता? न सुचे काय कथूं!
सुचे एक; देशद्रोह्यांच्या मुखांत थू! थू! थू!!! ३६

---

पाश्चात्य महायुद्धांतील

## योध्यांस प्राच्य अबलांची प्रार्थना

### गीति

व्हा शांत, व्हा हो! थांबा थांबा अहो महाराजे
काय भयंकर संगर तुमच्या दुसऱ्या गुणांस हा साजे? १
विद्येनें लाभावा विनय असें शास्त्र आमुचें सांगे;
हे प्रातीच्ये विद्ये! तूं ह्याच्या उलट वागसी कां गे? २
हे विद्यादेवि! तुझा कीं सर्व मनुष्यवर्ग हा बाळ?
अन्नाच्छादन पुरवुनि त्याची होऊं न देसि आबाळ ३

ह्या मनुजबालकांचें संरक्षण सर्वथा करी कोण ?
हे विद्ये! तुजवांचुनि ओंवाळी कोण लिंबुसह लोण ? ४
जें जें ज्या ज्या काळीं लागतसे या मनुष्य बाळास.
तें तें तूंच पुरवुनी रक्षिसि वळखोनि उचित काळास. ५
क्षुदवसरीं अन्न तसें तृट्समयीं बर्फयुक्त जल बरवें,
रोगावसरीं औषध बोधामृत संकटींहि गोड रवें ६
पाजिसि; जपुनी रात्रंदिवस तयाच्या सदैव हितकरणा
ती तूं विद्यामाता स्वकुमारां करिसि पात्र कां मरणां ? ७
कीं तूं न होसि विद्या ? विद्यारूपा धरोनि आलीस-
शिशुभक्षिणी भयंकर पूर्वींची पूतना निघालीस ? ८
ज्या पाश्चात्यांचें त्वां आजवरी करुनि दाविलेंस हित
तें सर्व कपटपोषण मानावें काय दुर्मतीसहित ? ९
समजावें काय अह्मीं करूर भयंकर कृती असी बघुनी ?
गुरु गुरुचि झगडती तें काय करावें सुचेचिना लघुनीं! १०
सर्व जगाचे गुरु हो! धावा आतां पुरेचि संग्राम.
झाला पुष्कळ लोकक्षय! पडले ओस पुष्कळ ग्राम! ११
माता भगिनी तुमच्या किति दुहिता किति सुना किती नाती
होऊनि अनाथ उघड्या पडल्या!! दुःस्थिति कशी पहानां ती ?
कुंठित झाले सगळे धंदे! व्यापार थांबले! अडले
गरिब; तसे श्रीमंतहि चिंताभीतीत गुंतुनी पडले!! १३
झणवित होतां तुह्मी आजवरी आपणांस तत्वज्ञ,
शास्त्रज्ञ, सुज्ञ, तैसे सर्वज्ञ, गुणज्ञ, पूर्ण नीतिज्ञ. १४
सर्वसमाजहितज्ञ, स्वपरसुखज्ञ, प्रभूतयुक्तिज्ञ;
आह्मांपुढें इतर जे सर्व जगांतील सर्व ते अज्ञ. १५

कळलें शहाणपण कीं शांति दया प्रेम आणि संतोष
यांचा लेश न तुमच्या हृदयीं। स्वार्थेंचि भडकला रोष १६
परि आतां ऐका ही अबलांची प्रार्थना तरी थोडी-
अतिलोभ दुराग्रह हा निजपरहित कुंभ सर्वथा फोडी. १७
यास्तव पुरे! पुरे!! हें युद्ध अतां थांबवा करा संधी.
कोणी तरी विवेकें उतरूं द्या क्षात्रवृत्तिची धुंदी १८

---

## स्वदेश सप्तदशी.

### श्लोक

वरें कूळ आहे वरें शील आहे।
वरें रूप अंगांत आरोग्य राहे॥
परी देशकार्यी न तल्लाभ झाला।
तरी सर्वही तें कशाला कशाला? १
अलंकार पोशाख नानाप्रकार।
शिरोभूषणें मूल्यही ज्यांस फार॥
परी देशकार्यांत खर्चास भ्याला।
तरी सर्वही तें कशाला कशाला? २
शिके जन्मल्यापासुनी खूप विद्या।
तिला लोक वाखाणिती फार सद्या॥
परी देशकार्यी मुखस्तंभ झाला।
तरी सर्वही तें कशाला कशाला? ३
असामान्य धारिष्ठ अंगीं धरोनी।
पुढे येइ उद्योग मोठे करोनी॥

परी देशकार्यांत कंजूष झाला ।
तरी सर्वही तें कशाला कशाला ? ४
बरीं आणि वाईट कामें करोनी ।
धनाचे निधी ठेवियेले भरोनी ॥
परी देशकार्यी वरी स्तब्धतेला ।
तरी सर्वही तें कशाला कशाला ? ५
शिकोनी प्रयत्नेंहि तालीम खाशी ।
तनूमाजि संपादिल्या शक्ति राशी ॥
परी देशकार्यीं वरी आळसाला ।
तरी सर्वही तें कशाला कशाला ? ॥ ६
कला आणि कौशल्य अंगीं अपूर्व ।
असे मेळवीलें स्तुती गाति सर्व ॥
परी देशकार्यीं धरी मूढतेला ।
तरी सर्वही तें कशाला कशाला ? ७
तिरंदाज वा गोळि मारी अचूक ।
वधायासि पक्षी पशू दीन मूक ॥
परी देशकार्या चुकारू निघाला ।
तरी सर्वही तें कशाला कशाला ? ॥ ८
बहु धैर्यशाली लढाईस गेला ।
विदेशी हितीं घोर संग्राम केला ॥
स्वदेशी हिता भीरुसा गप्प ठेला ।
तरी सर्वही तें कशाला कशाला ? ॥ ९
अहो कारखाने उभारूनि मोठे ।
विदेशी जनांचे भरी मात्र कोठे ॥

राष्ट्रीयतरंग
४२६९

स्वदेशी जनांच्या झटेना हिताला ।
तरी सर्वही तें कशाला कशाला ? ॥
करी भूमि संपादुनी शेतिभाती ।
गडी-बैल सर्जा बहू राबताती ॥
न गोरक्षणीं खर्चवे द्रव्य त्याला ।
तरी सर्वही तें कशाला कशाला ? ॥ ११
उभारी हवाशीर मोठ्या हवेल्या ।
सुशोभीत त्या रंग देवोनि केल्या ॥
विदेशी पदार्थांवरी तोष त्याला ।
तरी सर्वही तें कशाला कशाला ? ॥ १२
सदोदीत दारांत मोटार गाडी ।
दुजीं वाहनेंही तरेवार घोडीं ॥
परी देशकार्या न फावे तयाला ।
तरी सर्वही तें कशाला कशाला ? ॥ १३
धरी नाक संध्या करी लांब लांब ।
उपासोनिही आळवी विष्णु सांब ॥
स्वदेशावरी येइ तो साह्य वाला ।
तरी सर्वही तें कशाला कशाला ? ॥ १४
खटाटोप मांडीत देवार्चनाचा ।
स्वताच्या हितार्थें तपःसाधनाचा ॥
सुचे देशकल्याण हेतू न ज्याला ।
तरी सर्वहि तें कशाला कशाला ? ॥ १५
भला योग साधूनि लावी समाधी ।
स्वता मुक्त होओनि वारी उपाधी ।

रुते देश पंक्तीं नसे भान ज्याला ।
तरी सर्वही तें कशाला कशाला? ॥ १६
स्वदेशी हितामाजि होतें स्वहीत ।
स्वदेशी विघातांत होतो स्वघात ॥
कळे हा न सिद्धांत ज्या शाहण्याला ।
गणावें मनुष्यांत त्याला कशाला? ॥ १७

इति श्री स्वदेशी सप्तदशी समाप्त.

---

## भिकाऱ्याचें उत्तर.

श्रीमंत ह्मणे तरुण बांड तूं भिक्षा मागसि कां? ॥
भिकारी ह्मणे उत्तर माझें महाराज ऐका? ॥ ध्रु० ॥
हिंद भूमि हे पूर्वी जेव्हां होती श्रीमंत ।
अनेक धंद्यामुळें भिकेला नव्हता ऊसंत ।
बहुत परकी देशां पर्थें मिळत होति लूट ।
कां तर तेव्हां नव्हती आह्मा कशाचिही तूट ॥
तैं दाणागोटा सर्व पिके भरपुर ।
फळफळावळीची मुळीं नव्हति कुरकुर ।
दुधदुभत्याचा तर घरोघरीं जणु पुर ।
श्रीमंतीचा मित्र परंतु आळस जैं लोका ।
भेटे तेव्हां बसूं लागला उद्योगा धोका ॥ श्री० ॥

१

पुढें हळु हळू घटोत्कचाचा आला बाजार ।
दिखाउ सारें धनिकां तुह्मा आवडतें फार ॥

परदेशी क्षणभंगुर वस्तू फुटुनि होय चूर ।
तरी तुह्मां तें पुनः पुनरपी घ्याया हुरहूर ॥

जणु टिकाऊपणावरी लोक विटला ।
कीं देखत भुलिस सगळे तुह्मि भुलला ।
त्यामुळेंच देशी उद्यम मंदावला ।

इतुक्यांत परप्रभुसत्तेचा जबर बसे धक्का ।
धनोत्पत्तिचा मार्ग त्यामुळें खुंटलाच पक्का ॥ श्री० ॥

२

आतां तर हें उघड आमुचा देश भिकारी हा ।
धान्याचा आमुच्या होतसे परदेशीं स्वाहा ॥
हें दावाया यावें लागे तुमच्या दाराशीं ।
भगवंताचें नांव तुह्माला जागे व्हायाशीं ॥

जाळितसां तुह्मी घरांत राकेल ।
आवडे कुणाला मग देशी तेल ।
तेल्याचा धंदा बसतां सपशेल ।

भिकारि होतां तेल्यानीं कां मारु नये हाका ।
पोटासाठीं तुमच्या दारीं येऊंच नये का? ॥ श्री० ॥

३

अहो राव! लोखंडी सारें घेतां परदेशी ।
धंदा नसुनी भीक न यावी कां लोहारासी? ॥
परदेशी बांगड्यांसि भुलतां तुमच्या घरदेवी ।
अमुच्या कांकणकारांसि कशी गरीबी न यावी? ॥

विळविळीत नाजुक विलायती कपडा ।
घेतांच तुह्मी विणकरां वसति थपडा ।
तो समाज पडला सपशेलचि उपडा ।

जीव जाइना पोट राहिना असी कोष्टि लोकां ।
प्राप्त जाहली स्थिती यावरी उपाय आहे का?

४

जेथ हजारो गाइ ह्मशींचीं होतीं खिल्लारें ।
संपत आलीं परकीयांच्या तीं स्वाहाकारें ॥
रेलचेल जाउनी दुधाचें तेथें दुर्भिक्ष्य ।
कसें न होइल ठरलेंच जिथें गाई ह्मशी भक्ष्य,

किति गवळी धनगर होउनि बेकार ।
भागले करोनी इतर रोजगार ।
शेवटीं तयांसहि भीकाचि आधार ।

आगिन-गाड्या मोटर-गाड्या ह्मणति लुटुन पैका ।
'टांगे-छकड्या-बगिवानानो ! मरा बोंब ठोका' ॥श्री०॥

५

लोक उधळुनी गांव बुडवुनी बिजली बनवोनी ।
मजुरांची मजुरी शोषविली यंत्रासुर-वदनीं ॥
कांहीं पुरुषां स्त्रियां मुलानां गिरणींत दडपूनी ।
तत्तनुंचें लोणचें बनविलें लवणावांचूनी ॥

धान्याचे भूमित पेरावितां कापुस ।

दर धारण आधिंच करितां लावुन फुस ।
ठोकितां तुरुंगीं त्या, जो करि घुसफुस ।
सावकार तुह्मि सरकाराला मिळुनि गरिब लोकां ।
पिळितां छळितां ! त्यां मागाया मग भीक नको कां ? ॥ श्री० ॥

६

टिचभर कागद छापुन केली नोट हजाराची ।
शंभर पन्नास दहा पांच वा ह्मणेल तितुक्याची ॥
नोटा देउनि सोनें चांदी जवळ करायाची ।
युक्ति असे सत्तेच्या जोरें जग झुकवायाची ॥
परदेशीं भरती चांदी सोन्याची ।
ह्या देशीं चलती केवळ नोटांची ।
श्रीमंती एथें ह्याच चिटोऱ्यांची ।
जळली मळली वाळवी गिळी नोट तरी धोका ।
नोटा करणाराला केव्हां सांगा होतो का ? ॥ श्री० ॥
असो आमची भिक्षा आतां अयोग्य जरि वाटे ।
तरुणाची आपदा पाहुनी खरेंच उर फाटे ॥
वर वर्णित हेतुनींच देशीं ह्या गरिबी थाटे ।
आज तुला तें उद्यां मला हा क्रम चिर्त्तीं दाटे ।
तरि पुन्या प्रयत्नें बहुजन जागृति करा ॥
संघटित एकिनें मत हें दृढ पतकरा ।
परदेशी वस्तुस्पर्श न व्हावा करा ।
'होय' ह्मणुनि आजन्म वागण्या निश्चय होतो का ? ।
पुरे एवढी भिक्षा जातों नका देउं पैका ॥ श्री० ॥

# स्वदेशपंचदशी.

श्लोक

शरीरें स्वयें देखणा धष्टपुष्ट।
प्रिया लाजवीते रतीला यथेष्ट। ॥
स्वदेशोपकारीं परी यत्न नाहीं; ।
कशाची तरी थोरवी त्या गुणांहीं? ॥ १ ॥
जनीं मेळवी कीर्ति मोठी अचाट; ।
घरीं संपदेचा यथास्थीत थाट; ॥
स्वदेशोपकारीं परी यत्न नाहीं; ।
कशाची तरी थोरवी त्या गुणांहीं? ॥ २ ॥
कलत्रासवें पुत्र-पौत्रादिकांला ।
बहु प्रीतिनें वागवी भ्रातृकांला; ॥
स्वदेशोपकारीं परी यत्न नाहीं; ।
कशाची तरी थोरवी त्या गुणांहीं? ॥ ३ ॥
हवाशीर शान्दार बांधी हवेली! ।
करी तींत मित्रांसवें नित्य केली! ॥
स्वदेशोपकारीं परी यत्न नाहीं ।
कशाची तरी थोरवी त्या गुणांहीं? ॥ ४ ॥
असे वेदशास्त्रादि तें पाठ सारें; ।
कथी गूढ सिद्धांत मोठ्या विचारें; ॥
स्वदेशोपकारीं परी यत्न नाहीं; ।
कशाची तरी थोरवी त्या गुणांहीं? ॥ ५ ॥
सदाचारसंपन्न मोठा तपस्वी ।
स्वकर्मीं सुनिष्ठाहि दावी मनस्वी; ॥

स्वदेशोपकारीं परी यत्न नाहीं; ।
कशाची तरी थोरवी त्या गुणांहीं. ॥ ६ ॥
अहो राजभाषेंत झाला प्रवीण; ।
भलीं राजकार्यें कराया धुरीण;
स्वदेशोपकारीं परी यत्न नाहीं; ।
कशाची तरी थोरवी त्या गुणांहीं? ॥ ७ ॥
बहु मानिती मोठमोठेहि राजे; ।
असामान्य सन्मान्यताही विराजे; ॥
स्वदेशोपकारीं परी यत्न नाहीं; ।
कशाची तरी थोरवी त्या गुणांहीं ? ॥ ८ ॥
स्वदेशीं विदेशींहि विख्यात कीर्ती ।
बहु-धैर्य-गंभीरता-दिव्य-मूर्ति ॥
स्वदेशोपकारीं परी यत्न नाहीं ।
कशाची तरी थोरवी त्या गुणांहीं? ॥ ९ ॥
सभेमाजीं उत्कृष्ट वक्तृत्व साजे ।
तसा हावभावांहि वक्ता विराजे; ॥
स्वदेशोपकारीं परी यत्न नाहीं ।
कशाची तरी थोरवी त्या गुणांहीं ॥ १० ॥
गढे राजसेवाधिकारांत; थोर ।
उभे लक्ष्मिचे पुत्र सेवे समोर! ॥
स्वदेशोपकारीं परी यत्न नाहीं; ।
कशाची तरी थोरवी त्या गुणांहीं? ॥ ११ ॥
असे न्यायशास्त्रांत नैपुण्य मोठें; ।
करी युक्तिवादें खऱ्याचेंहि खोटें ! ॥

४२६९

स्वदेशोपकारीं परी यत्न नाहीं; ।
कशाची तरी थोरवी त्या गुणांहीं? ॥ १२ ॥

असा उद्यमीं अन्य नाहीं प्रवीण; ।
नफा लक्ष सांची निवारोनि रीण;
स्वदेशोपकारीं परी यत्न नाहीं: ।
कशाची तरी थोरवी त्या गुणांहीं ? ॥ १३ ॥

ा आणि कौशल्य युक्त्या अनेक; ।
ा कल्पना वानिती सर्व लोक; ॥
शोपकारीं परी यत्न नाहीं; ।
ाची तरी थोरवी त्या गुणांहीं; ॥ १४ ॥

REFBK-0004261
REFBK-0004261

अनेक प्रकारीं मिळे द्रव्यराशी; ।
करी तृप्त भोगूनि भोग स्वतांसी; ॥
स्वदेशोपकारीं परी यत्न नाहीं; ।
कशाची तरी थोरवी त्या गुणांहीं; ॥ १५ ॥

मनिं करुनि विचारा, आणि सारा--असारा, ।
निवडुनि करणारा सद्गुणांच्या प्रसारा, ॥
झटुनि विचरणारा आत्मदेशोपकारा, ।
अधनहि जन थारा धन्यतेच्या विहारा. ॥ १६ ॥

## राष्ट्रीयतरंग समाप्त.